**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**

जा.क्र. अम / सका - ०३/ २०१७.
महानगरपालिका सचिव कार्यालय.
दिनांक : ०६ / ०९ / २०१७.

अहमदनगर महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेची सुचना

( महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे अनुसूची ड चे प्रकरण - २ नियम क्र.१ (अ) अन्वये )

**सभा सुचना क्रमांक ०३, गुरुवार दिनांक १४ / ०९ /२०१७.**

प्रति,

मा.श्री. / श्रीमती............................................

सदस्य,
अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.

महोदय,

यांस.-

याद्वारे कळविण्यांत येते की, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे अनुसूची ड चे प्रकरण २ नियम क्र. १ ( अ ) अन्वये मा.महापौर यांनी अहमदनगर महानगरपालिकेची सर्वसाधारण सभा **अहमदनगर महानगरपालिकेचे नविन प्रशासकीय इमारत ( राजमाता जिजाऊ सभागृह ) औरंगाबाद रोड, अहमदनगर येथे गुरुवार दिनांक १४ / ०९ / २०१७ रोजी दुपारी १.०० वाजता** सोबतच्या विषय पत्रिकेतील कामकाज चालविण्यांसाठी आयोजित केली आहे.

आपणांस सभेस उपस्थित राहण्यांची विनंती करण्यांत येत आहे.

**सोबत :** १. विषय पत्रिका
२. प्रस्तावांची टिप्पणी

प्र.नगरसचिव,
अहमदनगर महानगरपालिका.

## अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.

सभा क्रमांक - ३ गुरुवार दिनांक १४ / ०९ / २०१७ रोजी दुपारी १.०० वाजता **( राजमाता जिजाऊ सभागृह ) औरंगाबाद रोड, अहमदनगर येथे** होणा-या सर्वसाधारण सभेची विषय पत्रिका.

| विषय क्र. | विषय |
|---|---|
| ०५ | दुखवटयाचे प्रस्ताव |
| ०६ | जनकल्याण रक्तपेढी, नगर या संस्थेस ३० वर्षे करारनाम्यास मुदतवाढ व नाममात्र भाडे आकारणे बाबत.<br>सदर्भ १) मा.महापौर कार्या.जा.क्र.२४१ दि.२९/७/१६ रोजीचे पत्र.<br>२) मा.उपमहापौर श्री.श्रीपाद शंकरराव छिंदम यांचे दि.२६/७/१६ चे पत्र.<br>३)जनकल्याण रक्तपेढी, नगर यांचे दिनांक २६/०७/२०१६ रोजीचे पत्र. |
| ०७ | माळीवाडा विशाल गणपती मंदिराकडे तसेच नविन टिळक रोडकडे व आगरकर मळा, कर्वे मळा, संजयनगर याठिकाणी जाणा-या चौकास **"काटवन खंडोबा चौक"** असे नामकरण या नावाने होणे बाबत. |
| ०८ | अहमदनगर महानगरपालिका मधील कर्मचा-यांना दिवाळी सणानिमित्त बोनस व सानुग्रह अनुदान मिळणे बाबत.. अहमदनगर महानगरपालिकेमधील अधिकारी / कर्मचारी यांना दिवाळी सणानिमित्त सानुग्रह अनुदानाबाबत झालेल्या करारनाम्यास व त्याप्रमाणे प्रत्येकी रु.५,०००/- इतका सानुग्रह अनुदान बाबतच्या झालेल्या खर्चास कार्योत्तर मंजूरी मिळणे बाबत.<br>संदर्भ :- अहमदनगर महानगरपालिका कामगार युनियन यांचेकडील जा.क्र.११/श्रमिक/२०१६ दिनाक ३१/८/१६ अन्वयेची नोटीस. |
| ०९ | अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील मौजे भिस्तबाग प्रभाग क्रमांक १ अंतर्गत स.नं.१३ चे **"संत किसनगिरी नगर"** असे नांव देणे बाबत.<br>मा.नगरसेविका सौ.दिपाली नितीन बारस्कर यांची यादी |
| १० | अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील पद्मानगर येथील चौकास **"शिवतेज"** असे नांव देणे बाबत.<br>मा.नगरसेविका सै.दिपाली नितीन बारस्कर यांची यादी |
| ११ | पद्मावती पेट्रोल पंप चौक ते श्रीराम चौक या संपुर्ण पाईपलाईन रस्त्याला **"पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर मार्ग"** असे नामकरणे करणे बाबत...<br>मा.श्री.दिगंबर नारायण ढवण उपशहर प्रमुख शिवसेना यांची यादी |
| १२ | वॉर्ड नंबर २० येथील पारशाखुंट रस्त्याला थोर समाजसेवक महेबुबभाई करीमभाई बागवान (दलाल) नांव देणे बाबत.<br>मा.नगरसेवक श्री.श्रीपाद शंकर छिंदम उपमहापौर यांची यादी.<br>मा.नगरसेवक श्री.सुवेंद्र गांधी यांची यादी. |
| १३ | अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील जुन्या पिंपळगाव रस्त्याचे प.पु.श्री.रविशंकरजी मार्ग असे नामकरण करणे बाबत<br>१) मा.नगरसेविका सौ.शारदाताई दिगंबर ढवण यांची दि.२२/१२/२०१६ ची यादी.<br>२) मा.नगरसेविका श्रीमती.गुंदेचा मंगला सतिष यांची दि.३०/०१/२०१७ ची यादी |
| १४ | बुधवार दिनांक ०८/०३/२०१७ रोजी अमरधाम (नालेगांव) येथील दशक्रीया विधीच्या वेळी विलायती चिंचाची फांदी अंगावर पडून जखमी रुग्णास आर्थिक मदत देणे बाबत... |

| | |
|---|---|
| १५ | जिल्हाधिकारी कार्यालय ते स्टेट बँक चौक ते चांदणी चौक ते नगर कॉलेज पर्यंत रस्ता मजबुतीकरण, डांबरीकरण रुंदीकरणासह जलनिस्सारण व्यवस्था करणेचे कामाबाबत<br>संदर्भ :- १) मा.जिल्हाधिकारी यांचे पत्र क्र.३४६८ दिनांक ०५/१२/२०१६ २)मा.जिल्हाधिकारी यांचे पत्र क्र.५०२९ दिनांक ३१/१२/२०१६. ३) मा.जिल्हा दंडाधिकारी यांचे पत्र क्र.१४ दिनांक १३/०१/२०१७ |
| १६ | अहमदनगर नगररचना योजना क्र.३ अंतिम भुखंड क्र.१२५ या जमिनीच्या मंजूर रेखांकनातील मनपा मालकीची खुली जागा (क्षेत्र ११६७.९० चौ.मी.) उद्यान व योग केंद्रासाठी विकसीत करणेस महावीर इंटरनॅशनल या सेवाभावी संस्थेस परवानगी देणे बाबत.<br>१) मा.महापौर मनपा यांचे पत्र क्र.११० दि.२८/१२/२०१६.<br>२) मा.श्री.अनिलजी शिंदे सभागृह नेता मनपा यांचे पत्र क्र.११० दि.२८/१२/२०१७ |
| १७ | एकात्मिक गृहनिर्माण व झोपडपट्टी विकास कार्यक्रम (IHSDP) फेज-२ अंतर्गत प्रकल्पासाठी झालेल्या अतिरिक्त खर्चास मा.महासभेची मान्यता मिळणे बाबत... |
| १८ | सेवानिवृत्त (मयत) मनपा कर्मचारी कै.श्री.मुरली नागु वावरे, सफाई कामगार यांचे कुटुंबनिवृत्ती वेतन व मृत्यू-नि-सेवा उपदान (ग्रॅच्युईटी) अदा करणे बाबत |
| १९ | सावेडी स.नं.२८९ येथील कचरा डेपोकडे जाणारा रस्ता १४ वा वित्त आयोग अंतर्गत तपोवन रोड, जुना पिंपळगांव रस्ता ते भिस्तबाग महाला पर्यतचा रस्ता मजबुतीकरण व डांबरीकरण करणे बाबत. |
| २० | फटाका स्टॉलची अनामत परत करणे बाबत.. श्री.सागर सुधाकर दुस्सल यांचा दिनांक ०८/११/२०१६ चा अर्ज. |
| २१ | अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील कुष्ठपिडीत, अपंग रुग्ण व मनोरुग्ण (वेडे) यांना अर्थसहाय्य देणे बाबत<br>संदर्भ :- १) जा.क्र.आरोग्य विभाग १३१६ दिनांक २०/०३/२०१७, २) वैद्यकीय अधिकारी, नागापुर आरोग्य केंद्र यांचे दिनांक १३/०६/२०१७ चे पत्र. ३) कै.बा.दे.दवाखाना जा.क्र.२९५ दिनांक २२/०६/२०१७. |
| २२ | अहमदनगर शहरातील सशुल्क वाहनतळाचे शुल्क (फी) निश्चित करणे बाबत |
| २३ | १४ व्या वित्त आयोगामधुन प्राप्त होणा-या अनुदानाची घनकचरा व्यवस्थापन अंतर्गत आर्थिक नियोजन करणे बाबत |
| २४ | मा.सदस्य यांचे रजेचे अर्ज |

मा.महापौर सो, यांचे मान्यतेने.
दिनांक : ०६/०९/२०१७

प्र.नगरसचिव,
अहमदनगर महानगरपालिका.

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**

**प्रस्ताव क्रमांक : ०५** **दिनांक : १४ / ०९ /२०१७.**

- - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - -

**प्रस्तावाचा विषय :-** दुखवटयाचा प्रस्ताव

| अ.नं. | विषय |
|---|---|
| १ | पुण्याचे उपमहापौर नवनाथ कांबळे यांचे दिनांक १७-०५-२०१७ रोजी झालेल्या दु:खद निधनानिमित्त दुखवटयाचा प्रस्ताव. |
| २ | ज्येष्ठ अभिनेत्री रिमा लागू यांचे दिनांक १८-०५-२०१७ रोजी झालेल्या दु:खद निधनानिमित्त दुखवटयाचा प्रस्ताव. |
| ३ | ज्येष्ठ अभिनेते मधुकर तोरडमल यांचे दिनांक ०३-०७-२०१७ रोजी झालेल्या दु:खद निधनानिमित्त दुखवटयाचा प्रस्ताव. |
| ४ | ज्येष्ठ व्यंगचित्रकार मंगेश तेंडुलकर यांचे दि.१०-०७-२०१७ रोजी झालेल्या दु:खद निधनानिमित्त दुखवटयाचा प्रस्ताव. |
| ५ | ज्येष्ठ अभिनेत्री उमा भेंडे यांचे दिनांक २०-०७-२०१७ रोजी झालेल्या दु:खद निधनानिमित्त दुखवटयाचा प्रस्ताव. |
| ६ | ज्येष्ठ लेखिका शिरीष पै यांचे दिनांक ०२-०९-२०१७ रोजी झालेल्या दु:खद निधनानिमित्त दुखवटयाचा प्रस्ताव. |
| ७ | मागासवर्ग आयोगाचे अध्यक्ष व मुंबई उच्च न्यायालयाचे माजी न्यायमुर्ती संभाजीराव म्हसे पा.यांचे दिनांक ०३-०९-२०१७ रोजी झालेल्या दु:खद निधनानिमित्त दुखवटयाचा प्रस्ताव. |
| ८ | वांबोरी घाटात पाण्यात बुडून मृत्यूमुखी पडलेले केडगांव व माळीवाडा येथील रहिवासी १) शुभम मोरे, २) युवराज साळुंके, ३) रामारेड्डी, ४) गणेश पोपट वायाळ यांचे दिनांक २८-०८-२०१७ रोजी झालेल्या दु:खद निधनानिमित्त दुखवटयाचा प्रस्ताव. |

---*---

**चर्चा :-**

**मा.महापौर साहेब :-** विषय वाचन करा.

विषय क्रमांक ०५ दुखवटयाचे प्रस्ताव वाचन करण्यात आले.

**मा.श्री.बाळासाहेब बोराटे :-** अनिल शेवते, न्यायाधीश म्हसे पाटील यांची नांवे घ्या. अजय बोरुडे, देवतरसे, सांगळे, केळकर, बडोदा बँक कॉलनी, सागर हॉटेल समोरील गायकवाड यांची नांवे घ्या.

**मा.श्री.अभिषेक कळमकर :-** जोशी अहमदनगर महानगरपालिका कर्मचारी यांचे नाव घेण्यांत यावे. निंबोडी शाळा दुर्घटनेतील विद्यार्थ्यांचा समावेश करावा.

**मा.श्री.संजय घुले :-** सतिष धोकरीया यांचे नावाचा उल्लेख करावा.

**मा.श्री.दिप चव्हाण :-** मनपा कर्मचारी श्री.जोशी व अनिल शेवते यांचा स्वाईन फ्ल्यु आजाराने मृत्यु झाला. न्युमिनीया म्हणून अगोदर ट्रीट झाले आपण काय कर्तव्य केले डॉक्टर दिपक यांनी ज्या दिवशी त्यांचा मृत्यू झाला डॉ.दिपक यांनी सदर पेशंड स्वाईन फ्ल्युने गेल्याचे सांगीतले आपण काय दखल घेतली हा रोग कशाच्या माध्यमातुन निर्माण होतो.

**आरोग्य अधिकारी डॉ.श्री.बोरगे :-** स्वाईन फ्ल्यु हा आजार हवेमार्फत लागण होते. एप्रिल महिन्यापासून राज्य केंद्र शासनामार्फत या आजाराचे संदर्भात काय करावे व काय करु नये याबाबत वेळोवेळी दिलेल्या सूचनेनुसार या संदर्भात एप्रिल-मे च्या दरम्यान आपण कार्यशाळा घेतली व्हायरस असुन यामध्ये २-३ प्रकार आहे. आताचा

मिशीगन टाईपचा व्हायरस आहे. लसीकरण मुळे प्रोटेक्शन मिळते. या आजारावर १००% निदान अद्याप सिध्द झाले नाही. सर्दी खोकल्याचे पेशंटपैकी दुस-या तिस-या पेशंटला असेल्टाईन औषध अन्न व औषध प्रशासनाने उपलब्ध करुन दिले आहे.

डॉ.दिपक यांनी संपूर्ण खबरदारी घेतली त्या व्यक्तीच्या शरीरपरत्वे लसीकरणाची औषधे लागू होतात. त्या औषधाला त्यांनी रिस्पॉन्स दिला नाही. जनतेत जागृती केली आहे. सरकारी दवाखाने, प्रायव्हेट डॉक्टरांनी एप्रिल पासून जनजागृती चालू केली आहे. नगरमध्ये ब-याचपैकी प्रतिबंधात्मक उपाययोजना लागू केल्या असल्याने स्वाईन फ्ल्यु पेशंटचे प्रमाण कमी आहे.

**मा.श्री.दिप चव्हाण :-** हा आजार डुकरापासून होतो आमच्या वॉर्डातील डुकरा बाबत तक्रारी केल्या त्यावर पुढे काय कार्यवाही करण्यांत आली.

**आरोग्य अधिकारी डॉ.श्री.बोरगे :-** हा डुकरापासुन होत नाही. हा आजार संपर्कातून होतो.

**मा.श्री.दिप चव्हाण :-** सारडा कॉलेज मागे असणा-या डुकरासंदर्भात तक्रारी केल्या नाले सफाईतुन काढलेला गाळ तसाच पडून होता. कचरा उचललेला नाही. काय उपाय योजना केल्या आपत्कालीन संदर्भात आयुक्तांनी माझे प्रभागात भेट दिली पण काही कार्यवाही झालेली नाही. तुमच्या कर्मचा-यांचे श्रध्दांजलीसाठी नाव घ्यायला विसरता. डुकराच्या संदर्भात किती लोकांना नोटीस काढल्या १० दिवसात केलेल्या कार्यवाही बाबत बोला. राज्य- केंद्र शासनाच्या उपाय योजना आपण आम्हाला सांगता बजेटमध्ये करोडोंची तरतुद करतो. टिम वर्क आहे की नाही. कामाची सिस्टीम आहे की नाही.

महानगरपालिका कर्मचारी जोशी यांचे प्रॉव्हेडंड फंड पेन्शन ग्रॅज्युएटीची रक्कम त्यांना लवकरात लवकर द्या. तरच त्याला खरी श्रध्दांजली ठरेल. डॉ.बोरगेंना सांगतो लाईटली घेवू नका. जोशीच्या घरच्यांना अनुकंपा तत्वावर नोकरी द्यावी. त्यांच्या घरच्यांना तात्काळ पेन्शन लागू करावी.

अनिल शेवते हे सामाजिक कार्यकर्ते होते युवा अवस्थेत दैदिप्यमान कार्य त्यांनी केले. त्यांना श्रध्दांजली अर्पण करतो.

**मा.सौ.छाया तिवारी :-** कुटुंबातील माणुस गेल्यानंतर त्यावेळेस स्त्रीच जीवन काय होते हे सांगायची गरज नाही. अनिल शेवते यांच्या मृत्यूची कोणीही उणीव भरु शकत नाही. स्वाईन फ्ल्यु हा आजार डुकराचे शारीरीक क्षमतेमुळे या आजाराला स्वाईन फ्ल्यु आजार नाव पडले. पैसे कमवण्यासाठी आम्ही येथे आलो नाही. कोणत्याही प्रकारची लालूच देवून आलेलो नाही. ग्रामपंचायतला लाजवेल असा कारभार महानगरपालिकेचा चालू आहे. रस्त्यावरील खड्ड्यांची अत्यंत गंभीर समस्या आहे.

**आरोग्य अधिकारी डॉ.श्री.बोरगे :-** स्वाईन फ्ल्युची पहिली केस परदेशात आढळली. यात आजारावर संशोधन होत गेले व हा आजार डुकरापासून होत नाही हे स्पष्ट झाले सुरुवातीला हा आजार स्वाईन फ्ल्यु गणला जात होता.

**मा.श्री.कुमार वाकळे :-** तिवारी मॅडम जे बोलतात ते फक्त बोरगेंशी निगडीत आहे असे नाही प्रशासनातील सर्वांनी याची दखल घ्यावी.

**मा.सौ.दिपाली बारस्कर :-** फॉगींग कर्मचारी यांच्या कामाच्या वेळा द्या.

**मा.श्री.योगीराज गाडे :-** फॉगींग मशीन जनता खुष करण्यासाठी आहे असे डॉ.बोरगे सांगतात याबाबत खुलासा करा.

**मा.श्री.सुवेंद्र गांधी :-** फॉगींग मशीनचा रेट काय.

**आरोग्य अधिकारी डॉ.श्री.बोरगे :-** प्रत्येकी यंत्राची किंमत रुपये ४० हजार आहे.

**मा.श्री.विजय गव्हाळे :-** सामाजिक न्याय विभागाची बिल्डींगसाठी महानगरपालिकेने १८ मीटरचा रस्ता टाकला. त्यामुळे कामाला सुरुवात करता आली नाही. तुम्ही रस्ता रद्द करतो असे आश्वासन दिले.

**मा.महापौर साहेब :-** विषय सभेत घेणार आहोत.

**मा.श्री.अभिषेक कळमकर :-** गॅलरी ओपन करा.

**मा.महापौर साहेब :-** मागील सभेत गॅलरीत टाळया वाजविल्या व मा.सदस्यांच्या मागणीमुळे गॅलरी बंद ठेवण्यांत आली होती. हा विषय झाला की त्यांना आत घेवू.

**मा.श्री.उमेश कवडे :-** कामगार मकरंद जोशी तसेच सतिष धोकरीया, अजय बोरुडे, सुरेश चव्हाण, देवतरसे, सांगळे, रिमा लागू, तोरडमल, शिरीष पै. मागासवर्ग आयोग अध्यक्ष म्हसे तसेच गौरी लंकेश, शेख इम्तीयाज या सर्वांना सभागृहा तर्फे श्रध्दांजली. मुंबई तील घटना, वांबोरी घाटातील युवकांना श्रध्दांजली.

**मा.श्री.अभिषेक कळमकर :-** आम्ही सदस्य नवीन आहोत दुखवटयाचे प्रस्तावाचा सुरुवातीस जे कार्य त्यांनी केले त्यांनी शहरासाठी दिलेल्या योगदानाचा दुखवटयाच्या प्रस्तावा वरील चर्चेत उल्लख केला जातो. ही प्रोसीजर बदलू नये. गेल्या अडीच महिन्यापूर्वी एका निष्पाप महिलेचा प्रशासनाच्या हलगर्जीपणामुळे मृत्यू झाला मा.आमदार व आम्ही या घटनेस जबाबदार कोण याचा तिथे जावून खुलासा विचारला महानगरपालिका याला कारणीभुत आहे. या गोष्टीकडे आपण कसे पहातो. अशा प्रकारे जे मृत्यू होतात त्यास प्रशासन जबाबदार ठरते आपण बिनधास्त म्हणता हा माझा विषय नाही. या महिलेस व नवजात शिशुस सभागृहाचे वतीने श्रध्दांजली अर्पण करतो.

**मा.श्री.शेख नजीर अ.रज्जाक :-** चॉंद सुलताना हायस्कुलची भिंत पडली ४ नंबरची शाळा आम्हाला द्यावी. ७०० - ८०० विद्यार्थ्यांना बसण्यासाठी जागा नाही. भविष्यात निंबोडी सारखी घटना घडू शकते. आयत्या वेळच्या विषयात हा विषय घेण्यात यावा.

**मा.महापौर साहेब :-** घेण्यात यावा.

**मा.श्री.योगीराज गाडे :-** अमृत योजना मंजूर झाली त्याबाबत मा.महापौर, मा.आयुक्त यांचे आभार एका महिला महापौरांनी १०७ कोटी निधी आणला.

**मा.श्री.अभिषेक कळमकर :-** अमृत योजनेला आमच्या काळातही गती मिळाली श्रेय तुम्ही घेवू नये नगरकर ठरवतील.

**मा.महापौर साहेब :-** नगरकर वेळ आल्यावर ठरवतील.

**मा.श्री.संपत बारस्कर :-** पाणी योजनेतुन अमृत सर्वांना मिळणार आहे.

**मा.महापौर साहेब :-** या आधी जेवढे महापौर झाले सर्व नगरकरांना माहिती आहे.

**मा.श्री.दिलीप सातपुते :-** मा.आयुक्त साहेब, पहिल्यांदा सभागृहात उपस्थित आहे त्यांचा सत्कार करावा.

**मा.श्री.बाळासाहेब बोराटे :-** सभागृह नेते यांची नव्याने निवड झाली त्यांचा सत्कार करावा.

**मा.महापौर साहेब :-** गॅलरी उघडा.

**मा.सौ.दिपाली बारस्कर :-** नवनीतभाई बार्शिकर यांनी जन्मापासून मृत्यू पर्यंतच्या अनेक सुविधा नगरपालिकेमार्फत नगरकरांना उपलब्ध करुन दिल्या. अमृत योजना मंजूरीबद्दल मी महापौर यांचे अभिनंदन करते.

**मा.महापौर साहेब :-** अगोदर अडीच तीन वर्ष अमृत योजनेचे काम थांबले होते. त्यांना तुम्ही विचारा.

**मा.श्री.उमेश कवडे :-** मी माझे मनोगत व्यक्त करतो. सभागृह नेते पदी माझी नव्यानेच निवड झाली आपले कुणाचे बांधाला-बांध नाही आपण सभागृहात अग्रेसिव्ह होतो. एक वर्षाने निवडणूकीत आपणाला सामोरे जायचे आहे. मा.पंतप्रधान, मा.श्री.उध्दवजी ठाकरे साहेब, मा.मुख्यमंत्री, मा.आ.संग्राम भैय्या जगताप, मा.खा.दिलीपजी गांधी, मा.आ.अनिल भैय्या राठोड, यांचे सर्वांचे आभार.

कुठल्याही प्रकारचा राग लोभ आपणात असू नये आपण प्रशासनाला प्रश्न विचारणे. आपले आपल्यात वाद करण्यात मजा नाही. आपण नागरीकांचे प्रतिनिधी आहोत आपण सर्वांचा सन्मान ठेवू मनपाची आर्थिक परिस्थिती बिघडली आहे. भविष्यात देखील चांगले काम करुन दाखवू.

**मा.महापौर साहेब :-** विषय वाचा. विषय वाचू द्या.

**मा.श्री.अभिषेक कळमकर :-** वारुळाचा मारुती समोरील गटारीत बैल अडकला आहे. संबंधित विभागाचे अधिकारी यांनी त्वरीत कार्यवाही करावी.

**मा.श्री.विजय गव्हाळे :-** नगरसचिव विभागाकडे ५५ विषय प्रलंबित आहेत मा.महापौर यांनी सामाजिक न्यायभवन १८ मीटर रस्ता रद्द करणेबाबतचा विषय पत्रिकेवर विषय घेतला नाही.

**नगररचनाकार :-** सामाजिक न्याय भवनाला आपण मंजूरी दिली आहे. याबाबत दोन तीन बैठका झालेल्या आहेत. आपण जो फेरबदल केला तो अंतीम नाही. दोन पेपरला द्यावे लागणार आहे. गॅझेट मध्ये प्रसिध्द करावे लागेल. ठराव मा.शासनाकडे पाठवावा लागेल असे महापौर मॅडम यांना सांगीतले आहे.

**मा.श्री.संपत बारस्कर :-** आयत्या वेळच्या विषयात घ्या.

**मा.सौ.छाया तिवारी :-** गॅलरी रिकामी करा. गोंधळ नको.

**मा.श्री.अभिषेक कळमकर :-** गॅलरीत आलेले आहेत त्यांनी गोंधळ घालू नये.

**मा.श्री.बाळासाहेब बोराटे :-** आता वर तेथे बांधकाम करता येईल का ?

**नगररचनाकार :-** मंजुरी शिवाय बांधकाम सुरु करता येणार नाही. ९ मीटर रस्ता रद्द करणेसाठी शासनाकडे प्रस्ताव पाठवावा लागणार आहे.

**मा.श्री.गणेश भोसले :-** आपण एनओसी देणार आहोत. मग शासनाकडे कशाला पाठवायचा.

**नगररचनाकार :-** आपल्याला सर्व प्रोसीजर करावी लागेल. माझे अधिकारात नाही. शासनाकडून परवानगी घ्यावी लागणार आहे.

**मा.श्री.बाळासाहेब बोराटे :-** निधी लॅप्स झाला तर काय करणार, ठराव करा व त्यांना एन.ओ.सी. देवून टाका.

**नगररचनाकार :-** आपण शासनाकडून कलम ४७ खाली मंजूर करुन घेवू.

**मा.श्री.दिप चव्हाण :-** रस्ता होता. एफएसआय कसा होता. १८ मीटर रस्त्याला काही अडचण आहे का. १८ मीटर रस्ता रद्द झाला असे कळविले तर काय होईल.

**नगररचनाकार :-** अडचण नाही. कलम ३७ अन्वये शासनाचे अधिकार आहेत.

**मा.श्री.दिप चव्हाण :-** मग तुम्ही काय आश्वासन देणार

**नगररचनाकार :-** मा.आठवले साहेबांनी सी.एम.साहेबांना पत्र दिले आहे.

**मा.श्री.दिप चव्हाण :-** तुम्ही आता रिपोर्ट मध्ये काय उल्लेख केला आहे.

**नगररचनाकार :-** १८ मीटर रस्ता रद्द करा. मा.महासभेच्या मंजूरी नंतर शासनाकडे पाठवा. जसे मला बांधकाम परवानगीचे अधिकार आहेत. तसेच शासनाला रस्ता रद्द करण्याचा अधिकार आहे. निधी शासनाचा आहे रस्ता रद्द करणे माझे अधिकारात नाही.

**मा.श्री.बाळासाहेब बोराटे :-** आम्ही चूकीची मागणी केली का ?

**नगररचनाकार :-** आज परवानगी दिलेली आहे.

**मा.श्री.कुमार वाकळे :-** माझे वॉर्डात चैतन्य क्लासी पासुन २०० मीटरचा रस्ता होता तो १०० मीटर केला कमी केला तो कसा केला ?

**नगररचनाकार :-** १९९८-९९ मध्ये डी.पी.मध्ये ६.०० मीटरचा ३.०० मीटर केला त्यावर हरकती सुचना मागवल्या. सर्व प्रक्रीया पुर्ण करुन रस्ता कमी केला.

**मा.श्री.दिप चव्हाण :-** मा.आयुक्त व उपायुक्त यांनी आपला परिचय द्यावा.

**मा.श्री.विजय गव्हाळे :-** १८ मीटरचा रस्ता रद्द करावा अशी मी विनंती करतो. या इमारतीच्या उभारणीमुळे शहराच्या वैभवात भर पडणार आहे. अनेक महामंडळाचे ऑफिसेस त्या ठिकाणी होणार आहेत. धोंगडे साहेबांनी खुलासा करावा.

**नगररचनाकार :-** सामाजिक न्याय भवनाच्या विषयासाठी मा.महापौर यांचेकडे यापुर्वी बैठका झाल्या. मा.महापौर यांनी मलाही सूचना दिल्या. सदर बाजूने ९ मीटर व दुस-या बाजूने ९ मीटर रस्ता आहे. रस्त्यात जागा जाते वेगवेगळया कारणासाठी स्थळ निरीक्षण मा.महापौर करणार आहेत. त्यासाठी हा विषय या सभेत घेतला नाही.

**मा.श्री.विजय गव्हाळे :-** रस्ता त्वरीत नामंजूर करण्यांत यावा.

**मा.महापौर साहेब :-** तो विषय पुढच्या सभेत घ्या.

**मा.श्री.सचिन जाधव :-** आयत्या वेळचा विषय घेवून मंजूरी देवून टाका. हा राजकारणाचा विषय नाही.

**मा.श्री.विजय गव्हाळे :-** हा रस्ता रद्द करा रुलिंग द्या.

**मा.श्री.कुमार वाकळे :-** हे लोक यापुर्वी महानगरपालिकेत आले नव्हते. त्यांचेवर अन्याय झाला म्हणुन ते महानगरपालिका सभागृहात आले.

**मा.महापौर साहेब :-** गोंधळ घालू नका. यापुर्वी आम्ही त्यांचेशी चर्चा केली आहे. विषय आम्ही घेणार आहोत.

**नगररचनाकार :-** महापौर मॅडम यांच्या सोबत सकारात्मक मिटींग झाल्या आहेत. न्याय भवनचा प्लॅन आम्ही मंजूर केला १८ मीटर रस्ता ९-९ मीटर दाखवुन ९ मीटर रस्त्यात क्षेत्र वाया जाते. १८ मीटरचा रस्ता रद्द करण्याचा प्रस्ताव आम्ही ठेवला आहे. अशोकराव गायकवाड वगैरे संघटनेच्या पदाधिकारी यांचेशी चर्चा झाली आहे. असे रुलिंग आता देता येणार नाही.

**मा.श्री.सागर बोरुडे :-** यापुर्वी सामाजिक न्याय भवना संदर्भात समाज कल्याण अधिकारी यांचे समवेत नगररचनाकार यांची चर्चा झाली. १५ दिवसात विषय घेवू असे मा.महापौर यांनी सांगीतले.

**मा.महापौर साहेब :-** हा ठराव शासनाकडे पाठवावा लागणार आहे. तो रस्ता कट करु व प्रस्ताव शासनाकडे पाठवू. ९ मीटर रस्ता रद्द करुन शासनाकडे प्रस्ताव पाठवू.

**मा.श्री.गणेश भोसले :-** शासनाकडे प्रस्ताव का पाठवावयाचा ते सांगा. इथ का होत नाही.

**नगररचनाकार :-** एमआरटीपी ॲक्ट त्याचे कलम ३७ ची प्रोसीजर करीत आहोत. मंजूर विकास योजनत फेरबदल करावयाचे असतील तर अगोदर मा.महासभेचा ठराव घेवून शासनाकडे पाठवावा लागणार आहे. ठराव शासनाकडे पाठवणार आत्ताच महापौर यांनी रुलिंग दिले तर कलम ३७ नुसार शासनाकडे पाठवणार.

**मा.श्री.कुमार वाकळे :-** आज ठराव केला त्यानुसार पुढील कार्यवाही साठी वेळ जाईल.

**नगररचनाकार :-** ठराव झाल्यानंतर प्रोसीजर चालू राहील. ठराव प्लॅन व मा.शासनाचे जे अधिकार आहेत त्या अधिकारात शासनाकडे पाठवू. पब्लीक इंटरेस्ट मधला विषय असल्याने शासन स्तरावर लवकर हेअरींग होईल.

**मा.श्री.बाळासाहेब बोराटे :-** परवानगी देवून टाका. तुमच्या अधिकारा दरम्यानच्या काळात त्यांना परवानगी देण्यांत येत आहे.

**मा.श्री.कुमार वाकळे :-** शिवस्मारका सारखे या विषयाचे व्हायला नको. प्रोसीजर फास्ट करा.

**नगररचनाकार :-** प्रोसीजर एकीकडे करावी लागणार दोन पेपरला द्यावे लागेल. गॅझेटमध्ये प्रसिध्दी द्यावी लागेल. हरकती मागवाव्या लागतील.

**मा.श्री.गणेश भोसले :-** बांधकाम सुरु करायला काही अडचण नाही.

**नगररचनाकार :-** बांधकाम परवानगी ऑलरेडी दिलेली आहे. रस्ता रद्द करणे बाबत पुढची प्रक्रीया जलद करु.

**मा.श्री.कुमार वाकळे :-** ठेकेदारास पालिका हमीपत्र देवू शकते का? ठेकेदाराला काम चालू करायला सांगीतले तर तसे हमीपत्र देवू शकते का ?

**नगररचनाकार :-** शासनाचे अधिकार आहेत. शासनाचे मंजूरी शिवाय काम सुरु करता येणार नाही.

**मा.श्री.दिप चव्हाण :-** प्लॅन सबमीट केला होता. एफएसआय किंवा रस्ता होता.

**मा.सौ.रुपाली वारे :-** कै.बाळासाहेब देशपांडे दवाखान्यातील कर्मचारी या येथे आल्या आहेत. त्यांच्या मेट्रन त्यांना त्रास देतात. जबाबदार अधिकारी यांनी उत्तर द्यावे.

**मा.महापौर साहेब :-** विषय चालू होवू द्या.

**मा.सौ.मनिषा काळे :-** आपत्कालीन व्यवस्था त्याबद्दल माहिती द्या.

**श्री.आर.जी.सातपुते :-** शहरातील चार झोन व त्यांचेकडील स्टाफ व आरोग्य विभागाकडील कर्मचारी यांचे टीमवर्कने काम केले जाते. कायम स्वरुपी स्टाफ किंवा निधी आपत्कालीन साठी नाही. एक झोन अधिकारी, इजिनियर, एसआय व केअरटेकर कडील संपूर्ण स्टाफ आपण नेमला आहे.

**मा.श्री.कुमार वाकळे :-** एकाच वेळेला सर्व ओढे-नाल्याला पुर आला तर काय करणार.

**श्री.आर.जी.सातपुते :-** आपलेकडील सर्व कर्मचारी यासह जातो.

**मा.सौ.दिपाली बारस्कर :-** नागरिकांच्या प्रश्नाला उत्तर दिले जात नाही. नागरिकांच्या घरातील पाणी काढायला आमच्याकडे लोक नाहीत. अग्निशमन विभागाकडुन उडवा उडवीची उत्तरे देतात. इतर भागातील पाणी मोटर लावून काढले जाते. मात्र आमच्या प्रभागातील काम केले नाही.

**मा.श्री.सुनिल कोतकर :-** किती नाल्यांची साफसफाई करण्यांत आली. सर्व जनता नगरसेवकांच्या घरी जावून बसते.

**मा.श्री.अभिषेक कळमकर :-** उशीर का झाला ते सांगा.

**उपमहापौर श्री.श्रीपाद छिंदम :-** नाले सफाईचा ठेका कोणास दिला व त्याचे बील किती काढले ते सांगा.

**अतिक्रमण विभाग प्रमुख श्री.इथापे :-** केडगांव भागामध्ये अद्यापपावेतो तेथे मशीनरी गेली नाही. ही वस्तुस्थिती आहे. उपनगराची स्वच्छता करायची नाही असे नाही. आम्ही ठेकेदाराला उपनगरातील साफसफाई बाबत सूचना दिल्या संबंधितांच्या सारखे मागे लागलो आहोत. त्यांनी मशीनरी कमी दिल्याने काम सुरु करता आले नाही. जे ओढे नाले साफ केले त्याठिकाणी अडचणी निर्माण झाल्या नाही.

**मा.श्री.योगीराज गाडे :-** मुळ प्रश्न प्लॅस्टीक वापरावर बंदी घातली नाही. प्लॅस्टीक वापरावर बंदी करण्यात यावी. शासनाने वेळोवेळी याबाबत गाईडलाईन दिल्या आहेत.

**मा.महापौर साहेब :-** जे जे नाले राहिले ते साफ करुन घ्या.

**मा.सौ.मनिषा बारस्कर :-** ओढयाची लांबी रुंदीची मोजणी करा पात्रात भरपूर अतिक्रमणे झाली आहेत.

**मा.श्री.सुनिल कोतकर :-** दोनदा पॅचिंगचा केडगाव भागातील प्रश्न घेतला. जे काम केले ते निकृष्ठ दर्जाचे पॅचींग केले आहे.

**मा.श्री.कुमार वाकळे :-** मी नाले सफाईची शुटींग काढली आहे. नाले साफ केल्यासारखे वरवर उकरुन नाले सफाई केल्याचे भासवले जाते.

**मा.सौ.दिपाली बारस्कर :-** गाळ जो काढला जातो तो उचलण्यात यावा.

**अतिक्रमण विभाग प्रमुख श्री.इथापे :-** उपनगरातील २-४ दिवसात ओढे नाले साफसफाईचे काम घेण्यात येतील. कैलास कॉलनीतील काही ठिकाणी मशीन जावू शकली नाही. गाळही वाहुन नेण्याची व्यवस्था करण्यात येईल.

**मा.श्री.कुमार वाकळे :-** सावेडी बोल्हेगावला जोडणा-या ओढयाचे ३ फुटापर्यंत काही लोकांनी उकरले नाही. पात्रात झाडे टाकली. त्यामुळे प्रवाह वाहत नाही. ८-१० फुट खोल सफाई झाली पाहीजे. ज्या प्रभागात काम चालू असेल तेथील नगरसेवकाला माहिती द्या. गणेश चौकातील कॉलनी व बोल्हेगाव निम्मे गाव पाण्यात होते. त्या लोकांना पर्यायी राहण्याची व्यवस्था झाली नाही इतर लोकांचे हाल झाले. धान्याचे पोते खराब झाले मी स्वतः दोन जेसीबी लावले बोल्हेगावच्या ओढयाचे कडेने जे पाईप टाकले ते कीती टाकले.

**मा.महापौर साहेब :-** एवढे झाल्यावर विषय घ्या. आज विषय कोणीही घेवू देत नाहीत.

**ज्यु.इंजि.श्री.पारखी :-** सदर ठिकाणी साधारण ११ ते १२ पाईप ४५० एम.एम.चे टाकले.

**मा.श्री.कुमार वाकळे :-** आता किती पाईप टाकावे लागतील.

**ज्यु.इंजि.श्री.पारखी :-** अजुन ३ ते ४ पाईप टाकावे लागतील. साधारण प्रत्येकी अडीच हजार रु. लागतील.

**मा.श्री.कुमार वाकळे :-** १० हजार आता डिपॉझीट मी देतो. ओढा बुजविल्यामुळे अशी अडचण झाली. अगोदर ओढा ओपन करावा लागेल. चार पाईप मध्ये काम होणार नाही.

**ज्यु.इंजि.श्री.पारखी :-** शेवटपर्यंत पाईप न्यायचे असतील तेथ पर्यंत कामासाठी ३० ते ३५ लाख रुपये लागतील. कमीत कमी १०० मीटरचे काम करावे लागेल.

**मा.श्री.कुमार वाकळे :-** त्या ओढयाला १४ व्या वित्त आयोगातून निधी वापरता येतील का.

**ज्यु.इंजि.श्री.पारखी :-** घनकच-या करीता वापरावे लागतील. शासन निर्णयामध्ये तशी तरतुद आहे.

**मा.श्री.कुमार वाकळे :-** पाणी उपसण्याकरीता सावेडी करीता किती मशीन आहे.

**श्री.आर.जी.सातपुते :-** १ मशीन आहे. ८-१० दिवसात ओढे नाले साफ करुन घेवू.

**मा.श्री.कुमार वाकळे :-** ब-याच ठिकाणी लोकांचे पावसात जीव गेले असते, इलेक्ट्रीक करंट उतरले असते अशी जिवीत हानी होण्यापेक्षा काही ओढे-नाले उतारावरील व्यवस्थीत बांधण्याची गरज आहे. उपनगरासाठी इंजिन ची संख्या वाढवा. फायर ब्रिगेड कर्मचारी संख्या वाढवावी. प्रभाग अधिकारी यांना ५० हजार रुपये खर्चाची मर्यादा आहे. त्यामुळे इमर्जन्सी साठी प्रभाग अधिकारी यांना निधी वाढवुन द्यावा. ज्या ठिकाणी जेसीबी पोहोचत नाही तेथे पोकलनने काम करावे लागणार आहे.

**श्री.आर.जी.सातपुते :-** इमरजन्सी साठी रु.५० हजाराचा निधी उपलब्ध करुन दिला.

**मा.श्री.कुमार वाकळे :-** माझ्या प्रभागात एका दिवसात व बारस्कर मॅडमच्या वॉर्डात एकाच वेळी ५० हजार खर्च झाला तर तो खर्च करु शकतो का.

**श्री.आर.जी.सातपुते :-** जी कामे झाली त्या कामाचे बील तयार करुन ते बील मंजूर करुन घ्यायचे आहेत. व पुन्हा रक्कम उपलब्ध करुन घ्यावयाची आहे.

**मा.श्रीमती.नसीम शेख :-** मुकुंदनगर ते दर्गादायरा रोड वरील रेन वॉटरचे पाणी कॉर्नरला सोडल्यामुळे त्या मार्गावर रहदारी होवू शकत नाही. तुम्ही पाईप टाकुन देतो म्हणाले ते केंव्हा करणार.

**ज्यु.इंजि.श्री.पारखी :-** पुढच्या आढवडयात चालू होईल प्रस्ताव झालेला आहे. बुधवार पर्यंत चालू होणार.

**मा.श्रीमती.नसीम शेख :-** नागरिकांनी तो प्रवाह बंद करण्याचा इशारा दिला आहे.

**मा.सौ.दिपाली बारस्कर :-** चेंबरवरील झाकणे केंव्हा बसवणार सिमेंट कधी लावणार.

**मा.महापौर साहेब :-** काम करुन घ्या. पुढचा विषय घ्या.

**मा.श्री.कुमार वाकळे :-** आपत्कालीन कामासाठी प्रभाग अधिकारी दररोज ५० हजार खर्च करु शकतो का?

**श्री.आर.जी.सातपुते :-** इमर्जन्सीसाठी हा निधी आहे. रेग्युलर कामासाठी हा निधी वापरता येणार नाही मी आत्ताच मुख्यलेखाअधिकारी यांचेशी चर्चा केली. अभियंत्यांनी एस्टीमेट तयार करावे.

**मा.श्री.कुमार वाकळे :-** बोल्हेगांव जिल्हापरिषद शाळे शेजारील ओढयात शेण कचरा व गटारीचे पाणी यात जर माणूस पडला तर त्याची जबाबदारी कोणाची आहे.

**मा.सौ.उषा नलवडे :-** कचरा गाडया दोनच आहेत त्याही बंद आहेत. दुसरी समस्या माझे प्रभागात ३ ते ४ मंगलकार्यालय आहेत. कोहीनूर मंगलकार्यालया शेजारील रस्त्यावर लाईट ब-याचदा बंद असते चो-यांचे प्रमाण वाढले आहे. लाईट लावण्यांत यावी. जर प्रश्न सोडले नाही तर आम्हाला आंदोलन करावे लागेल.

**श्री.आर.जी. सातपुते :-** बांधकाम विभागा मार्फत एस्टीमेट करुन काम करुन घेण्यात यावे. अतिक्रमण विभागा मार्फत जे ओढे- नाल्याचे काम चालू आहे त्यांचे कडून करुन घ्यावे.

**मा.श्री.कुमार वाकळे :-** गाळ उपसून घ्यावा लागेल.

**श्री.आर.जी.सातपुते :-** कायमस्वरुपी कामासाठी अंदाजपत्रक अभियंते यांनी बनवून घ्यावे लागेल. प्रभाग अधिकारी यांनी त्यांचे स्तरावर निर्णय घ्यावा.

**मा.सौ.वीणा बोज्जा :-** माझे वॉर्डात ५ ते ६ ठिकाणी चो-या झाल्या. इलेक्ट्रीक विभागाकडुन आमच्याकडे माणसे नाहीत अशी उत्तर देतात. लाईट चालू होत नाही.

**श्री.आर.जी.सातपुते :-** मला फोन आला तर लोक पाठवितो. आपला फोन झाला नाही.

**मा.श्री.विपुल शेटीया :-** यश पॅलेस ते कोठी रोड कुठल्या निधीतुन घेतला आहे.

**श्री.आर.जी.सातपुते :-** नगरोत्थान योजनेतुन घेतला लाईट साठी २० ते २२ लाख खर्च झाला आहे.

**मा.श्री.विपुल शेटीया :-** किती लाईट चालू आहे.

**श्री.आर.जी.सातपुते :-** सध्या लाईट बंद आहे. पुर्ण लाईट बंद नाही एमएसईबी कडे चौकशी केली तेथे होल्टेजचा प्रॉब्लेम आहे. २ वर्षाची वॉरंटी आहे. डी.पी.कमी पडते एम.एस.ई.बी.ट्रान्सफार्मर साठी आपल्याला जागा मागतात.

**मा.सौ.छाया तिवारी :-** अजेंडयावरील विषय घ्या.

**मा.श्री.अनिल बोरुडे :-** दीड महिन्यापासून मी लाईट संदर्भात फोन करतो मटेरियल नाही असे सांगीतले जाते.

**मा.श्रीमती.नसीम शेख :-** माझ्या वॉर्डात टयुब नाहीत. केव्हा मिळणार.

**मा.महापौर साहेब :-** विषय घेवू द्या. तुम्ही मुद्दाम विषय घेवू देत नाही हे मला समजते.

**मा.श्री.अनिल बोरुडे :-** तुम्ही मटेरियल दिले पण ते बसवण्यासाठी कर्मचारी दिले नाही.

**मा.सौ.शारदा ढवण :-** अजेंडयावरील विषय घेण्यात यावे.

**श्री.आर.जी.सातपुते :-** इलेक्ट्रीक विभागाकडे सध्या ९ वायरमन, एक गाडी आहे. २ महिन्यानंतर मटेरियल येते पूर्ण क्षमतेने काम करण्यासाठी आणखी २० ते २२ वायरमन पाहीजेत.

**मा.सौ.दिपाली बारस्कर :-** कर्मचारी गॅरेजला बसून आहेत.

**मा.श्री.योगीराज गाडे :-** २-३ टयुबा रिपेअर करतात निघुन जातात. यश पॅलेस ते आनंदऋषीजी रोड गणपतीत बंद होता.

**मा.श्री.दिप चव्हाण :-** नगरसेवकांच्या एवढया तक्रारी आहेत. पोटतिडकीने बोलतात आयुक्त साहेब गप्प आहेत. इलेक्ट्रीकची किती चर्चा झाली आयुक्त कंट्रोल करायला तयार नाही.

**श्री.आर.जी.सातपुते :-** खतावणी बजेट रजिष्टरला मटेरियल खरेदीसाठी ७० लाख रुपये बजेटमध्ये मंजूरी आहे.

**मा.श्री.दिप चव्हाण :-** आपत्कालीन कर्मचारी बाहेरुन आलेले नाही. फॉरमॅलिटी करतात बागरोजा हडकोत पाणी शिरले तुम्ही रिक्षा फीरवली नाही. धोक्याची सूचना दिली नाही. आयुक्त साहेब तुम्ही दखल घेणार की नाही. तुम्हाला आपत्कालीन संदर्भात पेपर देवून काही कारवाई केली नाही. कर्मचारी नेमायची जबाबदारी तुमची आहे. रस्ते, पाणी , लाईट व्यवस्था पुरवण्याची मुलभुत जबाबदारी तुमची आहे. लाईटच्या पोल वर नंबर टाकण्यासाठी सांगीतले ते तुम्ही केले नाही.

**मा.आयुक्त श्री.मंगळे साहेब :-** मी आयुक्त पदाचा ९ ऑगष्टला कार्यभार घेतला मला बोलण्याची संधी केंव्हा मिळते याची मी वाट पाहतो. मी गेल्या १ महिन्यात माझे कामकाजात एक दिवस असा गेला नाही की शिष्ट मंडळ आले नाही. अधिका-यांकडुन वेळोवेळी माहिती घेतो. पावसाच्या पाणी साठलेल्या ठिकाणी मी भेटी दिल्या कार्यवाही झाली ती का झाली नाही. याची माहिती घेणार व वेळ आल्यास कारवाई करील. शासनाने जबाबदारीचे पदावर माझी नेमणूक केली आहे. खुप दिवसातून सभा झाल्यामुळे नगसेवकांचे प्रश्न समस्या उपस्थित झाल्या. प्रशासन फक्त ऐकुन घेणार नाही. निश्चीत गटारी सफाई करण्यांत येतील. शहर अभियंता पद रिक्त असल्याने अतिरिक्त कार्यभार दिला. ब-याच जणांकडे अतिरिक्त कार्यभार दिला आहे. प्रभारी नेमणूक केली जाते. आहे त्या परिस्थितीत काम करुन घ्यावे लागते. बांधकाम, इलेक्ट्रीक विभागात कर्मचा-यांचा तुटवडा आहे. इतिवृत्तामध्ये समस्या नोंदवाव्यात कार्यवाहीचा आढावा अधिका-यांनी घ्यावा व त्या सोडवाव्यात. आपल्या सर्वांच्या सहकार्याने माझी जबाबदारी पार पाडीन मला फक्त वेळ द्या.

**मा.श्री.शेख नजीर अ.रज्जाक :-** तुम्हाला यायची संधी कोणी दिली. तुम्हाला पॉवर आहेत. तुम्ही म्हणता मला बोलायची संधी नाही दिली. मोहरम सण जवळ आला. रस्त्यात खड्डे पडले, लाईट बंद आहेत. चॉद सुलताना शाळा पडलेली आहे. आयत्या वेळचा विषय घ्या मी लेटर दिले आहे.

**श्री.आर.जी.सातपुते :-** कालच मा.महापौर व अधिकारी यांचे समवेत पाहणी केली.

**मा.श्री.कुमार वाकळे :-** साचलेल्या पाण्यात जर कोणी दगावला तर त्याची जबाबदारी कोणाची.

**श्री.आर.जी.सातपुते :-** प्रभाग अधिकारी व प्रभाग अभियंता यांनी पाहणी करुन मा.आयुक्तांकडे सविस्तर प्रस्ताव सादर करावे. ज्याचे प्रभागात काम आहे त्यांनी कार्यवाही करावी.

**मा.श्री.कुमार वाकळे :-** बोल्हेगांव जिल्हा परिषद शाळेशेजारील ओढयातील घाण कोण भरणार, शेण कोण उपसणार.

**प्र.अ.श्री.सारसर :-** सकशन मशीनने जेवढे पाणी उचलुन घेता येईल तेवढे उचलुन गाळ जेसीबीने काढुन घेवू. पोकलन लावून १८ तारखेपर्यंत करुन घेवू.

**मा.श्री.संजय घुले :-** दारासमोरील गाळ ताबडतोब उचला.

**मा.श्री.योगीराज गाडे :-** गोहत्ये संदर्भात आम्ही मोर्चा आणला एस.पी. व कलेक्टर साहेबांच्या अखत्यारीत विषय येतो तसेच त्यांनी पत्र दिले. कलेक्टर ऑफिस जवळील ड्रेनेज वारंवार चोकअप होते. आयुक्तांनी उत्तर द्यावे.

**मा.आयुक्त श्री.मंगळे साहेब :-** या विषयावर अगोदर डॉ.बोरगे बोलतील.

**आरोग्य अधिकारी श्री.बोरगे :-** राष्ट्रीय हरीत लवाद मध्ये कत्तल खान्याबाबत दिलेल्या निर्देशानुसार ५ कत्तलखाने सील केले. ८०-८५ लोकांनी कत्तलखाने अधिकृत करणे बाबत मागणी केली. यामध्ये एक समिती अति.आयुक्त यांचे अध्यक्षते खाली नेमली आहे. समितीने गावडे साहेबांकडे अहवाल दिला. अवैध कत्तलखाने आढळुन आले तर प्रभाग अधिकारी यांना प्राणी संरक्षण हत्या कायद्या अंतर्गत कारवाईचे अधिकार आहेत.

**मा.श्री.योगीराज गाडे :-** पुढच्या महासभेपर्यंत या विषयावर निर्णय घेण्यांत यावा.

**मा.श्री.सचिन जाधव :-** सर्व कत्तलखान्यांना लायसन्स दिले पाहीजे. स्लॉटर हाउससाठी जागा निश्चीत करा.

**मा.श्री.दिलीप सातपुते :-** पिंपळगावच्या जागेची पाहणी करा व तेथेच स्लॉटर हाउस उभारा. निधी प्राप्त आहे.

**मा.श्री.शेख आरीफ :-** पाहणी केंव्हा करणार रुलिंग द्या. १४ व्या वित्त आयोगातुन खर्च करण्यात यावा.

**मा.श्री.सचिन जाधव :-** नगर कॉलेज समोर पावसाच्या पाण्यात गंभीर परिस्थिती निर्माण झाली त्या ठिकाणी ट्रान्सपोर्टेशन एकाच ठिकाणी ठेवावे. जो बायोमॅट्रीकचे काम करतो त्यालाच हे काम द्या. मुकुंदनगर इ ंडीगेट परिसरात १०"-१० च्या जागेत काम चालू आहे. नगरच्या लोकांचा आरोग्याचा प्रश्न सुटणार आहे. स्लॉटर हाउस साठी निधी उपलब्ध आहे.

**आरोग्य अधिकारी श्री.बोरगे :-** जागा आपली असेल तर साधारण दीड ते दोन करोड ५० जनावरांचे स्लॉटर हाउस साठी लागतील.

**मा.श्री.दिप चव्हाण :-** केंद्र शासनाकडुन निधी स्लॉटर हाउससाठी आला होता. तो परत गेला आहे का याची माहिती द्या.

**मा.श्री.सचिन जाधव :-** अधिकृत लायसन्स द्या.

**प्रकल्प अभियंता श्री.मेहेत्रे :-** वैशिष्टय पुर्ण योजनेतुन ५० जनावरांसाठी दोन करोड मंजूर झाले होते. शासनाकडे प्रस्ताव सादर केला तेथील नागरिकांचा विरोध होता. निधी मिळाला नाही.

**मा.श्री.बाळासाहेब बोराटे :-** जागा उपलब्ध नसल्यामुळे निधी परत जातो. हा विषय तुम्ही मा.सभेपुढे आणला का ?

**मा.श्री.सचिन जाधव :-** डेड ॲनिमल वेस्ट व स्लॉटर हाउस दोन्ही प्रकल्प शेजारी-शेजारी पिंपळगावला ठेवा.

**आरोग्य अधिकारी श्री.बोरगे :-** जागा सुध्दा कमी लागते. १० ते २० गुंठयात प्लॅन्ट होवू शकतो.

**प्रकल्प अभियंता श्री.मेहेत्रे :-** एमपीसीबी पिंपळगावला ॲथॉरिटी देणार नाही. त्या ऐवजी फ-याबागला करणे योग्य होईल.

**मा.श्री.सचिन जाधव :-** ज्या ठिकाणी बायोमॅट्रीक प्लॅन टाकणार त्याच ठिकाणी स्लॉटर हाउस टाका.

**प्रकल्प अभियंता श्री.मेहेत्रे :-** स्लॉटर हाउस साठी रिझर्वेशन नाही.

**मा.श्री.बाळासाहेब बोराटे :-** सन १९९२-९३ ला स्लॉटर हाउसची जागा आनंदऋषीजी हॉस्पीटलला दिली त्यानंतर नगररचना विभागाने आरक्षण टाकले नाही.

**मा.श्री.सचिन जाधव :-** भू संपादनाचे ६ ते ७ कोटी पडून आहे. टीडीआर च्या माध्यमातून मिळालेल्या रक्कमेच्या माध्यमातुन खर्च करता येईल. त्यातुन उत्पन्न चालू होईल.

**मा.श्री.अभिषेक कळमकर :-** आयुक्त साहेब यांनी यातुन मार्ग काढावा.

**मा.आयुक्त श्री.मंगळे साहेब :-** जागेची उपलब्धता व निधीचा प्रश्न आत्ताच्या चर्चेतुन लक्षात आला यामध्ये पुढच्या आठवडयात पिंपळगांव येथील जागेस भेट देवू तिथे जर जागा उपलब्ध होत असेल तर संबंधित अधिका-या समवेत बैठक घेवून कार्यवाही करण्यांत येईल.

**नगररचनाकार :-** कोर्टाने मध्यंतरी आदेश केला स्लॉटर हाउस करा पण ते मनपा हद्दी बाहेर करा असे हायकोर्टाचे आदेश आहेत. त्यामुळे नविन डी.पी.मध्ये आरक्षण ठेवले नाही. पिंपळगाव माळवी येथील जागे संदर्भात अडचण आहे. पाण्याचे साठयापासुन किती जागा असावी याबाबत निर्देश आहेत. फ-याबाग येथील जागेत सीव्हरेज प्लॅन्ट उभारता येईल. रिजनल प्लॅन मध्ये आम्ही बदल करुन घेवू. साडेसात कोटी रक्कम राखीव आहे. तात्पुरती रक्कम आम्ही उपलब्ध करुन देवू शकतो. या ठरावातच इतरही बाबी मंजूर करा.

**मा.श्री.योगीराज गाडे :-** डॉक्टरांच्या परवानगी शिवाय हत्या करीत असतील त्यांना परमीशन देवू नका. ॲनिमल प्रोटेक्शन ॲक्टचे उल्लंघन करणा-यांवर कारवाई करा.

**मा.आयुक्त श्री.मंगळे साहेब :-** आपण मांडलेले मुद्दे तपासुन कारवाई करण्यांत येईल.

**मा.महापौर साहेब :-** दोन -तीन दिवसात जागेची पाहणी करुन योग्य जो निर्णय असेल तो घेवू.

**मा.आयुक्त श्री.मंगळे साहेब :-** ज्या काही जागा आपण सूचविल्या त्या जागेची तपासणी करु.

**मा.सौ.मालन ढोणे :-** एका गल्लीमध्ये १०-१२ कुत्रे असतात. कुत्रे चावल्यानंतर लस उपलब्ध होत नाही. एकदा पकडून ठेकेदार घेवून जातो. पुन्हा दुस-या दिवशी १०-१२ कुत्रे हजर होतात.

**आरोग्य अधिकारी श्री.बोरगे :-** शहरामध्ये कुत्र्यांचे प्रमाण अस्वच्छतेमुळे होते. ज्या ठिकाणी वेस्ट मटेरियल उपलब्ध होते. त्याठिकाणी संख्या जास्त आहे.

**मा.सौ.मालन ढोणे :-** गाडी पाठवली तरी कुत्रे धरले जात नाहीत. सही शिक्के मारुन घेवून जातात.

**आरोग्य अधिकारी श्री.बोरगे :-** प्रभाग अधिकारी श्री.म्हसे यांनी नियोजन करुन कार्यवाही करणे अभिप्रेत आहे.

**मा.श्री.अभिषेक कळमकर :-** सागर हॉटेल समोर कुत्रा चावुन एक मृत्यू झाला. तुम्ही अशी उडवा उडवीची उत्तरे देता. आयुक्त यांनी उत्तर द्यावे.

**मा.श्री.बाळासाहेब बोराटे :-** आम्ही नरसाळे यांचे रु.३० लाखांचे बील न काढणे बाबत पत्र दिले. पण अधिकारी यांनी सेटलमेंट करुन बील काढले.

**मा.आयुक्त श्री.मंगळे साहेब :-** यासाठी जो कंत्राटदार नेमलेला आहे. त्या ठेकेदाराचे काम अटी शर्ती प्रमाणे होते किंवा नाही याची ८ ते १५ दिवसात रिपोर्टींग घेवून, डेली रिपोर्टींग घेवून किती कुत्रे पकडली याचे रिपोर्टींग करणे बाबत आदेशीत करण्यात येईल.

**आरोग्य अधिकारी श्री.बोरगे :-** या पुर्वीचा ठेकेदार अंबादास नरसाळे यांनी केलेल्या दाव्या विरुध्द हायकोर्टात दावा दाखल केला होता. रु.५० लाख पर्यंत जिल्हा कोर्टाला अधिकार असल्याने हायकोर्टाने मॅटर जिल्हा न्यायालयाकडे रेफर केले. मा.आयुक्त यांची खुर्ची जप्त वगैरे करणार होते. महानगरपालिकेकडील विधीज्ञ व नरसाळे यांचेत तडजोड नामा झाला त्यानुसार मुख्यलेखाअधिकारी यांनी कार्यवाही केली.

**मा.श्री.बाळासाहेब बोराटे :-** तडजोड करण्याचा अधिकार कोणाला आहेत. मी पत्र दिले असतांना कार्यवाही केली.

**मा.श्री.अभिषेक कळमकर :-** आपत्कालीनचे कामामुळे ना नागरिकांचे समाधान व ना नगरसेवकांचे पण. या कामावर कोटयावधी रक्कमेची बीले अदा केली जातात.

**मुख्यलेखाअधिकारी श्री.झिरपे :-** कुत्रे पकडण्याचा ठेका श्री.नरसाळे ठेकेदार यांचेकडे होता. सुरुवातीस मनपा प्रशासनाने काम व्यवस्थीत झाले नसल्यामुळे त्यांचे कामाचे बील नाकारले होते. ठेकेदार यांनी त्यांनी केलेल्या कामाचे बील मिळणेसाठी मा.जिल्हा न्यायालयात महानगरपालिके विरुध्दा दावा दाखल केला. या दाव्याच्या आदेशात व्याजासहीत रक्कम देण्या बाबत आदेश देण्यात आले. या आदेशाच्या अंमलबजावणीसाठी ठेकेदार यांनी कोर्टात दरखास्त दाखल केली. याबाबत मा.आयुक्त यांचे दालनात बैठक झाली. व व्याज माफ करणे बाबत ठेकेदार यांचे अंडर टेकींग घेण्यात आले व तीन-चार टप्प्यात रक्कम अदा करणे बाबत निश्चीत झाले.

**मा.श्री.बाळासाहेब बोराटे :-** याबाबत पुढे अपील का केले नाही. कोणाच्या आदेशावरुन तडजोड केली. तसे लेखी आहे का ?

**मा.आयुक्त श्री.मंगळे साहेब :-** अतिरिक्त बीला बाबत आपण जी सूचना मांडली, आपण या प्रकरणाची तपासणी करुन कारवाईचा अहवाल १५ दिवसांत सादर करु.

**मा.श्री.दत्ता कावरे :-** कुत्रे पकडण्याची यंत्रणा महानगरपालिकेने राबवावी यासाठी महानगरपालिकेने स्वतःची यंत्रणा उभारावी.

**मा.सौ.शारदा ढवण :-** मोकाट कुत्र्यांचा विषय गेल्या ९ वर्षापासुन हा प्रश्न चर्चेला येतो. अजेंडयावरील विषय घेण्यास ४ वेळा सांगीतले तातडीने चालू करा. चालू करावयाचे नसेल तर तसे सांगा विषय घ्यायला सांगा.

**मा.श्री.गणेश भोसले :-** ५ व्या व ८ व्या महिन्यात दोन वेळा फेज-२ बाबतचा विषय मा.सभागृहात घेणे बाबत विनंती करतो. योजना कशामुळे रखडली, कोणामुळे रखडली हे सर्वांना समजेल. नगरकरांना मुबलक पाणी केंव्हा मिळणार. पाईप कमी पडले का ? मशीनरी कमी पडल्या. १०० ते १२५ कोटी पाण्यात गेले तर पालिकेचे काय होणार. पाईप गाडले, कसे गाडले हे माहिती नाही. मी एरिया पाहून पाईप टाकण्यास सुचविले पण तसे झाले नाही.

**मा.महापौर साहेब :-** पुढच्या सभेत विषय घेवू.

**मा.श्री.गणेश भोसले :-** आयुक्तांना ८ व्या महिन्यात स्मरणपत्र दिले. पण अद्याप उत्तर मिळालेले नाही. वृक्षगणना किती वर्षात झाली नाही. झाली असेल तर संख्या किती, पालिकेच्या विश्वस्ताला जर याबाबत माहिती मिळत नसेल तर आम जनतेचे काय ? याचे उत्तर सुध्दा दिले गेले नाही.

**मा.महापौर साहेब :-** नगरसेवकांची जी पत्र येतात त्याला उत्तर देणे बाबत प्रशासनाने कार्यवाही करावी.

**मा.आयुक्त श्री.मंगळे साहेब :-** सर्व खाते प्रमुखांना मी सूचना देतो. दोन्ही उपायुक्तांनी याबाबत नोंद करुन घ्यावी. त्यांचेकडुन खाते प्रमुख कामे पार पाडतात किंवा नाही याची पडताळणी करावी व सन्माननीय नगरसेवकांना उत्तरे द्यावी. ८ दिवसात माहिती देण्यात येईल.

सभागृहात गोंधळ

विषय क्रमांक १९ चे वाचन :-

**मा.श्री.सचिन जाधव :-** प्रस्ताव मंजूर करा.

**मा.श्री.शेख नजीर अ.रज्जाक :-** विषय मंजूर करा.

**मा.श्री.संपत बारस्कर :-** मंजूर करा. आमची संमती आहे.

**मा.सौ.शारदा ढवण :-** तपोवन रोडला मंजूरी दिल्याबद्दल सर्वांचे अभिनंदन.

**मा.सौ.दिपाली बारस्कर :-** भिस्तबाग चौक ते महाल व एकवीरा चौक ते तपोवन रस्ता पर्यंत हे दोन्ही रस्ते १४ व्या वित्त आयोगाचे निधीतुन मंजूरी द्यावी.

**मा.महापौर साहेब :-** प्रस्ताव येवू द्या. अधिका-यां समवेत चर्चा करु. अगोदर तपोवन रस्ता घेवू.

**मा.सौ.रुपाली वारे :-** तपोवन रस्ता पूर्ण झाला पाहीजे पूर्ण रस्ता घ्या.

**मा.श्री.संपत बारस्कर :-** रस्ता जुना पिंपळगाव रस्त्यापासून घेतला भिस्तबाग महालापासून इंद्रायणी हॉटेल पर्यंत तसेच महालापासून गजराज फॅक्टरी पर्यंत रस्ता घेण्यात यावा. १४ रस्ते मी सूचविले या पत्राची प्रत मी सर्वांना पाठविली. रस्ते खराब झाले निधी मागणी साठी पत्र दिले. नगरसेवकांचे पत्राला जर उत्तर दिले नाही तर आंदोलन करणार. हे रस्ते कधी करणार नागरिकांना आम्ही याबाबत काय सांगणार. मला या पत्रावर रुलिंग पाहीजे.

**मा.महापौर साहेब :-** सभागृहात असे गोंधळ घालत असेल तर सर्व विषय मंजूर करुन टाकू.

**मा.श्री.दिप चव्हाण :-** सभागृहाचे संकेत मोडत आहेत. २३ वा विषय अगोदर घ्या.

**मा.श्री.श्रीपाद छिंदम, उपमहापौर :-** विषय वाचायला सुरु करा.

**मा.आयुक्त श्री.मंगळे साहेब :-** २ ऑगष्टला आपण रस्ते, ड्रेनेज, पथदिवे याबाबत पत्र दिले. यामध्ये स्वच्छतेचेही विषय आहेत. यावर काय कार्यवाही केली याबाबत एक आठवडयाच्या आत कार्यवाही करण्यात येईल. या पत्रावर १० दिवसात लेखी उत्तर देतो.

**मा.सौ.शारदा ढवण :-** रुलिंग द्या.

**मा.महापौर साहेब :-** सदरील रस्ता कचरा डेपोकडे जाणा-या रस्त्याचे १४ व्या वित्त आयोगातुन काम करण्यांत यावे. एकदाच विषय घ्या. विषय पत्रिकेवरील विषय घेवू देत नाही सगळे विषय मंजूर करु.

सभागृहात गोंधळ

**मा.श्री.श्रीपाद छिंदम, उपमहापौर :-** विषय पत्रिकेवरील विषय घ्या मॅडम.

विषय क्रमांक ६ चे वाचन.

**मा.महापौर साहेब :-** विषय क्रमांक ६ ते २४ मंजूर.

**---*---**

**ठराव :-**

दोन मिनीटे स्तब्ध उभे राहुन श्रध्दांजली वाहण्यात आली.

मा.महासभेत झालेल्या चर्चेनुसार व सदस्यांच्या मागणीनुसार समाज कल्याण विभागाच्या मालकीच्या मौजे सावेडी स.नं.२३१/ब/२अ, २३२/१अ/२३३/अ व २३४/१अ क्षेत्र १ हेक्टरच्या सामाईक जागेतुन प्रस्तावित केलेला १८.०० मीटर रुंदीचा पूर्व-पश्चिम रस्ता वगळणेबाबतच्या महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियमातील कलम ३७ अन्वये कार्यवाही करावी. याबाबत मा.आयुक्त यांनी हरकती/सूचना मागवुन मा.महासभेकडे सादर करावा.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी.

सूचक - मा.श्री.विजय नाना गव्हाळे

अनुमोदक - मा.श्री.सचिन तुकाराम जाधव,

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-
महापौर,
अहमदनगर महानगरपालिका.

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**

**प्रस्ताव क्रमांक :- ०६** **दिनांक : १४/०९/२०१७.**

---

**प्रस्तावाचा विषय :-** जनकल्याण रक्तपेढी, नगर या संस्थेस ३० वर्षे करारनाम्यास मुदतवाढ व नाममात्र भाडे आकारणे बाबत.

सदर्भ १) मा.महापौर कार्या.जा.क्र.२४१ दि.२९/७/१६ रोजीचे पत्र.
२) मा.उपमहापौर श्री.श्रीपाद शंकरराव छिंदम यांचे दि.२६/७/१६ चे पत्र.
३)जनकल्याण रक्तपेढी, नगर यांचे दिनांक २६/०७/२०१६ रोजीचे पत्र.

**---*---**

**प्रस्तावाचा मजकुर :-**

उपरोक्त विषयान्वये विनंती रिपोर्ट सादर करण्यात येतो की, जनकल्याण रक्तपेढी, नगर या संस्थेस ३० वर्षे करारनाम्यास मुदतवाढ व नाममात्र भाडे आकारणेबाबत १) मा.महापौर कार्या.जा.क्र.२४१ दि.२९/७/१६ रोजीचे पत्र. २) मा.उपमहापौर श्री.श्रीपाद शंकरराव छिंदम यांचे दि.२६/७/१६ चे पत्र. ३)जनकल्याण रक्तपेढी, नगर यांचे दिनांक २६/०७/२०१६ रोजीचे पत्र देउन जनकल्याण रक्तपेढीची स्थापना १९९८ साली झालेली असुन गरजु व गरीब रुग्णांना रक्तपेढी मोफत व सवलतीच्या दराने रक्त पिशवी देत आहे. संस्थेस व्यवसायिक दराने आकारणी केलेली आहे. करारनाम्याची मुदत ३० वर्षे वाढवुन द्यावी व व्यवसायिक दराने आकारणी न करता नाममात्र भाडे आकारणे बाबत संदर्भीय पत्र इकडेस प्राप्त झालेले आहे.

तत्कालीन नगरपालिका असतांना सदर कार्यालयास ७ रुम (अंदाजे १२७८.५० चौ.फुट) जागा ३ वर्षे कराराने मा.स्थायी समिती ठराव क्र.३ दि.१७/७/१९९७ अन्वये मा.त्रिसदस्य समितीकडुन भाडे प्रमाणित करुन घ्यावे त्यानुसार दि.२६-८-१९९७ रोजी करारनामा करुन घेवुन दि.७-८-१९९७ रोजी जागा ताब्यात देण्यात आली आहे.

मा.संचालक नगररचना, अहमदनगर यांनी रु.३.७५ प्रती चौ.फुट प्रती महिना इतके भाडे प्रमाणित केलेले आहे त्यानुसार १२७८.५० चौ.फुट x रु.३.७५ प्रती चौ.फुट = रु.४७९५/- इतके दरमहा भाडे जागा ताब्यात घेतल्या पासुन भरण्याबाबत जा.क्र.मार्केट ३३७ दि.३१/१२/१९९७ अन्वये कळविले आहे त्यावर सदर संस्थेने रु.४७९५/- इतके दरमहा भाडे भरु शकत नाही जागा नाममात्र भाडयाने देणे बाबत दि.२५/१/१९९९, १९/२/१९९९ रोजी अर्ज केलेले होते त्यावर सदर संस्थेस करारनाम्यातील अटी व शर्ती पाहता नाममात्र भाडयाने जागा भाडेतत्वावर देता येणार नाही अशाबाबतचा सविस्तर प्रस्ताव मा.सर्व साधारण सभेपुढे ठेवला असता सदर संस्था ही सार्वजनिक संस्था असुन गोरगरीब जनतेला, रुग्णांना त्यांचा उपयोग होतो सदर संस्था ही धर्मदाय संस्था असुन व्यापारी तत्वावर रक्तपेढी न चालविता ना नफा ना तोटा या तत्वावर सेवाभावी काम करीत असल्याने सदर संस्थेस दरमहा भाडे रु.१०१/- या दराने आकारणी करण्याबाबत मा.नगरपरिषद ठराव क्र.४५ दि.९/७/१९९९ अन्वये ठराव पारीत झालेला आहे. सदर संस्था मा.सहा.संचालक, नगररचना विभाग, अहमदनगर (ACTP) यांनी प्रमाणित केलेल्या दरमहा भाडे रु.४७९५/- या प्रमाणे दरमहा भाडे प्रमाणित केलेले होते दरवर्षी ३% भाडेवाढ करुन सदर संस्थेस आजमितीस दरमहा भाडे रु.७४७१/- आहे. माहे मार्च २०१६ अखेर जागेपोटी काही येणे बाकी नाही.

सदर संस्थेची कराराची मुदत दि.२५/५/२००० रोजी संपली होती म्हणुन सदर संस्थेस नुतणीकरण करारनामा करुन घेणेबाबत जा.क्र.मार्केट ६०६ दि.२३/२/२०११ व जा.क्र.मार्केट ८९ दि.३/८/२०११ अन्वये कागदपत्राच्या पुराव्या सह म्हणने सादर करणेबाबत कळविले होते सदर संस्थेने दि.४/८/२०११ रोजी नव्याने करारवाढ मिळणे बाबत अर्ज केला होता व दि.२६/९/२०११ रोजी कराराची मुदत ३० वर्षेकरीता वाढवुन मिळणे बाबत अर्ज केला होता.

जा.क्र.मार्केट १५६ दि.२/११/२०११ अन्वये सदर प्रकरणी सुनावणी मा.उपायुक्त (कर) यांचे दालनात दि.३/११/२०११ रोजी दुपारी ३.०० वा.असल्याबाबत कळविले होते. सदर सुनावणी दि.१६/१२/२०११ रोजी झाली असता अल्प दराने भाडेवाढ करुन अधिकाधिक मुदतीचा करारनामा करुन देणे बाबत सदर संस्थेचे कार्यवाहक डॉ.श्री.धनेश्वर, जनकल्याण रक्तपेढी यांनी सांगितले आहे.

मा.नगररचनाकार, मनपा यांना जा.क्र.मार्केट ६१२ दि.९/२/२०११ अन्वये सुधारीत भाडे आकारणी करुन इकडेस पाठविणे बाबत कळविले होते जा.क्र.टी.पी.२६९१ दि.१६/४/२०११ अन्वये सदर संस्थेकडुन दरमहा भाडे रु.३६२७९/- व अनामत रक्कम रु. ४,६०,०००/- आकारणे योग्य होईल व संस्थेस मालमत्ता कर, लाईट बिल स्वत: भरावे लागेल असे इकडेस कळविले आहे.

तरी जनकल्याण रक्तपेढीचा ३० वर्षेचा करार करावयाचा झाल्यास सध्याचे भाडे व अनामत रक्कम किती घ्यावी याबाबत मा.नगररचनाकार, यांचा अभिप्राय घेवुन सदरचा प्रस्ताव निर्णयास्तव मा.महासभेपुढे सादर करणे उचित वाटते सबब आदेशार्थ सादर.

यावर उपायुक्त (कर) श्री.बेहेरे सो यांचा अभिप्राय की, सद्यस्थितीत सुरु असलेल्या रेडीरेकनरनूसार नियमाप्रमाणे भाडे व अनामत रक्कमे बाबतचा अभिप्राय घ्यावा.

यावर नगररचना विभागाकडुन दिनांक ०९/११/२०१६ रोजी फेरसादर रिपोर्ट की, विनंतीपुर्वक फेरसादर करण्यांत येते अ.नगर महानगरपालिके मार्फत जनकल्याण रक्तपेढी करीता ७ रुम यापुर्वी भाडयाने दिलेल्या आहेत. मुदतवाढी करीता संबंधिताने अर्ज केल्यानुसार चालू बाजारभावानुसार भाडे व अनामत ठरवुन देण्यात आलेली आहे. सदर विषय धोरणात्मक असल्याने मा.महासभेपुढे अखेर मान्यतेस पाठविणेस आदेशार्थ सादर.

यावर उपायुक्त (सा) श्री.चारठाणकर यांचा अभिप्राय की, अधिनियमातील तरतुदीनुसार सादर करावे.

यावर मार्केट विभाग प्रमुख यांचेकडुन दिनांक १६/१२/२०१६ रोजी मा.सादर की, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७९(ग) नुसार महानगरपालिकेच्या मंजूरीने महानगरपालिका यादीत अशा शर्तीस अधिन राहुन तीस वर्षापेक्षा अधिक होणार नाही इतक्या मुदतीकरीता भाडे पट्टयाने देता येईल. सबब आदेशार्थ सादर.

यावर मा.अति.आयुक्त श्री.वालगुडे सो यांचा अभिप्राय की, संचिकेमधील नगररचनाकार यांचे दिनांक ०८/११/२०१६ जा.क्र.नर/७६७७ अन्वये धोरणात्मक निर्णयाकरीता मा.महासभेकडे सादर करणेस हरकत नाही.

यावर मा.आयुक्त श्री.गावडे साहेब यांचा अभिप्राय की, महापालिका अधिनियम कलम ७९(ग) नुसार मा.महासभेच्या मान्यतेनंतर मा.शासनाचीही मान्यता अभिप्रेत असल्याचे दिसून येते.

**चर्चा :-** नाही.

**मा.महापौर :-** विषयपत्रिकेवरील विषयास सोडुन चर्चा होत असल्याने विषय मंजूर करण्यांत येत आहेत.

**---*---**

**ठराव :-**

ऑफीस रिपोर्ट व उपमहापौर श्री.श्रीपाद छिंदम यांनी दिलेल्या पत्रानुसार सदरची संस्था ही सेवाभावी संस्था असुन ना नफा ना तोटा या तत्वावर कार्य करीत असल्याने तसेच सदर संस्थेने मुदतवाढ करुन भाडे चालू स्थितीप्रमाणे ठेवणे बाबत मागणी केली आहे. सबब जनकल्याण रक्तपेढी, नगर या संस्थेच्या करारनाम्यास ३० वर्षे मुदतवाढ करणेस ही सभा मंजुरी देत आहे. सदर संस्थेची भाडे आकारणी ही नियमाप्रमाणे करावी. मात्र ही संस्था सेवाभावी स्वरूपाचे काम करीत असल्याने ही आकारणी कमीत कमी करण्याचा प्रयत्न प्रशासनाने करावा. यास ही सभा मान्यता देत आहे.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी.

सूचक - मा.श्री.श्रीपाद शंकर छिंदम

अनुमोदक - मा.सौ.सुनिता भगवान फुलसौंदर

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-
महापौर,
अहमदनगर महानगरपालिका.

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**

**प्रस्ताव क्रमांक :- ०७** **दिनांक : १४/०९/२०१७.**

- - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - -

**प्रस्तावाचा विषय :-** माळीवाडा विशाल गणपती मंदिराकडे तसेच नविन टिळक रोडकडे व आगरकर मळा, कर्पे मळा, संजयनगर याठिकाणी जाणा-या चौकास **"काटवन खंडोबा चौक"** असे नामकरण या नावाने होणे बाबत.

संदर्भ :- मा.सभागृह नेते श्री.अनिल माधवराव शिंदे यांचे पत्र दिनांक ०३/१२/२०१६ ची यादी.

**---*---**

**प्रस्तावाचा मजकुर :-**

वरिल विषय संदर्भीय पत्रान्वये रिपोर्ट सादर करणेत येतो की, अहमदनगर हद्दीतील माळीवाडा विशाल गणपती मंदीर कडे तसेच नविन टिळक रोड कडे व आगरकर मळा, कर्पे मळा, संजयनगर या ठिकाणी जाणा-या चौकास**"काटवन खंडोबा चौक"** असे नामकरण करणे बाबत मा.सभागृह नेते श्री.अनिल माधवराव शिंदे यांच्याकडे संबंधीत भागातील नागरिक व महात्मा फौंडेशन यांनी मागणी केली आहे.

काटवन खंडोबा देवस्थान फार पुरातन काळातले असून तेथे नगर शहर व उपनगरातील नागरिक प्रत्येक रविवारी व इतर सणाच्या दिवशी दर्शनासाठी नित्य नियमाने येतात. परंतु काही नागरिकांना देवस्थानाकडे जाणा-या मार्गाची दिशा लक्षात येत नाही म्हणून त्या चौकास **"काटवन खंडोबा चौक"** असे नामकरण विषयाची मागणी केली आहे. सदरचे मार्गास सार्वजनिक बांधकाम विभाग कडील रस्त्याचे नामकरणाचे उपलब्ध रजिष्टर तपासले असता यापूर्वी नाव दिलेची नोंद आढळून येत नाही. मा.महासभा कडे रिपोर्ट पाठविणेस मंजुरीस्तव सविनय सादर.

यावर उपायुक्त श्री.बेहेरे साो यांचा अभिप्राय की, प्रस्तावित अ  नूसार मा.महासभेपुढे विषय घेणेस हरकत नाही.

यावर मा.अति.आयुक्त श्री.वालगुडे साो यांचा अभिप्राय की, प्रस्तावित अ  प्रमाणे मा.महासभेकडे सादर करणेस हरकत नाही.

यावर मा.आयुक्त श्री.गावडे साहेब यांची सहमतीदर्शक स्वाक्षरी असे.

**चर्चा :-** नाही.

**मा.महापौर :-** विषयपत्रिकेवरील  विषयास सोडुन चर्चा होत असल्याने विषय मंजूर करण्यांत येत आहेत.

**---*---**

**ठराव :-**

ऑफीस रिपोर्ट मंजूर.  अहमदनगर महानगरपालिकेच्या हद्दीतील माळीवाडा विशाल गणपती मंदिराकडे तसेच नविन टिळक रोडकडे व आगरकर मळा, कर्पे मळा, संजयनगर याठिकाणी जाणा-या चौकास **"काटवन खंडोबा चौक"**असे नामकरण करण्यास ही सभा मान्यता देत आहे. तसेच सदर निश्चित केलेल्या जागी नामफलक बसविण्यास व त्याकामी येणा-या खर्चास ही सभा मान्यता देत आहे. सदर बाबत संपूर्ण सोपस्कार पार पाडण्यात येवुन  नामकरणाबाबत कार्यवाही करण्यात यावी.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी.

सूचक - मा.श्री.अनिल माधवराव शिंदे

अनुमोदक - मा.सौ.सुवर्णा दत्ता जाधव

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही/-
महापौर,
अहमदनगर महानगरपालिका.

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**

**प्रस्ताव क्रमांक :- ०८** **दिनांक : १४/०९/२०१७.**

---

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिका मधील कर्मचा-यांना दिवाळी सणानिमित्त बोनस व सानुग्रह अनुदान मिळणे बाबत अहमदनगर महानगरपालिकेमधील अधिकारी / कर्मचारी यांना विाळी सणानिमित्त सानुग्रह अनुदानाबाबत झालेल्या करारनाम्यास व त्याप्रमाणे प्रत्येकी रु.५,०००/- इतका सानुग्रह अनुदान बाबतच्या झालेल्या खर्चास कार्योत्तर मंजूरी मिळणे बाबत.

संदर्भ :- अहमदनगर महानगरपालिका कामगार युनियन यांचेकडील जा.क्र.११/श्रमिक/२०१६ दिनाक ३१/८/१६ अन्वयेची नोटीस.

---*---

**प्रस्तावाचा मजकुर :-**

संदर्भ :- अहमदनगर महानगरपालिका कामगार युनियन यांचे कडील जा.क्र.११/श्रमिक/२०१६ दिनांक ३१/०८/२०१६ रोजीची संप नोटीस.

उपरोक्त विषयास अनुसरुन विनंती रिपोर्ट सादर करण्यात येतो की, अध्यक्ष, अहमदनगर महानगरपालिका कामगार युनियन यांनी औद्योगिक विवाद अधिनियम १९४७ च्या कलम २२(१) नुसार संप नोटीस देवुन परिशिष्टातील मागण्यासाठी अहमदनगर महानगरपालिकेतील सर्व कामगार दिनांक १६/०९/२०१६ पासुन संपावर जातील असे नमुद करुन संप नोटीसमध्ये सोबत जोडलेल्या परिशिष्टामध्ये खालील प्रमाणे मागण्या केलेल्या आहेत.

१) दिनांक ३० ऑक्टोंबर, २०१६ रोजी दिवाळी सण असल्याने महानगरपालिकेतील सर्व कामगारांना सन २०१५/२०१६ या सालासाठी त्यांच्या सर्व भत्त्यासह होणा-या वार्षिक मिळकतीच्या २०% बोनस म्हणुन दिवाळी सणापुर्वी अदा करण्यात यावा.

२) महानगरपालिकेतील सर्व कामगारांना दिवाळी सणासाठी सानुग्रह अनुदानासाठी रक्कम रु.२०,०००/- (अक्षरी रक्कम रु.वीस हजार मात्र) दिवाळीपुर्वी विनाअट देण्यात यावी.

उक्त संप नोटीसच्या अनुषंगाने सुचीत केल्यानुसार प्रस्तुत प्रकरणी सदर बाब ही आर्थिक व धोरणात्मक स्वरुपाची असल्याने तसेच सद्यस्थितीत स्थानिक संस्थाकर मा.शासनाने रद्द केलेला आहे.

तथापि कर्मचारी सानुग्रह अनुदाना बाबत सन २०१६-२०१७ चे लेखाशिर्षकामध्ये रु.१.३० कोटी इतकी तरतुद केलेली आहे.

तरी याबाबत उपरोक्त परिस्थिती पाहता कामगार युनियन यांनी दिलेले पत्र व संप नोटीसीचा विचार काता मा.मुख्यलेखाधिकारी व मा.मुख्यलेखापरीक्षक यांचे मत व अभिप्राय घेवुन त्याबाबत मा.कामगार युनियनला समर्पक उत्तर देणे उचित होईल, अथवा कामगार युनियन प्रतिनिधी यांच्याशी चर्चा करुन त्याबाबत होणा-या निर्णयानुसार पुढील कार्यवाही करणे उचित होईल.

तथापि आदेशार्थ निर्णयास्तव सादर.

यावर उपायुक्त श्री.चारठाणकर यांचा अभिप्राय की, बैठक बोलावणे योग्य राहील. तूर्त संघटनेला कळवणे उचित मान्यतेस्तव.

यावर मा.अति.आयुक्त श्री.वालगुडे साहेब यांचा अभिप्राय की, सोबतच्या अहवालानुसार व अ प्रमाणे अभिप्राय घेवुन बैठक आयोजित करणे उचित होईल.

यावर मुख्यलेखाधिकारी श्री.झिरपे यांचा अभिप्राय की, सदरील बैठकीमध्ये कर्मचारी संघटनेस मनपाच्या आर्थिक परिस्थितीबाबत अवगत करणे योग्य होईल.

यावर आस्थापना विभाग प्रमुख यांचेकडुन सादर रिपोर्ट की, सदर बाबत मा.मुख्यलेखा परिक्षक यांचेशी समक्ष झालेल्या चर्चेनुसार कामगार युनियन यांचे मागण्यांचा विचार करता सदर विषयावर सविस्तर चर्चा होवुन त्यानुसार विचार करणे उचित होईल. तरी सदरची बाबही आस्थापना व मुख्यलेखाधिकारी यांचेशी निगडीत असल्याने त्यानुसार कार्यवाही करावी असे सुचित केले.

तरी सदर बाबत बैठक बोलविणे संदर्भात तारीख व वेळ देणेबाबत आदेशार्थ सादर.

यावर उपायुक्त श्री.चारठाणकर यांची सहमतीदर्शक स्वाक्षरी असे.

यावर मा.आयुक्त श्री.गावडे साहेब यांचा अभिप्राय की, दिनांक ६ ऑक्टोंबर २०१६ रोजी ४.३० वाजता

यावर आस्थापना विभाग प्रमुख यांचेकडुन फेररिपोर्ट सादर की, अध्यक्ष, अहमदनगर महानगरपालिका, कामगार युनियन यांनी त्योचकडील जा.क्र.११ दिनांक ३१/०८/२०१६ अन्वये इकडेस संप नोटीस देवुन कर्मचा-यांना सानुग्रह अनुदान व बोनस बाबत मागणी केली होती. सदर संप नोटीशीच्या अनुषंगाने जा.क्र.आस्था.४२०६ दिनांक ०३/१०/२०१६ अन्वये अध्यक्ष,अहमदनगर महानगरपालिका, कामगार युनियन यांना पत्र देवुन चर्चेकामी दिनांक ०६/१०/२०१६ रोजी दुपारी ४.०० वाजता बैठक आयोजित करणे बाबत कळविण्यांत आले होते.

त्याअनुषंगाने अध्यक्ष, अहमदनगर महानगरपालिका, कामगार युनियन यांचेमध्ये दिनांक ०६/१०/२०१६ रोजी सदर मागण्याबाबत सविस्तर चर्चा करण्यात आलेली होती. तथापि सदरच्या बैठकी मध्ये कुठल्याही प्रकारचा निर्णय झालेला नाही. तद्नंतर अध्यक्ष, अहमदनगर महानगरपालिका कामगार युनियन यांनी त्यांचेकडील जा.क्र.१४ दिनांक ०७/१०/२०१६ अन्वये इकडेस पत्र देवुन दिनांक १४/१०/२०१६ पासुन बेमुदत धरणे आंदोलनाबाबत नोटीस दिलेली आहे. सदर नोटीशीच्या अनुषंगाने शहर कामगार पालिका युनियन पदाधिकारी यांना संपर्क साधुन मा.महापौर सौ.सुरेखाताई कदम यांनी मनपा अधिकारी व पदाधिकारी तसेच युनियनचे पदाधिकारी व कार्यकारणी यांची संयुक्त बैठक शनिवार दिनांक १५/१०/२०१६ रोजी सायं.५.०० वा.मा.महापौर कार्यालय येथे आयोजि केली होती. सदर बैठकीस उपमहापौर मा.श्री.श्रीपाद छिंदम, अति.आयुक्त मा.श्री.विलास वालगुडे, स्थायी समितीचे सभापती मा.श्री.सचिन जाधव, सभागृह नेते मा.श्री.अनिल शिंदे, विरोधी पक्ष नेता मा.श्री.संजय शेंडगे, शिवसेना शहर प्रमुख मा.श्री.संभाजी कदम, उपायुक्त मा.श्री.अजय चारठाणकर, मुख्यलेखाधिकारी श्री.झिरपे, कामगार युनियन अध्यक्ष मा.श्री.अनंत लोखंडे, मा.श्री.वायकर तसेच युनियनचे सर्व प्रतिनिधी व प्र.आस्थापना प्रमुख आदी उपस्थित होते.

मनपा अधिकारी व पदाधिकारी तसेच युनियनचे पदाधिकारी व उपस्थित युनियनचे सर्व प्रतिनिधी यांच्यामध्ये संयुक्तीक बैठकीमध्ये झालेल्या चर्चेमध्ये सानुग्रह अनुदान रक्कम ५०००/- व दिवाळी ॲडव्हान्स रक्कम रुपये १०,०००/- अदायगी बाबत सकारात्मक दृष्टीकोन ठेवुन दिपावली सणा निमित्त झालेल्या चर्चेनुसार सर्वानुमते निर्णय घेण्यात आला याप्रमाणे अंदाजे रक्कम रु.१ कोटी २५ लाख रक्कमेचे वाटप करण्याचे करावी. दिपावली सणापुर्वी देय रक्कमाची अदायगी करण्याबाबत नियोजन करुन कार्यवाही पार पाडावी मा.आयुक्त, अहमदनगर महानगरपालिका यांनी योग्य ते आदेश देवुन संबंधित अधिकारी यांचेकडुन कार्यवाही करुन घ्यावी. दिपावली सण जवळ आल्याने कामगार वर्गास दिपावली निमित्त करावयाच्या खरेदीकामी अडचण येवू नये बैठकीत ठरल्यानुसार सानुग्रह अनुदान रक्कम अदायगी करावी. याबाबतचा कार्योत्तर मान्यतेचा प्रस्ताव मा.महासभेपुढे लवकरात लवकर पाठविणे बाबत कार्यवाही करणे बाबत इतिवृत्त महापौर कार्यालय यांचेकडील जा.क्र.महापौर कार्यालय ४९७ दिनांक १७/१०/२०१६ अन्वये प्राप्त झाले आहे.

तसेच अहमदनगर महानगरपालिका मा.पदाधिकारी व प्रशासन व कामगार युनियन यांचेमध्ये करार करण्याचे ठरलेले असुन त्याप्रमाणे दिनांक १६/१०/२०१६ रोजी महानगरपालिका मा.पदाधिकारी, प्रशासन व कामगार युनियन यांचेमध्ये रु.१००/- च्या मुद्रांकावर स्वाक्षरी होवुन करारनामा करण्यात आलेला आहे. त्यामधील नमुद करारनामा तपशिल खालील प्रमाणे आहे.

**कराराच्या अटी व शर्ती :-**

१. सन २०१५-२०१६ करीता दिवाळी सणासाठी करारापुर्वी म्हणजे दि.२६/१०/२०१६ पर्यत महानगरपालिकेच्या कायमसेवेत असणा-या प्रत्येक पात्र कामगार कर्मचा-यास (परिविक्षाधीन व सन २०१५ -२०१६ या आर्थिक वर्षात सेवानिवृत झालेल्या कर्मचा-यांसह व प्रतिनियुक्तीवरील कर्मचारी यांचेसह ) विनाअट एक रकमी प्रत्येकी रुपये ५,०००/- (अक्षरी रुपये पाच हजार मात्र) सानुग्रह अनुदान म्हणुन देण्यात येतील.

२. सन २०१५ - २०१६ या आर्थिक वर्षात सेवानिवृत्त झालेल्या कर्मचा-यांना तो कार्यरत असलेल्या कालावधी पर्यतचेच सानुग्रह अनुदान देय राहील.

३. महाराष्ट्र शासनाने बोनस म्हणुन सन २०१५ - २०१६ सालासाठी देण्याचे ठरविले किंवा सानुग्रह अनुदाना बाबत शासनाचा आक्षेप आला तर त्याबाबत युनियनशी चर्चा करुन याबाबत निर्णय घेण्यांत येईल.

४. वरील अट दि.३१/०८/२०१६ रोजीच्या संप नोटीशीमधील परिशिष्टामध्ये नमुद सर्व मागण्यांबाबत अंतीम करार आहे असे समजण्यात येईल. सदर करार हा सन २०१५ - २०१६ साठी असुन तो पुढील काळात बंधनकारक रहाणार नाही.

५. हा करार महानगरपालिकेतील सर्व कार्यरत व सेवानिवृत कामगार कर्मचा-यांवर बंधनकारक राहील

६. जे कर्मचारी सानुग्रह अनुदानातुन प्रत्येकी रु. २००/- युनियन निधी देण्यास हरकत घेतील त्यांची मपात करण्यात येणार नाही.

७. या कराराचा लाभ घेणा-या प्रत्येक कामगार कर्मचा-यास या सानुग्रह अनुदानातुन प्रत्येकी रु.२००/- युनियन निधी म्हणुन वेतन कपात करण्यात येईल. व ही रक्कम युनियनला धनादेशाचे स्वरुपात देण्यात येईल या कपाती बाबत भविष्यात वाद निर्माण झाल्यास त्याची संपुर्ण जबाबदारी कर्मचारी युनियनची राहील .

महानगरपालिका कामगार युनियन यांनी जा.क्र.१६ श्रमिक/२०१६ दिनांक १९/१०/२०१६ रोजी पत्र देवुन दिनांक १५/१०/२०१६ रोजी महानगरपालिकेचे मा.पदाधिकारी तथा अधिकारी तसेच युनियन प्रतिनिधी यांची संयुक्त बैठक संपन्न होवुन सदर बैठकीत दिवाळी सणाकरीता महानगरपालिकेतील सर्व कामगारांना प्रत्येकी रु.५०००/- इतकी रक्कम सानुग्रह अनुदानापोटी अदा करण्याचा निर्णय उभयपक्षी निर्णय घेण्यात आलेला आहे. महानगरपालिका कामगारांना मिळावयाचा सदरच्या रक्कमेतुन प्रत्येकी रु.२००/- युनियन निधी पेमेंट ऑफ वेजेस ॲक्टच्या कलम ७(२) (केकेके) अन्वये कपात करुन आमची युनियनला चेक व्दारे अदा करण्यात यावी अशी विनंती करीत असुन या उपरही सदर निधी कपात करण्यास कोणाची हरकत आल्यास सदर बाबत युनियम स्तरावर निर्णय घेण्यात येईल. याची कृपया नोंद घेणे बाबत कळविले आहे.

अहमदनगर महानगरपालिकेच्या सन २०१६-२०१७ चे लेखाशिर्षकामध्ये सानुग्रह अनुदान पोटी रक्कम रु.१ कोटी ३० लाख इतकी अर्थ संकल्पामध्ये तरतुद करण्यांत आलेली आहे. तरी अहमदनगर महानगरपालिका कामगार युनियन यांचेकडील ११/श्रमिक/२०१६ दिनांक ३१/०८/२०१६ अन्वयेचे संप नोटीस मा.महापौर कार्यालय यांचेकडील जा.क्र.४९७ दिनाक १७/१०/२०१६ रोजीच्या इतिवृत्तामधील निर्देश व सदर झालेल्या करार नामानुसार अहमदनगर महानगरपालिके मधील सन २०१५-२०१६ मधील कार्यरत पात्र कर्मचारी/अधिकारी यांना दिवाळी सानुग्रह अनुदान रु.५०००/- अदा करणेस व त्यामधुन युनियन निधी रु.२००/- कपात करणेस व त्याकामी येणा-या अंदाजे रक्कम रु.१ कोटी २५ लाख रक्कमेचे वाटप खर्चाबाबत मा.मुख्यलेखापरीक्षक व मा.मुख्यलेखाधिकारी यांचा उपरोक्त प्रकरणी अभिप्राय घेऊन कार्योत्तर मंजुरीसाठी मा.महासभेपुढे पाठविणे करीता निर्णयास्तव आदेशार्थ सादर.

यावर मुख्यलेखाधिकारी श्री.झिरपे यांचा अभिप्राय की, निवृत्तीवेतन धारक व कार्यरत कर्मचारी यांची सेवा उपदाने, ६ वे वेतन आयोगाचा फरकाचा पाचवा हप्ता, महागाई भत्ता फरक असे ५ कोटीपेक्षा जास्त दायीत्वे शिल्लक आहेत. महापालिकेला शासनाकडून LBT चे ५.४४ कोटी रु.अनुदान प्राप्त होते. सदरील अनुदानाचे फक्त कर्मचा-यांचे वेतन व भत्ते यांची देयके अदा करण्यापुरती रक्कम असते. निवृत्तीवेतन व इतर प्रदाने करणेसाठी मनपा निधीमध्ये प्राप्त होणा-या रक्कमेतून करावी लागतात. मनपा निधीमधून वरील प्रदाने भागविणे इतपत रक्कम प्राप्त होत नाही. तसेच मनपा निधी मधून कंत्राटदार पुरवठादार यांची देयके ही दिली जातात. त्यांची दायीत्वे सुमारे ३० कोटी इतकी आहेत तसेच कर्मचा-यांची पतसंस्थेच्या हप्त्यापोटी द्यावयाची रक्कम यांचेही ८ कोटी रु. थकीत आहेत. कर्मचा-यांच्या भविष्य निर्वाह निधीमधील रक्कम सुमारे ६ कोटी रुपये देणे बाकी आहे.

उपरोक्त सर्व बाबीचा साकल्याने विचार होवुन निर्णय व्हावा.

यावर उपायुक्त श्री.चारठाणकर यांचा अभिप्राय की, महासभे समोर कार्योत्तर मंजूरी साठी सादर करणे योग्य.

यावर मा.आयुक्त श्री.गावडे साहेब यांची सहमती दर्शक स्वाक्षरी असे.

यावर मा.महापौर अहमदनगर महानगरपालिका यांचा अभिप्राय की, मा.महासभेपुढे ठेवा.

**चर्चा :-** नाही.

**मा.महापौर :-** विषयपत्रिकेवरील विषयास सोडुन चर्चा होत असल्याने विषय मंजूर करण्यांत येत आहेत.

---*---

**ठराव :-**

ऑफिस रिपोर्ट मंजूर. अहमदनगर महानगरपालिका मधील कर्मचा-यांना दिवाळी सणानिमित्त सानुग्रह अनुदान बाबत झालेल्या करारनाम्यास व त्याप्रमाणे प्रत्येकी रु.५,०००/- इतका सानुग्रह अनुदान बाबतच्या झालेल्या खर्चास कार्योत्तर मंजुरी देण्यांस ही सभा मान्यता देत आहे. खर्च मंजूर.

नियमानुसार पुढील योग्य ती कार्यवाही करावी.

सुचक :- मा.श्री.उमेश खंडेराव कवडे

अनुमोदक :- मा.श्री.बाळासाहेब मारुती बोराटे

ठराव सर्वानुमताने मंजूर.

सही/-
महापौर,
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**

**प्रस्ताव क्रमांक :- ०९** **दिनांक : १४/०९/२०१७.**

---

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील मौजे भिस्तबाग प्रभाग क्रमांक १ अंतर्गत स.नं.१३ चे **"संत किसनगिरी नगर"** असे नांव देणे बाबत...

**---*---**

**प्रस्तावाचा मजकुर :-**

संदर्भ :- १)संत किसनगिरी नगर, पाईपलाईन रोड, भिस्तबाग भागातील रहिवाश्यांचे पत्र.

२)मा.नगसेविका सौ.दिपाली नितीन बारस्कर यांची दि.०९/१०/२०१६ रोजीची यादी.

उपरोक्त विषयान्वये विनंती रिपोर्ट देण्यात येतो की, अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील मौजे भिस्तबाग प्रभाग क्र.३ अंतर्गत स.नं.१३ चे **"संत किसनगिरी नगर"** असे नामकरण करणेबाबत मा.नगरसेविका सौ.दिपाली नितीन बारस्कर यांनी संदर्भीय पत्रान्वये मा.महापौर यांचेकडेस मागणी केलेली आहे. मा.नगरसेविका यांचे यादीनुसार स.नं.१३ हा प्रभाग क्र. ३ मध्ये येत असुन या भागात संत किसनगिरी महाराज यांचे मंदिर असुन या परिसरात मोठया संख्येने वसाहत आहे. नागरिकांना याठिकाणी येण्यासाठी ओळखीसाठी व पत्रव्यवहाराच्या पत्त्यासाठी सोयीच्या दृष्टीने सदरचे भागास नामकरण करणे आवश्यक आहे. या परिसरातील नागरिकांनी देखील मागणी केलेली आहे. मा.नगरसेविका यांचे मागणीनुसार मौजे भिस्तबाग प्रभाग क्र.१ अंतर्गत स.नं.१३ चे **"संत किसनगिरी नगर"** असे नाव देणेबाबत मागणी केलेली आहे. यापुर्वी सदर भागास कोणतेही नाव दिलेले नाही.

त्यानुसार अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील कोणत्याही सार्वजनिक रस्त्यास, चौकास, इमारतीस, भुखंडास अथवा सभागृहास नामकरण देण्याचे अधिकार मुंबई प्रांतिक महानगपालिका अधिनियम १९४९ अन्वये मा.महासभेस असल्याने मौजे भिस्तबाग प्रभाग क्र.३ अंतर्गत स.नं.१३ चे **"संत किसनगिरी नगर"** असे नामकरण करण्याचा प्रस्ताव मा.नगररचनाकार यांचा अभिप्राय घेवुन मा.महासभेकडे निर्णयास्तव पाठविणेस मंजुरी मिळणेस्तव रिपोर्ट स.सादर.

यावर शहरअभियंता श्री.राजपुत यांचा अभिप्राय की, नगररचनाकार, सदर कामी आपले अभिप्रायाची आवश्यकता असुन तो इकडेस मिळावा.

यावर नगररचनाकार श्री.राम पाटील यांचा अभिप्राय की, चौकाचे नामकरण करणे हा विषय या विभागाशी संबंधित नाही. त्यामुळे या विभागाचा अभिप्राय निरंक आहे.

यावर शहरअभियंता श्री.राजपुत यांचा अभिप्राय की, मा.महासभेकडे निर्णयासाठी प्रस्ताव पाठविणेस मान्यतेस सादर.

यावर उपायुक्त (कर) श्री.राम पाटील यांची सहमती दर्शक स्वाक्षरी असे.

यावर मा.आयुक्त श्री.विलास वालगुडे साहेब यांचा अभिप्राय की, सोबतच्या अहवालाप्रमाणे प्रस्ताव मान्यतेस म.महासभेकडे सादर.

**चर्चा :-** नाही.

**मा.महापौर :-** विषयपत्रिकेवरील विषयास सोडुन चर्चा होत असल्याने विषय मंजूर करण्यांत येत आहेत.

---*---

**ठराव :-**

ऑफीस रिपोर्ट मंजूर. अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील मौजे भिस्तबाग प्रभाग क्रमांक १ अंतर्गत स.नं.१३ चे **"संत किसनगिरी नगर"**असे नामकरण करण्यास ही सभा मान्यता देत आहे. तसेच सदर निश्‍चित केलेल्या जागी नामफलक बसविण्यास व त्याकामी येणा-या खर्चास ही सभा मान्यता देत आहे. सदर बाबत संपूर्ण सोपस्कार पार पाडण्यात येउन नामकरणाबाबत कार्यवाही करण्यात यावी.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी.

सूचक - मा.सौ.दिपाली नितीन बारस्कर

अनुमोदक - मा.सौ.शारदा दिगंबर ढवण

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही/-
महापौर,
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**

**प्रस्ताव क्रमांक :- १०** **दिनांक : १४/०९/२०१७.**

---

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील पद्मानगर येथील चौकास **"शिवतेज"** असे नांव देणे बाबत...

**---*---**

**प्रस्तावाचा मजकुर :-**

संदर्भ :- १)श्री.प्रशांत अशोकराव पाटील, उपनगर शिवसेना यांचे व सदर भागातील नागरिकांचे मागणी पत्र.

२)मा.नगसेविका सौ.दिपाली नितीन बारस्कर यांची दि.०४/१२/२०१६ रोजीची यादी.

उपरोक्त विषयान्वये विनंती रिपोर्ट देण्यात येतो की, अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील पद्मानगर येथील चौकास **" शिवतेज "** असे नामकरण करणेबाबत मा.नगरसेविका सौ.दिपाली नितीन बारस्कर यांनी संदर्भीय पत्रान्वये मा.महापौर यांचेकडेस मागणी केलेली आहे. मा.नगरसेविका यांचे यादीनुसार पद्मानगर हा भाग प्रभाग क्रमांक ३ मध्ये येत असुन तेथील चौकास **" शिवतेज "** असे नाव देणेबाबत मागणी केलेली आहे. यापुर्वी सदर चौकास कोणतेही नाव दिलेले नाही.

त्यानुसार अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील कोणत्याही सार्वजनिक रस्त्यास, चौकास, इमारतीस, भुखंडास अथवा सभागृहास नामकरण देण्याचे अधिकार मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ अन्वये म.महासभेस असल्याने प्रभाग क्र.३ मधील पद्मानगर चौकास **" शिवतेज "** असे नामकरण करण्याचा प्रस्ताव मा.नगररचनाकार यांचा अभिप्राय घेवुन मा.महासभेकडे निर्णयास्तव पाठविणेस मंजुरी मिळणेस्तव रिपोर्ट स.सादर.

यावर शहरअभियंता श्री.राजपुत यांचा अभिप्राय की, नगररचनाकार, सदर कामी आपले अभिप्रायाची आवश्यकता असुन तो इकडेस मिळावा.

यावर नगररचनाकार श्री.राम पाटील यांचा अभिप्राय की, चौकाचे नामकरण करणे हा विषय या विभागाशी संबंधित नाही. त्यामुळे या विभागाचा अभिप्राय निरंक आहे.

यावर शहरअभियंता श्री.राजपुत यांचा अभिप्राय की, मा.महासभेकडे निर्णयासाठी प्रस्ताव मान्यतेस सविनय सादर.

यावर उपायुक्त (कर) श्री.राम पाटील यांची सहमती दर्शक स्वाक्षरी असे.

यावर मा.आयुक्त श्री.विलास वालगुडे साहेब यांचा अभिप्राय की, "अ" प्रमाणे प्रस्ताव मा.महासभेकडे सादर.

-***--

**चर्चा :-** नाही.

**मा.महापौर :-** विषयपत्रिकेवरील विषयास सोडुन चर्चा होत असल्याने विषय मंजूर करण्यांत येत आहेत.

---*---

**ठराव :-**

ऑफीस रिपोर्ट मंजूर. अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील पद्मानगर येथील चौकास **"शिवतेज"** असे नामकरण करण्यास ही सभा मान्यता देत आहे. तसेच सदर निश्चित केलेल्या जागी नामफलक बसविण्यास व त्याकामी येणा-या खर्चास ही सभा मान्यता देत आहे. सदर बाबत संपूर्ण सोपस्कार पार पाडण्यात येउन  नामकरणाबाबत कार्यवाही करण्यात यावी.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी.

सूचक - मा.सौ.दिपाली नितीन बारस्कर

अनुमोदक - मा.सौ.शारदा दिगंबर ढवण

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही/-
महापौर,
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**

**प्रस्ताव क्रमांक :- ११** **दिनांक : १४/०९/२०१७.**

---

**प्रस्तावाचा विषय :-** पद्मावती पेट्रोल पंप चौक ते श्रीराम चौक या संपुर्ण पाईपलाईन रस्त्याला **"पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर मार्ग"** असे नामकरण करणे बाबत...

---*---

**प्रस्तावाचा मजकुर :-**

संदर्भ :- १)मा.श्री.दिगंबर नारायण ढवण, उपशहर प्रमुख, शिवसेना नगर शहर यांचेकडील दिनांक २६/०५/ २०१६ रोजीची यादी

उपरोक्त विषयान्वये विनंती रिपोर्ट देण्यांत येतो की, वरील संदर्भीय पत्रानुसार मा.दिगंबर नारायण ढवण उपशहर प्रमुख, शिवसेना नगर शहर यांनी अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील पद्मावती पेट्रोल पंप श्रीराम चौक संपुर्ण पाईपलाईन रस्त्यास "पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर मार्ग" असे नामकरण करणे बाबत मा.आयुक्त यांचेकडेस मागणी केलेली आहे. परंतु मा.नगरसेविका श्रीमती कलावती सुर्यभान शेळके यांचे दि.२६/०६/२०१५ चे पत्राचे रिपोर्ट नुसार मा.सर्वसाधारण सभा ठराव क्र. ३० दि.०९/११/२०१५ अन्वये सावेडी पाईपलाईन रोड येथील भिस्तबाग चौकास "पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर मार्ग" असे नाव देणेत आलेले आहे. तसेच

१) मा.श्री.कुमार बबनराव वाकळे यांचे दि.०५/०२/२०१६ चे पत्र व

२) मा.श्री.संपत विजय बारस्कर यांचे दि.०५/०२/२०१६ चे पत्र.

मा.श्री.कुमार बबनराव वाकळे व मा.श्री.संपत विजय बारस्कर या दोन्हीही मा.नगरसेवकांचे पत्रानुसार मा.सर्वसाधारण ठराव क्र.४९ दि.१६/०३/२०१६ अन्वये पाईप लाईन रोड, मनमाड रोडला जोडणा-या चौकास "कॉम्रेड गोविंद पानसरे चौक" असे नामकरण करणेत आलेले आहे.

मा.श्री.दिगंबर नारायण ढवण, उपशहर प्रमुख शिवसेना नगर शहर यांचे यादीनुसार पद्मावती पेट्रोलपंप चौकापासुन श्रीराम चौकापर्यंत हा संपुर्ण पाईपलाईन रस्त्याला "पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर मार्ग" असे नाव देणेत यावे व तसा फलक वरील चौकात लावणेबाबत मागणी केलेली आहे. यापुर्वी फक्त मा.सर्वसाधारण सभा ठराव क्र.३० दि.०९/११/२०१५ अन्वये भिस्तबाग चौकास व मा.सर्वसाधारण सभा ठराव क्र.४९ दि.१६/०३/२०१६ अन्वये पाईपलाईन रोड, मनमाड रोडला जोडणा-या चौकास वर नमुद प्रमाणे नामकरण करणेत आलेले आहे. यापुर्वी संपुर्ण पाईपलाईन रोड रस्त्याला कोणतेही नाव देण्यांत आलेले नाही.

त्यानुसार अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील कोणत्याही सार्वजनिक रस्त्यास, चौकास, इमारतीस भुखंडास अथवा सभागृहास नामकरण देण्याचे अधिकार मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ कलम ६३(९) अन्वये मा.महासभेस असल्याने पद्मावती पेट्रोल पंप चौक ते श्रीराम चौक या संपुर्ण पाईपलाईन रस्त्याला "पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर मार्ग" असे नामकरण करण्याचा प्रस्ताव मा.महासभेकडे निर्णयास्तव पाठविणेस मंजुरी मिळणेस्तव रिपोर्ट स.सादर.

यावर शहर अभियंता यांचा अभिप्राय की, मा.नगररचनाकार, प्रस्तावित प्रकरणी आपले अभिप्रायाची आवश्यकता आहे. तरी आपला अभिप्राय इकडेस मिळावा हि विनंती.

यावर नगररचनाकार श्री.राम पाटील यांचा अभिप्राय की, नामकरणाचा विषय या विभागाशी संबंधीत नसल्याने अभिप्राय निरंक आहे.

यावर शहर अभियंता यांचा अभिप्राय की, मा.नगररचनाकार यांचे अभिप्रायानुसार मान्यतेस सादर.

यावर उपायुक्त श्री.राम पाटील यांचाअभिप्राय की, अ मध्ये नमुद कारणास्तव प्रस्ताव मा.महासभेस प्रस्ताव सादर करणेस हरकत नाही. आदेशार्थ सादर.

यावर मा.अतिरिक्त आयुक्त व आयुक्त श्री.वालगुडे साहेब यांचा अभिप्राय की, सोबतच्या टिपणी मधील अ प्रमाणे धोरणात्मक निर्णयाकरीता मा.महासभेकडे सादर.

**---*---**

**चर्चा :-** नाही.

**मा.महापौर :-** विषयपत्रिकेवरील विषयास सोडुन चर्चा होत असल्याने विषय मंजूर करण्यांत येत आहेत.

---*---

**ठराव :-**

ऑफीस रिपोर्ट मंजूर. पद्मावती पेट्रोल पंप चौक ते श्रीराम चौक या संपुर्ण पाईपलाईन रस्त्याला **"पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर मार्ग"** असे नामकरण करण्यास ही सभा मान्यता देत आहे. तसेच सदर निश्चित केलेल्या जागी नामफलक बसविण्यास व त्याकामी येणा-या खर्चास ही सभा मान्यता देत आहे. सदर बाबत संपूर्ण सोपस्कार पार पाडण्यात येउन नामकरणाबाबत कार्यवाही करण्यात यावी.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी.

सूचक - मा.सौ.शारदा दिगंबर ढवण,

अनुमोदक - मा.श्री.उमेश खंडेराव कवडे,

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही/-
महापौर,
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**

**प्रस्ताव क्रमांक :- १२** **दिनांक : १४/०९/२०१७.**

---

**प्रस्तावाचा विषय :-** वॉर्ड नंबर २० येथील पारशाखुंट रस्त्याला थोर समाजसेवक महेबुबभाई करीमभाई बागवान (दलाल) नांव देणे बाबत.
मा.श्री.श्रीपाद शंकर छिंदम उपमहापौर यांची यादी.
मा.नगरसेवक श्री.सुवेंद्र गांधी यांची यादी.

---*---

**प्रस्तावाचा मजकुर :-**

संदर्भ :- १) मा.श्री.श्रीपाद शंकर छिंदम (उपमहापौर, अहमदनगर महानगरपालिका) यांचे दि.०६/०१/२०१७ रोजीचे पत्र.

२) मा.श्री.सुवेंद्र गांधी (नगरसेवक,अ.नगर मनपा) यांचे दि.०४/०१/२०१७ चे पत्र.

३) प्रभाग क्रमांक २० येथील पारशाखुंट येथील रहिवासी यांचा दि.०२/०१/२०१७ रोजीचा अर्ज.

वरिल संदर्भांकित विषयान्वये कळविण्यांत येते की, वॉर्ड नं.२० मधील रहिवाशी यांनी दि.०५/०१/२०१७ रोजी अर्ज देवुन पारशाखुंट रस्त्याला थोर समाजसेवक महेबुबभाई करीमभाई बागवान (दलाल) नाव देणेबाबत माझेकडे मागणी केली आहे. सदरील अर्जामध्ये त्यांनी नमुद केले की, थोर समाजसेवक महेबुबभाई करीमभाई बागवान उर्फ दलाल शहरातील सर्व समाजासाठी एक थोर मार्गदर्शक होते. महेबुबभाई हे इंग्रजांच्या काळापासुन सन १९४० पासुन ते १९७१ पर्यंत पारशाखुंट भागात नगरसेवक तसेच नगराध्यक्ष पद भुषविणारे एकमेव समाजसेवक होते. फक्त समाज व शहर सुधारण्याचे कार्य न करता अनेक धार्मिक कार्यात त्यांचा फार मोठा वाटा होता. बाराईमाम कोठला अहमदनगर शहरासाठी फार मोठा ऐतिहासिक वारसा असुन त्या कमिटीचे महेबुबभाई दलाल हे प्रमुख विश्वस्त होते. मुस्लिम समाजासाठी ईद नमाज पठणासाठी जी ईदगाहची जागा आहे त्या जागेचे सुध्दा ते प्रमुख विश्वस्त म्हणुन महेबुबभाई यांनी आयुष्यभर आपले कार्य केले. महेबुबभाई दलाल यांनी सर्व समाजात शैक्षणिक, सामाजिक, सांस्कृतिक, कला तसेच क्रीडा अशा विविध क्षेत्रात लोकांना प्रबोधन करुन आपले योगदान दिले तसेच लोकांना शिक्षण क्षेत्रात जागृत करुन कोणीही शिक्षणापासुन वंचित राहु नये यासाठी शहरात मधोमध्या मुस्लिम समाजासाठी चाँद सुलताना (ॲग्लो हायस्कुल) ही शैक्षणिक संस्था सर्वांना सोबत घेवुन उभी करण्यास योगदान दिले व ते आजतागायत चालु असुन हे सर्व समाजाला माहित आहे. अहमदनगर शहरातील प्रथम भाजी मार्केट (गंजबाजार) येथे थोर समाजसेवक नवनितभाई बार्शिकर यांच्या सोबत सर्व समाजाच्या लोकांसोबत गंजबाजार येथे गोरगरीबांसाठी भाजीमर्केटची उभारणी करण्यात आली तसेच मुस्लिम समाजासाठी आपली वडिलोपार्जित जागा ही दफनभुमीसाठी दिली ती आज हसनशाह कादरी (बागवान कब्रस्तान) या नावाने ओळखली जाते. अनेक जाती सलोखे सर्वधर्म समभाव व एकोप्यासाठी अनेक कार्यक्रमा हाती घेतले. त्यामुळे थोर समाजसेवक महेबुबभाई करीमभाई बागवान (दलाल) यांचे शैक्षणिक, सामाजिक, सांस्कृतिक, कला तसेच क्रिडा अशा विविध क्षेत्रातील लोकोपयोगी कार्य पाहता पारशाखुंट रस्त्याला थोर समाजसेवक महेबुबभाई करीमभाई बागवान (दलाल) असे नांव देणेची मागणी संदर्भीय पत्रान्वये करण्यात आलेली आहे. सदर रस्त्यास अद्याप कोणतेही नाव दिलेले नाही.

अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील कोणत्याही सार्वजनिक रस्त्यास, चौकास अथवा इमारतीस नाव देण्याचे अधिकार मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ अन्वये मा.महासभेस असल्याने वॉर्ड नं.२० येथील पारशाखुंट रस्त्याला थोर समाजसेवक महेबुबभाई करीमभाई बागवान (दलाल) असे नाव देणे बाबतचा प्रस्ताव मंजुरीसाठी मा.महासभेकडे पाठविणेकरीता रिपोर्ट मंजुरीस सादर.

यावर उपायुक्त श्री.बेहेरे यांचा अभिप्राय की, अ नुसार मा.महासभेपुढे प्रस्ताव पाठविणेस हरकत नाही. मे.सादर.

यावर मा.अति.आयुक्त श्री.वालगुडे साहेब यांचा अभिप्राय की, अ प्रमाणे प्रस्ताव मा.महासभेकडे सादर करणेस.

यावर मा.आयुक्त श्री.गावडे साहेब यांची सहमतीदर्शक स्वाक्षरी असे.

यावर मा.महापौर, अहमदनगर महानगरपालिका यांचा अभिप्राय की, मा.महासभेपुढे ठेवा.

**चर्चा :-** नाही.

**मा.महापौर :-** विषयपत्रिकेवरील विषयास सोडुन चर्चा होत असल्याने विषय मंजूर करण्यांत येत आहेत.

---*---

**ठराव :-**

ऑफीस रिपोर्ट मंजूर. वॉर्ड नंबर २० येथील पारशाखुंट रस्त्याला थोर समाजसेवक महेबुबभाई करीमभाई बागवान (दलाल) असे नामकरण करण्यास ही सभा मान्यता देत आहे. तसेच सदर निश्चित केलेल्या जागी नामफलक बसविण्यास व त्याकामी येणा-या खर्चास ही सभा मान्यता देत आहे. सदर बाबत संपूर्ण सोपस्कार पार पाडण्यात येउन नामकरणाबाबत कार्यवाही करण्यात यावी.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी.

सूचक - मा.श्री.श्रीपाद शंकर छिंदम

अनुमोदक - मा.श्री.सुवेंद्र दिलीप गांधी

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही/-
महापौर,
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**

**प्रस्ताव क्रमांक :- १३** **दिनांक : १४/०९/२०१७.**

---

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील जुन्या पिंपळगाव रस्त्याचे **"प.पु.श्री.रविशंकरजी मार्ग "** असे नामकरण करणे बाबत

१) मा.नगरसेविका सौ.शारदाताई दिगंबर ढवण यांची दि.२२/१२/२०१६ ची यादी.

२) मा.नगरसेविका श्रीमती.गुंदेचा मंगला सतिष यांची दि.३०/०१/२०१७ ची यादी

---*---

**प्रस्तावाचा मजकुर :-**

उपरोक्त विषयान्वये विनंती रिपोर्ट देण्यात येतो कि, अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील जुन्या पिंपळगाव रस्त्याचे **"प.पु.श्री.रविशंकरजी मार्ग "**असे नामकरण करणेबाबत मा.नगरसेविका सौ.शारदाताई दिगंबर ढवण यांनी संदर्भिय पत्रान्वये मागणी केलेली आहे. मा.नगरसेविका सौ.शारदाताई दिगंबर ढवण यांचे यादीनुसार प्रभाग क्र.१ मध्ये "प.पु.श्री.रविशंकरजी " यांच्या कृपेने अहमदनगर येथे सावेडी उपनगरामध्ये गावडे मळा, भिस्तबाग येथील गट नं.१९/१अ/१ब/२अ/२ब/२/२ड/४ मधील ॲमिनिटीमध्ये व्यक्ती विकास केंद्र (आर्ट ऑफ लिव्हींग) वास्तुचे काम पुर्णत्वास जात आहे. नाविण्यपुर्ण व शहरास वैभव प्राप्त करून देणारी ही वास्तू डिसेंबर २०१६ अखेर पुर्ण होईल. सदर वास्तू भविष्यात पर्यटन स्थळ म्हणून प्रसिद्धी पावेल. जानेवारी २०१७ मध्ये स्वतः "प.पु.श्री.रविशंकरजी " यांचे शुभहस्ते वास्तूचे उद्‌घाटन प्रस्तावित आहे. तसेच मा.नगरसेविका श्रीमती गुंदेचा मंगला सतिष यांचे यादीनुसार अहमदनगर शहरात गावडे मळा, भिस्तबाग येथील गट नं.१९/१अ/१ब/२अ/२ब/२ /२ड/४ मधील ॲमेटीमध्ये व्यक्ती विकास केंद्र (आर्ट ऑफ लिव्हींग) वस्तुचे काम पुर्णत्वास येत आहे. सदर वास्तू भविष्यात पर्यटन स्थळ म्हणून उदयास येत आहे. जानेवारी २०१७ मध्ये स्वतः "प.पु.श्री.श्री.रविशंकरजी" यांचे शुभहस्ते सदर वास्तुचे उद्‌घाटन प्रस्तावित आहे.

सदर वास्तूस जोडणारा रस्ता एकविरा चौकातून जात आहे. नगर येथील सर्व साधक, नागरीक तसेच व्यक्ती विकास केंद्रामार्फत या नाविण्यपुर्ण वास्तूत जाणा-या रस्त्यास एकविरा चौक, सिटी प्राईड हॉटेल , लेखानगर ते तपोवन रोड " या रस्त्याचे नामकरण "प.पु.श्री.रविशंकरजी मार्ग " असे नामकरण करणेबाबत मागणी केलेली आहे. तसेच यापुर्वी सदर भागास कोणतेही नाव दिलेले नाही.

त्यानुसार अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील कोणत्याही सार्वजनिक रस्त्यास, चौकास, इमारतीस , भुखंडास अथवा सभागृहास नामकरण देण्याचे अधिकार मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ अन्वये मा.महासभेस असल्याने गावडे मळा येथील व्यक्ती विकास केंद्रामार्फत या नाविण्यपुर्ण वास्तूत जाणा-या रस्त्यास एकविरा चौक, सिटी प्राईड हॉटेल , लेखानगर ते तपोवन रोड " या रस्त्याचे नामकरण "प.पु.श्री.रविशंकरजी मार्ग " नामकरण करण्याचा प्रस्ताव मा.नगररचनाकार यांचा अभिप्राय घेवुन मा.महासभेकडे निर्णयास्तव पाठविणेस मंजुरी मिळणेस्तव रिपोर्ट स.सादर.

यावर शहर अभियंता यांचा अभिप्राय की, नगररचनाकार, सदर कामी आपले अभिप्रायाची आवश्यकता असुन तो इकडेस मिळावा.

यावर नगररचनाकार श्री.राम पाटील यांचा अभिप्राय की, रस्त्याचे नामकरण करणे ही बाब या कार्यालयाशी संबंधित नाही. सदर कामी या विभागाचे अभिप्राय निरंक आहेत.

यावर कनिष्ठ अभियंता यांचेकडुन फेरसादर रिपोर्ट की, मा.नगररचनाकार यांचे अभिप्रायानूसार मान्यतेस्तव सादर.

यावर उपायुक्त श्री.बेहेरे यांचा अभिप्राय की, प्रस्तावित नूसार मा.महासभेपुढे प्रस्ताव सादर करणेस हरकत नाही मे.सादर.

यावर मा.अति.आयुक्त श्री.वालगुडे साहेब यांचा अभिप्राय की, सोबतच्या टिपणी प्रमाणे मा.महासभेकडे प्रस्ताव सादर करणेस हरकत नाही.

यावर मा.आयुक्त श्री.वालगुडे साहेब यांचा अभिप्राय की, उपरोक्त टिपणी प्रमाणे प्रस्ताव मा.महासभेकडे सादर.

यावर मा.महापौर, अहमदनगर महानगरपालिका यांचा अभिप्राय की, मा.महासभेपुढे ठेवा.

**चर्चा :-** नाही.

**मा.महापौर :-** विषयपत्रिकेवरील विषयास सोडुन चर्चा होत असल्याने विषय मंजूर करण्यांत येत आहेत.

---*---

**ठराव :-**

ऑफीस रिपोर्ट मंजूर. अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील जुन्या पिंपळगाव रस्त्याचे **"प.पु.श्री.रविशंकरजी मार्ग "** असे नामकरण करण्यास ही सभा मान्यता देत आहे. तसेच सदर निश्चित केलेल्या जागी नामफलक बसविण्यास व त्याकामी येणा-या खर्चास ही सभा मान्यता देत आहे. सदर बाबत संपूर्ण सोपस्कार पार पाडण्यात येउन नामकरणाबाबत कार्यवाही करण्यात यावी.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी.

सूचक - मा.सौ.शारदा दिगंबर ढवण,

अनुमोदक - मा.सौ.उषा शिवाजीराव नलवडे,

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही/-
महापौर,
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**

**प्रस्ताव क्रमांक :- १४** **दिनांक : १४/०९/२०१७.**

---

**प्रस्तावाचा विषय :-** बुधवार दिनांक ०८/०३/२०१७ रोजी अमरधाम (नालेगांव) येथील दशक्रीया विधीच्या वेळी विलायती चिंचाची फांदी अंगावर पडून जखमी रुग्णास आर्थिक मदत देणे बाबत...

---*---

**प्रस्तावाचा मजकुर :-**

संदर्भ :- १) मा.श्री.सचिन तुकाराम जाधव सभापती स्थायी समिती यांचा दि.०८/०३/२०१७ चा अर्ज.

२) मा.श्री.शेख आरीफ रफियोद्दीन म.न.पा.नगरसेवक यांचा दि.०९/०३/२०१७ चा अर्ज.

३) मा.श्री.धनंजय जाधव मा.नगरसेवक म.न.पा.यांचा दि.१५/०३/२०१७ चा अर्ज.

४) मा.सभागृह नेता यांचे दिनांक ०८/०३/२०१७ चे पत्र.

उपरोक्त विषय व संदर्भात रिपोर्ट सादर करणेत येतो की, अहमदनगर म.न.पा.कार्यक्षेत्रामध्ये नालेगांव येथील अमरधाम हे वनराईने समृध्द अशी असुन अहमदनगर शहरातील व उपनगरातील नागरीक अंत्यविधीची व इतर धार्मिक कार्यक्रमासाठी रुढी परंपरेनुसार अमरधाम मध्ये जात असतात दुर्देवाने दि.०८/०३/२०१७ रोजी अचानक हिरवे झाड विलायती चिंचाची फांदी अचानक कोसळली व फांदी दशक्रीया विधीसाठी आलेल्या स्त्रियांचे अंगावर पडली व फांदीच्या हाद-याने झाडावरील अग्या मोहोळाच्या माश्या सैर भैर झाल्या व २० ते २२ नागरीकांना चावा घेतला सबब यामध्ये ज्या स्त्रि नागरिकांच्या डोक्यावर फांदी पडुन गंभीर इजा झाली त्यांना सिव्हील हॉस्पीटल मध्ये ॲडमीट केले आहे. तथापि एका रुग्णास पुणे येथे पुढील औषधोपचारा करीता हलविले आहे.

सदर घटना हि म.न.पा.हद्दी मध्ये घडली असलेने मा.सभापती,स्थायी समिती यांनी सदर रुग्णास आर्थिक मदत देणेत यवी अशी मागणी केलेली आहे. सदरची घटना ही नैसर्गीक व दुर्दैवी असुन म.न.पा.अधिनियमा मध्ये अश्या अपघाताची भरपाई देणे बाबत कार्यवाही उद्यान विभागामार्फत अद्याप झालेली नाही तथापि सदर बाबत म.न.पा.अधिनियमाव्दारे म.न.पा.चे लेखापरीक्षक यांचा अभिप्राय घेणे उचीत राहीत तसेच संबंधित अपघातग्रस्त नागरीकांचा अर्ज महानगरपालिकेस प्राप्त झालेला नाही. दि.०८/०३/२०१७ रोजी अहमदनगर महानगरपालिकेच्या नालेगांव येथील अमरधाम येथील दशक्रीया विधीच्या वेळी विलायती चिंचाची झाडाची फांदी अंगावर पडुन जखमी रुग्णास उपचाराकरीता जिल्हा रुग्णालय अहमदनगर येथे दाखल करणेत आलेले आहे. तरी या सर्व जखमी महिला/व्यक्तींची सविस्तर माहितीसह त्यांना औषधोपचारा करीता करावयाचे आर्थिक सहाय्यता निधी बाबतचा अभिप्राय मा.मुख्यलेखा परीक्षक यांचे कडुन घेणेस तसेच पोलीस पंचनामाची प्रत उपलब्ध करणे आवश्यक आहे. तरी याकामी मा.सिव्हील सर्जन/ वैद्यकीय आरोग्य अधिकारी सिव्हील हॉस्पीटल अहमदनगर यांना तसेच मा.पोलीस निरीक्षक तोफखाना पोलीस स्टेशन सावेडी अहमदनगर यांना पत्र देणे करीता प्रस्ताव मान्यतेस्तव सविनय सादर. एक लाखापर्यत आपत्कालीन मदत करणेसाठी सविनय सादर.

यावर श्री.सातपुते यांचा अभिप्राय की, उद्यान अधिक्षक व वृक्षाधिकारी यांच्या उपरोक्त अहवालानुसार कार्यवाही करणेस आदेशार्थ सादर.

प्रस्तुत प्रकरणी अर्थसहाय्य देय असणा-या महिलेचा अर्ज, पोलीस, तहसीलदार यांचा पंचनामा आवश्यकतेनुसार पत्र प्रत, औषधोपचार अपेक्षीत खर्चाबाबत डॉ.चे सर्टीफिकेट, रेशनकार्ड प्रत इ.बाबींची पूर्तता करुन मा.महाराष्ट्र शासनाचे विहीत नियमानुसार, महाराष्ट्र म.न.पा.अधिनियम २०१२

चे प्रकरण ६ मधील कलम ६६ (४२) प्रमाणे कार्यवाही करणेस तसेच प्रस्तावित बाब ही धोरणात्मक स्वरुपाची असल्याने मा.महासभेची मंजुरी घेवुन कार्यवाही करणे योग्य ठरेल.

मा.सादर, बुधवार दि.०८/०३/२०१७ रोजी नालेगाव येथील अमरधाम मधील दशक्रीया विधीच्यावेळी वाळलेले झाड अंगावर पडुन जख्मी झालेल्या रुग्णास आर्थिक मदत मिळणे बाबत.

यावर मा.उपायुक्त श्री.बेहेरे साो यांचा अभिप्राय की, प्रस्तावित नूसार व मनपा अधिनियमाच्या तरतुदीप्रमाणे तसेच मुलेप यांचे अभिप्रायानुसार मान्यतेस्तव सादर.

यावर मा.अति.आयुक्त श्री.वालगुडे साहेब यांचा अभिप्राय की, सोबतच्या टिपणी मधील अ प्रमाणे धोरणात्मक निर्णयाकरीता मा.महासभेकडे सादर करणेस हरकत नाही.

**चर्चा :-** नाही.

**मा.महापौर :-** विषयपत्रिकेवरील विषयास सोडुन चर्चा होत असल्याने विषय मंजूर करण्यांत येत आहेत.

---*---

**ठराव :-**

ऑफीस रिपोर्ट मंजूर. मा.सौ.जयश्री बाबासाहेब सोनवणे यांचे पत्रानुसार बुधवार दिनांक ०८/०३/२०१७ रोजी अमरधाम (नालेगांव) येथील दशक्रीया विधीच्या वेळी विलायती चिंचाची फांदी अंगावर पडून जखमी रुग्णांना आर्थिक मदत देणेस ही सभा मान्यता देत आहे. सौ.राधाबाई भारत नन्नवरे यांच्या डाव्या हाताच्या शीरावर झाडाची फांदी पडुन या अपघातामध्ये हात गमवावा लागल्याने त्यांना रक्कम रु.१ लाख (रक्कम रुपये एक लाख मात्र) मदत देण्यास ही सभा मान्यता देत आहे. तसेच जखमी झालेले रुग्ण १) श्रीपत त्रिंबक शेलार, यांना रक्कम रु.२५,०००/- २) कुसुमबाई रामदास गायकवाड, यांना रक्कम रु.२०,०००/- ३) विजय बाळासाहेब आव्हाड, यांना रक्कम रु.२०,०००/- ४) सीता गोरख सोनवणे, यांना रक्कम रु.२०,०००/- ५) सुजाता संजय गायकवाड, यांना रक्कम रु.५,०००/- ६) संजय श्रीपत शेलार, यांना रक्कम रु.५,०००/- ७) वैजयंती भास्कर काळोखे, यांना रक्कम रु.५,०००/- अर्थसहाय्य देण्यास ही सभा मान्यता देत आहे. प्रशासनाने पुढील कार्यालयीन सोपस्कार पार पाडुन संबंधितांना आर्थिक मदत देण्याबाबत कार्यवाही करावी.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी.

तसेच मा.श्री.उमेश खंडेराव कवडे, सभागृह नेते यांचे पत्रानुसार कै.बाळासाहेब देशपांडे दवाखान्यामध्ये सौ.श्रावणी निकम या गर्भवती महिलेचा प्रसुतीवेळी झालेल्या गुंतागुंतीमध्ये मृत्यू झाला असल्याने सौ.श्रावणी निकम यांच्या वारसास रक्कम रुपये एक लाख सहानुभूतीपुर्वक अर्थसहाय्य देण्यास ही सभा मान्यता देत आहे. प्रशासनाने पुढील कार्यालयीन सोपस्कार पार पाडुन संबंधितांना आर्थिक मदत देण्याबाबत कार्यवाही करावी.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी.

सूचक - मा.सौ.जयश्री बाबासाहेब सोनवणे,

अनुमोदक - मा.श्री.उमेश खंडेराव कवडे,

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही/-
महापौर,
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**

**प्रस्ताव क्रमांक :- १५** **दिनांक : १४/०९/२०१७.**

---

**प्रस्तावाचा विषय :-** जिल्हाधिकारी कार्यालय ते स्टेट बँक चौक ते चांदणी चौक ते नगर कॉलेज पर्यंत रस्ता मजबुतीकरण, डांबरीकरण रुंदीकरणासह जलनिस्सारण व्यवस्था करणेचे कामाबाबत

संदर्भ :- १) मा.जिल्हाधिकारी यांचे पत्र क्र.३४६८ दिनांक ०५/१२/२०१६ २) मा.जिल्हाधिकारी यांचे पत्र क्र. ५०२९ दिनांक ३१/१२/२०१६. ३) मा.जिल्हा दंडाधिकारी यांचे पत्र क्र.१४ दिनांक १६/०१/२०१७

---*---

**प्रस्तावाचा मजकुर :-**

संदर्भ :- १) मा.जिल्हाधिकारी यांचे पत्र क्र.३४६८ दिनांक ०५/१२/२०१६

२) मा.जिल्हाधिकारी यांचे पत्र क्र.५०२९ दिनांक ३१/१२/२०१६.

३) मा.जिल्हा दंडाधिकारी यांचे पत्र क्र.१४ दिनांक १६/०१/२०१७

उपरोक्त संदर्भीय विषयान्वये विनंती रिपोर्ट देण्यात येतो की, संदर्भीय पत्रातील संदर्भीय पत्र मा.आमदार श्री.संग्राम अरुणकाका जगताप यांचे असून सदर भागातील मायाना पहाता व सर्वेक्षण अहवाल खालील प्रमाणे :-

जिल्हाधिकारी कार्यालय परिसरामध्ये G.P.O. चौक ते हातमपुरा, हॉटेल अशोका ते BSNL Office, डावरेगल्ली, चांदणी चौक ते जिल्हाधिकारी कार्यालय, सैनिक लॉन नगर कॉलेज ते जिल्हाधिकारी कार्यालय व बाबा बंगाली परिसर, झेंडीगेट,इब्राहीम कॉलनी, हातमपूरा इ.भागाचे गटर व ड्रेनेज हे जिल्हाधिकारी कार्यालयाचे भवना समोरील रस्त्या खालून वाहते व ते चांदणी चौक, अहमदनगर कॉलेज मार्गे हॉटेल फरहत पासून भिंगार नाल्या मिळते.

सदरची लाईन सुमारे ४० वर्षा पूर्वीची लहान स्वरुपातील आहे. तसेच नगर-पुणे रस्ता रुंदीकरणा मध्ये ब-याच ठिकाणी तुटफुट होवून बंद झालेली आहे त्यामुळे सदरची लाईन सोबतच्या नकाशा प्रमाणे बरोबर जिल्हाधिकारी कार्यालय भागात बरेच नागरिकांची व स्थानिकांची वर्दळ मोठया प्रमाणात असलेने रस्ता देखील होणे आवश्यक आहे.

त्यानुसार एकुण कामापैकी सोबतच्या नकाशा प्रमाणे व अंदाजपत्रक रक्कम रुपये १,७६,१७,६२८/- आवश्यकता आहे व सदरची बाब विशेष बाब म्हणुन नगरोत्थान जिल्हास्तर मध्ये घेण्याची सुचित केले आहे.

उपरोक्त कामाची तातडी / आवश्यकता वरील रिपोर्ट मध्ये सोबतच्या नकाशा मध्ये व सदरचे काम तातडीने होणेचे दृष्टीने विषयांची काम नगरोत्थान जिल्हास्तर अंतर्गत घेण्याचे सुचित केलेले आहे. काम आवश्यक आहे. परंतु सदरचे काम जिल्हास्तर नगरोत्थान योजनेतुन घेणे कामी मान्यता प्राप्त करुन घेणे कामाचे मार्गदर्शन मध्ये सदर योजने मध्ये काम प्रस्तावित करणे पूर्वी कामास मा.महासभेची आवश्यकता आहे व त्याच बरोबर प्रस्तावास तांत्रिक मान्यता देखील आवश्यक आहे.

त्यामुळे प्रस्ताव निर्णय करीता मा.महासभेकडे पाठविणेस व त्याच बरोबर निर्णय कार्यवाही व प्रस्तावाची अहवाल मा.जिल्हाधिकारी अहमदनगर यांना पाठविणे उचित वाटते त्याच बरोबर अहमदनगर कॉलेज समोर पावसाळा CD Work कायम ब्लॉक होवून रस्त्यावर पाणी येते, त्यामुळे मा.जिल्हाधिकारी मार्फत PWD चे रस्त्याचे BOT विकास चेतक एन्टर प्राईजेस यांना त्याठिकाणी नवीन CD Work बांधणे कामी आदेश होणे सविनय सादर.

यावर उपायुक्त श्री.बेहेरे यांचा अभिप्राय की, प्रस्तावितनुसार कळवावे असे मत आहे. मे.आदेशार्थ सादर.

यावर मा.अति.आयुक्त श्री.वालगुडे साहेब यांचा अभिप्राय की, सोबतच्या टिपणी मधील अ प्रमाणे मान्यतेस्तव सादर.

यावर मा.आयुक्त श्री.गावडे साहेब यांची सहमतीदर्शक स्वाक्षरी असे.

**चर्चा :-** नाही.

**मा.महापौर :-** विषयपत्रिकेवरील विषयास सोडुन चर्चा होत असल्याने विषय मंजूर करण्यांत येत आहेत.

---*---

**ठराव :-**

ऑफीस रिपोर्ट मंजूर. जिल्हाधिकारी कार्यालय ते स्टेट बँक चौक ते चांदणी चौक ते नगर कॉलेज पर्यंत रस्ता मजबुतीकरण, डांबरीकरण रुंदीकरणासह जलनिस्सारण व्यवस्था करणेचे काम नगरोत्थान जिल्हास्तर योजने अंतर्गत करणेस ही सभा मान्यता देत आहे. खर्च मंजूर. सदरचा प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी, अहमदनगर यांचेकडेस पाठविणेत यावा.

नियमानुसार प्रशासनाने पुढील योग्यती कार्यवाही करावी.

सूचक - मा.श्री.उमेश खंडेराव कवडे,

अनुमोदक - मा.श्री.सचिन तुकाराम जाधव,

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही/-
महापौर,
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**

**प्रस्ताव क्रमांक :- १६** **दिनांक : १४/०९/२०१७.**

---

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर नगररचना योजना क्र.३ अंतिम भुखंड क्र.१२५ या जमिनीच्या मंजूर रेखांकनातील मनपा मालकीची खुली जागा (क्षेत्र ११६७.९० चौ.मी.) उद्यान व योग केंद्रासाठी विकसीत करणेस महावीर इंटरनॅशनल या सेवाभावी संस्थेस परवानगी देणे बाबत.

संदर्भ : १) महावीर इंटरनॅशनल या संस्थेचा दिनांक २८/१२/२०१६ रोजीचा अर्ज.

२) मा.महापौर मनपा यांचे पत्र क्र.११० दि.२८/१२/२०१६.

३) मा.श्री.अनिलजी शिंदे सभागृह नेता मनपा यांचे पत्र क्र.११० दि.२८/१२/२०१६

---*---

**प्रस्तावाचा मजकुर :-**

विषयांकित प्रकरणी संदर्भीय अर्जान्वये महावीर इंटरनॅशनल या संस्थेने अहमदनगर नगररचना योजना क्रमांक ३ अंतिम भुखंड क्र.१२५ या जमिनीच्या मंजुर रेखांकनातील मनपा मालकीची खुली जागा उद्यान व योगकेंद्रासाठी विकसित करणेस परवानगी देणे बाबत विनंती अर्ज केलेला आहे. तसेच मा.महापौर, म.न.पा.व मा.श्री.अनिलजी शिंदे, सभागृह नेते, म.न.पा.यांनी सदर संस्थेस जागा विकसित करणेस परवानगी देणे बाबत शिफारस केलेली आहे.

महाराष्ट्र शासनाच्या नगरविकास विभागाने दि.२०/०९/२०१६ रोजीच्या अधिसूचनेव्दारे अहमदनगर महानगरपालिकेसाठी विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली मंजुर व लागु केलेली आहे. सदरहु नियमावलीतील नियम क्र.२४.३.२ मध्ये खालील तरतुदी समाविष्ट आहेत.

A) On satction of the devolopment permission, recreational open space shell deem to have vested in the society/association of the residents/occupants. In case such society or association is to be fomed, the possession/custody of ercreational open space shall remain with the Commossioner until such association/society is formed. In case of group housing scheme, if the developer/ owner intend to develop such open space for bonagide use of resident, then the Commissioner may allow the same same while granting the development permission. The recreational open space shall not be sold/leased out to any other person and it shall nit be put any other user except for the common use of residents/ occupants.

B) If the Municipal Commissioner is convinced that there is misuse of open space: in such case the Municipal Commissioner shall tale over the land of recreational open space.

म्हणजेच मंजुर रेखांकनातील खुली जागा ही त्याच रेखांकनातील भुखंडधारकांसाठी असुन ती इतर कोणासही विकने अथवा भाडयाने देता येणार नाही. तसेच ती त्याच रेखांकनातील भुखंडधारकांच्या समाईक वापरासाठीच ठेवणे आवश्यक आहे.

प्रस्तुत प्रकरणी सदर अर्जदार संस्था स्वखर्चाने खुल्या जागेत उद्यान व योग केंद्र विकसीत करणार असुन त्याबाबत संस्थेने रेखांकनातील बहुतेक सर्व भुखंडधारकांचे संमती पत्र सोबत सादर केलेले आहे. त्यामुळे सदर संस्थेस खालील अटीवर खुली जागा विकसीत करणेस परवानगी देणेस हरकत नाही. असे मत आहे. आदेशार्थ सादर.

**अटी :-** १) प्रचलित विकास नियंत्रण नियमावली नुसार खुल्या भुखंडाच्या क्षेत्राच्या १५ टक्के इतके बांधकाम अनुज्ञेय आहे. तथापी ते तळमजला १० टक्के व पहिला मजला ५ टक्के या प्रमाणे बांधता येईल परंतु सदर बांधकाम करणेपुर्वी त्यास महानगरपालिकेची पुर्व परवानगी घेणे अवश्यक राहील.

२) सदर जागेचा वापर रेखांकनातील भुखंडधारकांच्या समाईक वापरासाठी करणे आवश्यक आहे. तीचा कोणत्याही वाणिज्य प्रयोजनासाठी वापर करता येणार नाही.

३) सदर जागेचा नियमबाह्य अथवा गैरवापर झाल्याचे निदर्शनास आल्यास सदर दिलेली विकसन परवानगी रद्द करुन खुली जागा महानगरपालिकेच्या ताब्यात घेण्यात येईल.

४) भूखंडधारकांनी हरकत घेतल्यास सदरची परवानगी रद्द समजण्यात येईल.

सबब अर्जदार संस्थेस वरील अटींवर विषयांकित मंजूर रेखांकनातील खुली जागा (क्षेत्र ११६७.९० चौ.मी.) उद्यान व योगकेंद्रासाठी विकसित करणेस परवानगी देणे बाबत आदेशार्थ सादर.

तथापि सदरचा प्रस्ताव योगकेंद्र विकसनासाठी असल्याने मा.महासभेकडे निर्णयार्थ सादर करणे योग्य होईल. आदेशार्थ सादर.

यावर मा.आयुक्त श्री.गावडे साहेब यांची सहमतीदर्शक स्वाक्षरी असे.

यावर मा.महापौर अहमदनगर महानगरपालिका यांचा अभिप्राय की, मा.महासभेपुढे ठेवा.

**चर्चा :-** नाही.

**मा.महापौर :-** विषयपत्रिकेवरील विषयास सोडुन चर्चा होत असल्याने विषय मंजूर करण्यांत येत आहेत.

---*---

**ठराव :-**

ऑफीस रिपोर्ट मंजूर. अहमदनगर नगररचना योजना क्र.३ अंतिम भुखंड क्र.१२५ या जमिनीच्या मंजूर रेखांकनातील मनपा मालकीची खुली जागा (क्षेत्र ११६७.९० चौ.मी.) उद्यान व योग केंद्रासाठी विकसीत करणेस महावीर इंटरनॅशनल या सेवाभावी संस्थेस ११ वर्षाच्या मुदतीने उद्यान व योगकेंद्रासाठी विकसीत करणेसाठी अटी व शर्तीवर नियमानुसार देणे बाबत पुढील योग्य ती कार्यवाही प्रशासनाने करावी. यास ही सभा मान्यता देत आहे.

नियमानुसार पुढील उचित कार्यवाही करण्यात यावी.

सूचक - मा.सौ.शारदा दिगंबर ढवण,

अनुमोदक - मा.सौ.उषा शिवाजीराव नलवडे,

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही/-
महापौर,
अहमदनगर महानगरपालिका.

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**

**प्रस्ताव क्रमांक :- १७** **दिनांक : १४/०९/२०१७.**

---

**प्रस्तावाचा विषय :-** एकात्मिक गृहनिर्माण व झोपडपट्टी विकास कार्यक्रम (IHSDP) फेज-२ अंतर्गत प्रकल्पासाठी झालेल्या अतिरिक्त खर्चास मा.महासभेची मान्यता मिळणे बाबत...

---*---

**प्रस्तावाचा मजकुर :-**

संदर्भ :- १) मा.CSC (HUPA) यांच्या कडील दिनांक १९/०३/२०१२ रोजी झालेल्या बैठकी अन्वये प्रशासकीय मान्यता.

२) मा.स्थायी समिती ठराव क्रमांक ८८ दिनांक १६/०२/२०१३ अन्वये निविदेस मंजूरी.

३) जा.क्र.१६४ प्रकल्प विभाग दिनांक १२/०३/२०१३ अन्वये कार्यारंभ आदेश.

४) शहर अभियंता कार्यालय जा.क्र.४२ दिनांक ०१/०६/२०१७ अन्वये सुधारीत तांत्रिक मान्यता.

उपरोक्त विषयाबाबत सादर करण्यांत येते की, एकात्मिक गृहनिर्माण व झोपडपट्टी विकास कार्यक्रम (IHSDP) फेज-२ चे कामास सीएसएमसी च्या १२४ व्या मिटींग मध्ये दिनांक १९/०३/२०१२ रोजी प्रशासकीय मान्यता प्राप्त झाली आहे.

| अ.क्र. | तपशिल | रक्कम |
|---|---|---|
| १ | मा.केंद्र शासनाकडून प्राप्त झालेले अनुदान | रु.६९२.९६ लक्ष |
| २ | मा.राज्य शासनाकडून प्राप्त झालेले अनुदान | रु.४६५.४९३ लक्ष |
| ३ | एकूण लाभार्थी हिस्सा | रु.५७ लक्ष |
| ४ | मनपा हिस्सा | रु.२३९.१८ लक्ष |
| | | रु.१४५४.६३३ लक्ष |

सदर बाबत तांत्रिक मान्यता, निविदा रक्कम, अतिरिक्त कामे (Extra Item) व प्रस्तावित अंतिम देयक बाबत तपशिल खालील प्रमाणे.

| अ.क्र. | तपशिल | मंजुरीचा दिनांक | रक्कम |
|---|---|---|---|
| १ | दिनांक १९/०३/२०१२ च्या सीएससीच्या मिटींग अन्वये प्राप्त प्रशासकीय मान्यता (३७२ सदनिका, कम्युनिटी सेंटर व अंतर्गत मूलभुत कामे ) | १९/०३/२०१२ | १२३६.२३ लक्ष |
| २ | निविदा रक्कम | | ११२३.८२ लक्ष |
| ३ | ठेकेदाराच्या देकार निविदेवर १६% जादा | | १३०३.२३ लक्ष |
| ४ | मुळ निविदे व्यतिरिक्त अतिरीक्त कामे | प्रशासकीय मान्यता दिनांक २३/०६/२०१५ | ३९,२६,९२३/- |
| ५ | प्रकल्पाचे अंतिम प्रस्तावित देयकासहीत एकुण झालेला खर्च | | १४,५४,६०,५८५/- |

नालेगांव स.नं.४१/२ या ठिकाणी ३७२ सदनिका व मुलभूत सुविधा विकसित करणे बाबत मे.पी.डी.पवार, पुणे या एजन्सीस दिनांक १२/०३/२०१२ रोजी कार्यारंभ आदेश देण्यात आला होता. याकामी आर्क असोसिएटस, औरंगाबाद यांची प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार म्हणुन नियुक्ती करण्यात आली आहे. मुळ निविदा रक्कम रु.११२३.६२ लक्ष अधिक ठेकेदाराचा देकार १६% जादा नुसार एकुण निविदा रक्कम रु.१३.३.२३ लक्ष इतकी होत आहे.

सदर ठिकाणी प्रत्यक्ष काम सुरु केल्यानंतर Site Condition नुसार सोबत जोडलेल्या Excess and Sating Statement नुसार प्रत्यक्ष मोजमापे घेवुन अंतिम देयक तयार करण्यात आले आहे. तसेच मुळ अंदाजपत्रकामध्ये खालील बाबींचा समावेश नव्हता. परंतू कामाची आवश्यकतेनुसार काही Extra Items करणे आवश्यक होते. त्यानुसार Extra Items च्या प्रस्तावास मा.आयुक्त यांची दिनांक २३/०६/२०१५ रोजी प्रशासकीय मान्यता घेण्यात आली आहे. सदरचा प्रस्तावाची व अंदाजपत्रकाची प्रत सोबत जोडले आहे.

तसेच प्रत्यक्ष काम करतेवेळेस मुळ निविदेमधील काही घटकांच्या परिमाणामध्ये वाढ झाली आहे. त्याबाबत प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार यांनी सादर केलेले (Excess qiantity) व अतिरिक्त कामे (Extra Items) सह एकुण रक्कम रु.१४,५४,६०,५८५/- इतकी होत आहे. त्यानुसार टेंडर रक्कम रु.१३०३.२३ लक्ष पेक्षा सदरची रक्कम रु.१,५१,३७,५८५/- जादा होत आहे. सद्यस्थितीत घरकुल योजनेचे काम पुर्ण झाले आहे. लाभार्थींना ताबा देण्याची कार्यवाही टप्प्याटप्प्याने चालू आहे. प्रकल्प पुर्ण झाले बाबत प्रमाणपत्र PMC यांनी सादर केले आहे.

तरी नालेगांव स.नं.४९/२ याठिकाणी विकसीत करण्यात आलेल्या गृह प्रकल्प योजना व मुलभूत सुविधा याकामी झालेल्या अतिरिक्त खर्चास रु.१,५१,३७,५८५/- प्रशासकीय मान्यता मिळणे बाबत प्रस्ताव मा.महासभेकडेस मंजूरीस्तव सविनय सादर.

यावर मा.उप अभियंता यांचा अभिप्राय की, प्रस्तावानुसार अतिरिक्त बाबी व जादा परिमाणासाठीचे रक्कम रु.१,५१,३७,५८५/- चे जादा खर्चास मा.महासभेची मान्यता आवश्यक असलेने प्रस्तुत प्रस्ताव मा.महासभेपुढे सादर करणे मान्यतेस्तव सादर.

यावर शहर अभियंता श्री.रजपुत यांचा अभिप्राय की, प्रस्तावात अतिरिक्त बाबी व जादा परिमाणामुळे रक्कम रु.१,५१,३७,५८५/- या जादा खर्चास प्रशासकीय मंजूरी आवश्यक असल्यामुळे पुढील मान्यतेस्तव सादर.

यावर मुख्यलेखापरिक्षक यांचा अभिप्राय की, १) महाराष्ट्र लेखा संहीता १९७१ मधील विषय १६७(१ ते ३) बाबत संबंधीत विभागाने खात्री करावी. २) टी.एस./एस्टीमेट वर मा.शहर अभियंता यांची स्वाक्षरी दिसुन येत नाही. ३) मुळ अंदाजपत्रकात स्ट्रीट लाईट इलेक्ट्रीफिकेशन कामाचा समावेश नाही. तथापि सुधारीत अंदाजपत्रकात या कामाचा समावेश दिसुन येतो. तरी याबाबतचा खर्च एक्स्ट्रा आयटेम आहे किंवा कसे याबाबत खात्याने खात्री करुन कार्यवाही करावी.

अ.नं. १ ते ३ बाबींची पुर्ततेअंती प्रस्तावित केलेल्या अ नुसार कार्यवाही करणे उचीत राहील.

यावर प्रकल्प अभियंता यांचेकडुन सादर की, मा.मुलेप यांनी सदर प्रस्तावाबाबत नमुद केलेल्या अभिप्रायाबाबत मुद्देनिहाय खुलासा खालील प्रमाणे करण्यांत येत आहे.

मुद्दा क्रमांक १) महाराष्ट्र लेखा संहिता १९७१ मधील नियम क्रमांक १६७ नुसार एकुण मुळ अंदाजपत्रकाच्या १० टक्के पेक्षा अधिक वाढ प्रत्यक्ष काम करतेवेळेस झाली आहे. सदर कामाच्या सुधारीत अंदाजपत्रकास सक्षम प्राधिकरणाची तांत्रिक मान्यता घेवून झालेल्या अतिरिक्त खर्चास प्रशासकीय मान्यता घेणे बाबत प्रस्ताव मा.महासभेकडे सादर करण्यांत येत आहे.

मुद्दा क्रमांक २) TS (तांत्रिक मान्यता) वर मा.शहर अभियंता यांच्या स्वाक्ष-या आहेत. टी.एस.मधील ॲबस्ट्रॅक्ट व मेजरमेंटवर पीएमसी प्रकल्प अभियंता व उपअभियंता यांच्या स्वाक्ष-या घेण्यांत आल्या आहेत.

मुद्दा क्रमांक ३) मुळ अंदाजपत्रकाच्या तांत्रिक मान्यतेमध्ये स्ट्रीट लाईटच्या कामाचा समावेश असुन त्यास तांत्रिक मान्यता घेण्यांत आली आहे.

तरी वरील प्रमाणे मा.मुलेप यांनी उपस्थित केलेल्या मुद्यांचा खुलाशासह प्रस्ताव मा.महासभेकडेस सादर करणे बाबत सविनय सादर.

यावर उपायुक्त कर श्री.बेहेरे यांचा अभिप्राय की, विभागाने प्रस्तावित केलेल्या मुळ प्रस्तावानुसार तसेच उपरोक्तप्रमाणे अन्वये प्रस्ताव सुधारीत प्र.मा.साठी मा.महासभेकडेस सादर करणेस हरकत नाही. आदेशार्थ सादर.

यावर मा.अति.आयुक्त श्री.वालगुडे साहेब यांचा अभिप्राय की, सोबतच्या अहवालाप्रमाणे व फेरसादर अहवाल अनुक्रमांक १ ते ३ अन्वये प्रस्ताव सुधारीत प्रशासकीय मान्यतेसाठी मा.महासभेकडे सादर करणेस हरकत नाही.

यावर मा.आयुक्त श्री.गावडे साहेब यांचा अभिप्राय की, मुलेप यांच्या मुद्यावर केलेला खुलासा मुलेप यांनी तपासुन स्पष्ट अभिप्राय द्यावेत.

यावर मुख्यलेखापरीक्षक यांचा अभिप्राय की, मुद्दा क्रमांक १ ते ३ ची पुर्तता पाहीली मुळ प्रस्तावीत अ नुसार कार्यवाहीस हरकत नसावी.

विभागाने प्रस्तावित केलेल्या अंदाजपत्रकात सुधारीत अंदाजपत्रक आणि सुधारीत तांत्रीक असे शब्द नमुद नाही. याप्रमाणे पुर्तता अंती पृष्ठ क्रमांक टी/३ वरील अ प्रमाणे आणि मा.आयुक्त यांनी दिनांक ०३/०१/२०१७ रोजी सुधारीत प्रस्ताव मा.मुख्य अभियंता म्हाडा यांना पाठविण्यांस मान्यता दिली असुन याप्रमाणे अतिरिक्त खर्चास रक्कम रु.१,५१,३७,५८५/- व सुधारीत खर्चास प्रशासकीय मान्यतासाठी प्रस्ताव मा.महासभेकडेस पाठविणेस हरकत नसावी.

यावर मा.आयुक्त श्री.गावडे यांची सहमतीदर्शक स्वाक्षरी असे.

**चर्चा :-** नाही.

**मा.महापौर :-** विषयपत्रिकेवरील विषयास सोडुन चर्चा होत असल्याने विषय मंजूर करण्यांत येत आहेत.

---*---

**ठराव :-**

ऑफीस रिपोर्ट मंजूर. एकात्मिक गृहनिर्माण व झोपडपट्टी विकास कार्यक्रम (IHSDP) फेज-२ अंतर्गत प्रकल्पासाठी झालेल्या अतिरिक्त खर्चास ही सभा मान्यता देत आहे.

नियमानुसार प्रशासनाने पुढील कार्यवाही करण्यात यावी.

सूचक - मा.श्री.उमेश खंडेराव कवडे

अनुमोदक - मा.श्री.संजय छगनराव शेंडगे

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही/-
महापौर,
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**

**प्रस्ताव क्रमांक :- १८** **दिनांक : १४/०९/२०१७.**

- - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - -

**प्रस्तावाचा विषय :-** सेवानिवृत्त (मयत) मनपा कर्मचारी कै.श्री.मुरली नागु वावरे, सफाई कामगार यांचे कुटुंबनिवृत्ती वेतन व मृत्यू-नि-सेवा उपदान (ग्रॅच्युईटी) अदा करणे बाबत...

**---*---**

**प्रस्तावाचा मजकुर :-**

विनंती रिपोर्ट सादर करण्यांत येतो की, विंनती रिपोर्ट सादर करण्यात येतो की,कै.श्री.मुरली नागु वावरे -सफाई कामगार यांचे दिंनाक ६/०९/०३ रोजी निधन झाल्याने त्याना मनपा नोकरीतुन दिंनाक ६/०९/०३ पासुन सेवानिवृत्त करण्यात आलेले आहे. आस्थापना विभागाक्डून सेवापुस्तक अर्थ विभागाकडे दिंनाक २२/०३/२००४ रोजी प्राप्त झाले.कै.मुरली वावरे यांचे मृत्यु नंतर त्यांची वारस पत्नी श्रीमती मीना मुरली वावरे यांनी दि.०३/०१/२०१७ रोजी अर्ज देवुन फॅमिली पेन्शन मिळणेबाबत मागणी केलेली आहे. अर्जा सोबत मुळ मृत्यु प्रमाणपत्र ,मुळ वारस प्रमाणपत्र ,आधारकार्ड इलेक्शन कार्ड ,रेशन कार्ड ,नेमणूक आदेश झेरॉक्स प्रती जोडल्या आहेत.

महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती वेतन ) नियम १९८२ मधील प्रकरण नऊ "१९५० नंतर सेवाप्रविष्ट झालेल्यांच्या निवृत्तीवेतनाच्या रकमांचे विनियमन मधील नियम ११६ - कुटुंबनिवृत्तोवेतन १९६४ (२) जेव्हा शासकीय कर्मचारी (ब) संबधित शासकीय कर्मचा-याची सेवेत किंवा पदावर नियुक्ती होण्याच्या लगतपुर्वी ,समुचित वैद्यकीय प्राधिका-याने तपासणी करुन त्याला शासकीय सेवेसाठी योग्य ठरविल्यानंतर एक वर्षाची सतत सेवा होण्यापुर्वी मृत्यु पावला असेल तेव्हा पोटनियम (४) मध्ये समाविष्ट असलेल्या तरतुदीना बाधा न येता ,मृत शासकीय कर्मचा-यांच्या कुटूंबाला, कुटुंब निवृत्तीवेतन मिळण्याचा हक्क असेल आणि अशा कुटुंबनिवृत्तीवेतनाची रक्कम मासिक दराने निश्चित केली जाईल" अशी तरतुद करण्यात आलेली आहे.

कै.श्री.मुरली नागु वावरे यांच्या वारसदार पत्नी श्रीमती मीना मुरली वावरे यांना दि.०७/०९/२००३ पासुन ३१/१२/२००५ अखेर ५ वा वेतन आयोगा प्रमाणे व ०१/०१/२००६ पासुन ६ वा वेतन आयोगाप्रमाणे कुटुंबनिवृत्ती वेतन लागु करणेस मान्यता मिळावी तसेच वरील कालावधीचा कुटुंबनिवृत्तीवेतनाचा फरक चेकने अदा करणेस मान्यता मिळावी ही विंनती

सोबत :- फरकाचे तक्ते

यावर मुख्य लेखापरीक्षक श्री.खरात यांचा अभिप्राय की, कै.मुरली नागु वावरे यांची वारसपत्नी श्रीमती.मीना मुरली वावरे यांना कुटुंबनिवृत्ती वेतन दरमहा रक्कम रु.२८८३/- अधिक महा.भत्ता व मृत्यू नि सेवानिवृत्ती उपदान रक्कम रु.५,१००/- तसेच दिनांक ०७/०९/२००३ ते ३१/१२/२००५ अखेर ५ वा वेतन आयोगाप्रमाणे व दिनांक ०१/०१/२००६ पासून ६ वा वेतन आयोगाप्रमाणे कुटुंबनिवृत्ती वेतन लागु करणेस प्रस्तावावरुन दिसून येते.

१) वरील अ प्रमाणे वैद्यकीय तपासणी अहवाल असे. (२) सदरचे प्रकरण उशीराने / विलंबाने सादर करण्याचे कारण काय (३) एकूण सदर कालावधी साठ महिने असुन सुधारीत नियमाप्रमाणे कुटुंब निवृत्ती वेतन देय आहे का ? खुलासा सह ठेवा. (४) म.न.लेखा संहीता १९७१ मधील नियम ४४ व ४७ व म.व.लेखासंहीता २०११ मधील नियम १६८ प्रमाणे कार्यवाही करावी.

यावर अकौंट विभागाकडुन दिनांक ०३/०६/२०१७ रोजी फेरसादर रिपोर्ट की, कै.श्री.मुरली नागु वावरे मनपा मयत कर्मचारी यांची वारस पत्नी श्रीमती. मीना मुरली वावरे यांचे फॅमिली पेन्शन प्रकरणामधील घेतलेल्या आक्षेपांची पुर्तता अहवाल (खुलासा) खालील प्रमाणे (१) सेवा पुस्तकामध्ये वैद्यकीय तपासणी अहवाल जोडला आहे. (२) मयत कर्मचा-यांचे वारसांनी उशीरा कागदपत्रे सादर केली. त्यामुळे प्रकरण तयार

करणेस विलंब लागला. (३) महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतन) नियम १९८२ मधील प्रकरण नउ १९५० नंतर सेवा प्रविष्ठ झालेल्यांच्या निवृत्ती वेतनाच्या सुत्रांचे विनियमन मधील नियम ११६ कुटुंबनिवृत्ती वेतन १९६४(२) जेव्हा शासकीय कर्मचारी (ब) संबंधित शासकीय कर्मचा-यांची सेवेत किंवा पदावर नियुक्ती होण्याच्या लगतपूर्वी समुचित वैद्यकीय प्राधिका-याने तपासणी करुन त्याला शासकीय सेवेसाठी योग्य ठरविल्यानंतर एक वर्षाची सतत सेवा होण्यापूर्वी मृत्यू पावला असेल तेव्हा पोटनियम (४) मध्ये समाविष्ट असलेल्या तरतूदींना बाधा न येता मृत शासकीय कर्मचा-यांच्या कुटुंबाला, कुटुंबनिवृत्ती वेतन मिळण्याचा हक्क असेल आणि अशा कुटुंबनिवृत्ती वेतनाची रक्कम मासिक दराने निश्चित केली जाईल. अशी तरतूद करण्यात आलेली आहे. त्यानुसार सदर मयत कर्मचा-याचे वारसाला कुटुंब निवृत्ती वेतन देय ठरत आहे.

(४) मनपा लेखासंहिता १९७१ मधील नियम ४४ व ४५ व मनपा लेखासंहिता २०११ मधील नियम १६८-मुदतबाह्य मागण्या मुदतीच्या संबंधातील कायद्याच्या कोणत्याही तरतूदी अन्वये मुदत उलटून गेलेल्या नगरपरिषदेकडील सर्व मागण्या या सामान्यपणे नाकारण्यात येईल. अशी कोणतीही मागणी नगरपरिषदेने दाव्याच्या गुणवत्तेचा विचार केल्याशिवाय व नगरपरिषदेच्या संमतीशिवाय देण्यात येणार नाही. त्यानुसार सदरहू प्रकरण मा.ज.बो.कडे मंजूरीसाठी पाठविणेत येईल. तरी सेवापुस्तक व पे-प्रकरण पु.त.साठी.

यावर मुख्यलेखापरिक्षक श्री.खरात यांची सहमती दर्शक स्वाक्षरी असे.

यावर उपायुक्त श्री.बेहेरे यांची सहमतीदर्शक स्वाक्षरी असे.

**चर्चा :-** नाही.

**मा.महापौर :-** विषयपत्रिकेवरील विषयास सोडुन चर्चा होत असल्याने विषय मंजूर करण्यांत येत आहेत.

---*---

**ठराव :-**

ऑफीस रिपोर्ट मंजूर. सेवानिवृत्त (मयत) मनपा कर्मचारी कै.श्री.मुरली नागु वावरे, सफाई कामगार यांचे कुटुंबनिवृत्ती वेतन व मृत्यू-नि-सेवा उपदान (ग्रॅच्युईटी) अदा करणेस ही सभा मान्यता देत आहे. खर्च मंजूर.

नियमानुसार प्रशासनाने पुढील योग्य ती कार्यवाही करावी.

सूचक - मा.श्री.उमेश खंडेराव कवडे,

अनुमोदक - मा.श्री.बाळासाहेब मारुती बोराटे,

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही/-
महापौर,
अहमदनगर महानगरपालिका.

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**

**प्रस्ताव क्रमांक :- १९** **दिनांक : १४/०९/२०१७.**

---

**प्रस्तावाचा विषय :-** सावेडी स.नं.२८९ येथील कचरा डेपोकडे जाणारा रस्ता १४ वा वित्त आयोग अंतर्गत तपोवन रोड, जुना पिंपळगांव रस्ता ते भिस्तबाग महाला पर्यतचा रस्ता मजबुतीकरण व डांबरीकरण करणे बाबत.

सदर्भ १) मा.महापौर सौ.सुरेखा संभाजी कदम यांची दि.१४/०७/२०१७ रोजीची यादी.

२) प्रकल्प अभियंता यांचेकडील जा.क्र. २२४ दि.१८/०७/२०१७ रोजीचे पत्र.

३) महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग शासन निर्णय क्रमांक टिएफसी ८०१५/प्र.क्र.१०६/ नवि-४ मंत्रालय,मुंबई -४०० ०३२ दिनांक ०३/०८/२०१५.

---*---

**प्रस्तावाचा मजकुर :-**

उपरोक्त संदर्भीय विषयान्वये सादर की, संदर्भिय पत्र क्र.१ अन्वये मा.महापौर सौ.सुरेखा संभाजी कदम यांनी अहमदनगर महानगरपालिकेचे दि.३० जुन २००३ रोजी मनपा मध्ये रुपांतर होवून ११ गावांचा महानगरपालिका हद्दीमध्ये समावेश करण्यांत आला. सदर हद्दवाढीच्या गावांमध्ये मुलभूत सुविधा देणे आवश्यक आहे. सदर गावांसाठी रस्ते, गटार, पिण्याचे पाणी, विद्युत व्यवस्था करणे आवश्यक आहे. तपोवन रोड, पिंपळगांव रस्ता, भिस्तबाग महालापर्यंतचा रस्ता मजबुतीकरण व डांबरीकरण करणे अत्यंत आवश्यक असुन सदर ठिकाणी महानगरपालिकेचा नविन कचरा डेपो व खत प्रकल्प सुरु झाला आहे. उपनगरातील कचरा संकलन करणारी वाहने या रस्त्यावरुन नेताना मोठे मोठे खड्डे असल्यामुळे वाहन चालकांना त्रास होतो. एम.आय.डी.सी.कडे जाणारा उपनगरातील कामगार वर्ग हा रस्ता झाल्यानंतर त्याचा वापर मोठया प्रमाणात करतील. सदरचे काम १४ व्या वित्त आयोगाच्या निधीमधून करणे करणे बाबत मागणी केलेली आहे.

संदर्भिय पत्र क्र.२ अन्वये प्रकल्प अभियंता यांनी रस्ते विकसीत कामे बांधकाम विभागामार्फत प्रस्तावीत करण्यात येतात सबब पुढील कार्यवाहीसाठी बांधकाम विभागाकडे मा.महापौर यांची यादी व दि.०३/०८/२०१५ चा शासन निर्णय पाठविलेला आहे. सद्यस्थितीमध्ये सावेडी कचरा डेपो ते आठरेपाटील पब्लीक स्कुल हा रस्ता १४ व्या वित्त आयोगातून करण्यांत आलेला आहे. तसेच आठरे पब्लीक स्कूल ते भिस्तबाग महाल रस्ता मा.आमदार निधी मधून करण्यांत आलेला आहे. जूना पिंपळगांव रस्ता ते भिस्तबाग महाल रोड अत्यंत खराब झालेला आहे तो डांबरीकरण करणे गरजेचे आहे.

संदर्भिय पत्र क्र.३ मधील शासन निर्णय मधील पान नं.३ वरील कॉलम क्र.२, मुलभूत अनुदानातून हाती घ्यावयाची कामे -

१४ व्या वित्त आयोगाअंतर्गत प्राप्त मुलभूत अनुदान, महानगरपालिकांच्या बाबतीत महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ६३ मध्ये नमूद केलेल्या आवश्यक कर्तव्याकरीता व नगरपरिषदा, नगरपंचायतीच्या बाबतीत महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ मधील कलम ४९ (२) मध्ये नमूद केलेल्या आवश्यक कर्तव्याकरीता खर्च करणे पुढील अटीच्या अधीन राहून अनुज्ञेय राहील :-

अ) वर नमूद केलेल्या आवश्यक कर्तव्यांवर खर्च करतांना खर्चाचा प्राधान्यक्रम खालील प्रमाणे :-

१) घनकच-याचे संकलन, वाहतूक व त्यावरील प्रक्रिया

२) शौचालये - स्वच्छ भारत अभियानांतर्गत बांधण्यात येणा-या वैयक्तीक तसेच सार्वजनिक शौचालयांसाठी केंद्र व राज्य शासनाकडून अनुदान देण्यांत येते. तथापि त्यासाठी नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांनी स्वत:चा पूरक हिस्सा देणे आवश्यक असते, असा नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेचा पूरक हिस्सा

(वैयक्तिक शौचालयांसाठी कमाल मर्यादा रु.५,०००/- प्रति सीट व सार्वजनिक शौचालयांसाठी कमाल मर्यादा रु.२५,०००/- प्रति सीट) या अनुदानातून देता येईल.

३) नागरी वनीकरण - उदा. हरीत पट्टे, वृक्ष लागवड इ.

ब) वर नमूद केलेल्या कामांवर किमान ५०% रक्कम खर्च करणे बंधनकारक राहील. (वरील कामांवर ५०% हून अधिक रक्कम खर्च करावयाची असल्यास त्यासाठी मुभा राहील.)

क) स्वच्छ भारत अभियानांतर्गत अभिप्रेत असलेली सर्व कामे पूर्ण होउन शहर स्वच्छ घोषित झाले असल्यास व या अभियानांतर्गत कामांना वाव नसल्यास संचालक, राज्य अभियान संचालनालय यांचे ना-हरकत प्रमाणपत्र घेवुन खालील अट क्र.(ड) मध्ये नमूद कामांसाठी निधी वापरता येईल.

ड) उर्वरित ५०% रक्कम खर्च करतांना खर्चाचा प्राधान्यक्रम खालील प्रमाणे राहील.

(i) शासनाकडून अथवा हुडको / भारतीय आयुर्विमा महामंडळ इ.वित्तीय संस्थांकडून पायाभूत सुविधा प्रकल्पांसाठी महानगरपालिका/ नगरपरिषदेने घेतलेल्या कर्जाची परतफेड करण्यासाठी होणारा खर्च. (सदर कर्जाची परतफेड संबंधित नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेने केली नाही तर शासन, त्या नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेस १४ व्या वित्त आयोगाच्या देय निधीतून, अशा कर्जाच्या परतफेडी करीता आवश्यक रक्कम परस्पर वळती करु शकेल.)

(ii) केंद्र व राज्य योजनांतर्गत मंजूर पायाभूत सुविधा प्रकल्पावरील लोकवर्गणी, महानगरपालिका/ नगरपरिषदेचा हिस्सा व असे प्रकल्प पूर्ण करण्याकामी आवश्यक ठरणारा अतिरिक्त खर्च. (जर प्रकल्प मान्यतेच्या प्रक्रियेत असेल तर अशा प्रकल्पाच्या बाबतीत लोकवर्गणीच्या हिश्श्याची रक्कम राखून ठेवता येईल.)

तरी उपरोक्त कामास अंदाजे रक्कम रु.१,६१,२७,७८७/- इतका खर्च अपेक्षित असुन सदरचे काम १४ व्या वित्त आयोग अंतर्गत या लेखाशिर्षका अंतर्गत करणेबाबत नगररचना विभाग तद्नंतर सावेडी कचरा डेपोला रस्त्याची गरज संदर्भात घनकचरा विभाग प्रमुख तसेच मुख्य लेखापरिक्षक यांचा अभिप्राय घेवुन मा.महासभेपुढे प्रस्ताव ठेवणेकामी रिपोर्ट आदेशार्थ तथा मान्यतेस सविनय सादर.

यावर उपशहर अभियंता यांचा अभिप्राय की, १) प्रस्तावित रस्त्याचे काम सुरक्षित वाहतुकीसाठी करणे गरजेचे आहे. सदरचे काम १४ व्या वित्त आयोगाचे निधीमधून घेता येईल किंवा कसे याबाबत घनकचरा व्यवस्थापन प्रमुख यांचे अभिप्राय घेणे. (२) प्रस्तावित रस्ता करणेकरीता रस्ता मालकीबाबत मा.संचालक, नगररचना विभाग यांचा अभिप्राय घेणे करीता मान्यतेस्तव सादर.

यावर आरोग्यअधिकारी तथा घनकचरा व्यवस्थापन प्रमुख यांचा अभिप्राय की, शहर अभियंता यांचे सोबत झालेल्या चर्चेनुसार सध्या प्रस्तावित रस्ता तयार करणेसाठी निधीची आवश्यकता आहे. सध्या म.न.पा फंडामध्ये किंवा इतर फंडामधून निधी तातडीने उपलब्ध होत नसल्याचे त्यांचे चर्चेमधून कळले.

सध्या घनकचरा व्यवस्थापन विभागाकडील अत्यावश्यक कामांकरीता १४ व्या वित्त आयोगातील उपलब्ध ३.५ कोटी रुपये निधी पैकी १.६५ कोटी (एक कोटी पासष्ट लक्ष) निधी काही काळाकरीता वापरणेस व साधारणतः ऑक्टो २०१७ पर्यंत पुनः सदरचा निधी घनकचरा विभागास वापस उपलब्ध करुन देणेबाबत मुख्य लेखाधिकारी यांचे सल्ल्याने वापरनेस या विभागाची हरकत नाही.

यावर नगररचनाकार यांचा दिनांक ०३/०८/२०१७ रोजीचा अभिप्राय की, प्रकरणा समवेत समाविष्ट केलेल्या भाग नकाशात पस्तावित रस्ता हा २५.०० मीटर रुंद वि.या.रस्ता असून विकास योजनेच्या दृष्टीकोनातून (तपोवन रस्ता) करण्यांस या विभागाची हरकत नाही.

यावर मुख्यलेखाअधिकारी यांचा अभिप्राय की, सदरील विषय धोरणात्मक असल्याने महासभेच्या निर्णयार्थ सादर.

यावर मुख्यलेखापरिक्षक यांचा अभिप्राय की, मा.नगरविकास विभागाचा १४ व्या वित्त आयोगाच्या शासन निर्णय दिनांक ०३/०८/२०१५ मधील अटी व शर्तीस अधीन राहून व मा.महासभा मान्यता घेवून घनकचरा व्यवस्थापन प्रमुख प्र.उपअभियंता, मा.संचालक नगररचना यांनी अभिप्राय दिल्याप्रमाणे उचित निर्णयास्तव सादर.

यावर मा.अतिरिक्त आयुक्त श्री.वालगुडे साहेब यांचा अभिप्राय की, सोबतच्या अहवालानुसार व नगररचना विभागाकडील अभिप्राया अन्वये धोरणात्मक निर्णयाकरीता मा.महासभेकडे सादर करणेस हरकत नाही.

यावर मा.आयुक्त श्री.मंगळे साहेब यांची सहमतीदर्शक स्वाक्षरी असे.

---*---

**चर्चा :-**

**मा.सौ.शारदा ढवण :-** महापौर मॅडम विषय पत्रिकेवरील विषय घ्या. माझ्या प्रभागातील नागरीक दुपार पासुन बाहेर बसलेले आहेत. त्यामुळे विषयपत्रिकेवरील विषयावर चर्चा करा.

**मा.श्री.सचिन जाधव :-** प्रस्ताव मंजूर करा.

**मा.श्री.संपत बारस्कर :-** विषय मंजूर करा. आमची संमती आहे.

**मा.सौ.शारदा ढवण :-** तपोवन रोडला मंजूरी दिल्याबद्दल सर्वांचे अभिनंदन.

**मा.सौ.दिपाली बारस्कर :-** भिस्तबाग चौक ते महाल व एकवीरा चौक ते तपोवन रस्ता पर्यंत हे दोन्ही रस्ते १४ व्या वित्त आयोगाचे निधीतुन मंजूरी द्यावी.

**मा.महापौर साहेब :-** प्रस्ताव येवू द्या. अधिका-यां समवेत चर्चा करु. अगोदर तपोवन रस्ता घेवू.

**मा.सौ.रुपाली वारे :-** तपोवन रस्ता पूर्ण झाला पाहीजे पूर्ण रस्ता घ्या.

**मा.श्री.संपत बारस्कर :-** रस्ता जुना पिंपळगाव रस्त्यापासून घेतला भिस्तबाग महालापासून इंद्रायणी हॉटेल पर्यंत तसेच महालापासून गजराज फॅक्टरी पर्यंत रस्ता घेण्यात यावा. १४ रस्ते मी सूचविले या पत्राची प्रत मी सर्वांना पाठविली. रस्ते खराब झाले निधी मागणी साठी पत्र दिले. नगरसेवकांचे पत्राला जर उत्तर दिले नाही तर आंदोलन करणार. हे रस्ते कधी करणार नागरिकांना आम्ही याबाबत काय सांगणार. मला या पत्रावर रुलिंग पाहीजे.

**मा.श्री.दिप चव्हाण :-** सभागृहाचे संकेत मोडत आहेत. २३ वा विषय अगोदर घ्या.

**मा.आयुक्त श्री.मेंगळे साहेब :-** २ ऑगष्टला आपण रस्ते, ड्रेनेज, पथदिवे याबाबत पत्र दिले. यामध्ये स्वच्छतेचेही विषय आहेत. यावर काय कार्यवाही केली याबाबत एक आठवडयाच्या आत कार्यवाही करण्यात येईल. या पत्रावर १० दिवसात लेखी उत्तर देतो.

**मा.महापौर साहेब :-** कचरा डेपोकडे जाणा-या रस्त्याचे १४ व्या वित्त आयोग अंतर्गत प्राप्त निधीतून काम करण्यांत यावे. विषय मंजूर करण्यांत येत आहे.

---*---

**ठराव :-**

ऑफीस रिपोर्ट व मा.महासभेतील चर्चेनुसार सावेडी स.नं.२८९ येथील कचरा डेपोकडे जाणारा रस्ता १४ वा वित्त आयोग अंतर्गत प्राप्त निधीतुन तपोवन रोड, जुना पिंपळगांव रस्ता ते भिस्तबाग महाला पर्यतचा रस्ता मजबुतीकरण व डांबरीकरण करणेस ही सभा मान्यता देत आहे. खर्च मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी.

सूचक - मा.सौ.शारदा दिगंबर ढवण,

अनुमोदक - मा.श्री.उमेश खंडेराव कवडे,

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही/-

महापौर,

अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**

**प्रस्ताव क्रमांक :- २०** **दिनांक : १४/०९/२०१७.**

---

**प्रस्तावाचा विषय :-** फटाका स्टॉलची अनामत परत करणे बाबत..

संदर्भ :- श्री.सागर सुधाकर दुस्सल यांचा दिनांक ०८/११/२०१६ चा अर्ज.

**---*---**

**प्रस्तावाचा मजकुर :-**

उपरोक्त संदर्भीय विषयान्वये विनंतीपुर्वक रिपोर्ट सादर करण्यांत येतो की, फटाका स्टॉलची अनामत परत करणे बाबत श्री.सागर सुधाकर दुस्सल यांचा दिनांक ०८/११/२०१६ चा अर्ज देवुन सन २०१२-२०१३ या आर्थिक वर्षामध्ये स्टॉल क्रमांक ३६ करीता सा.पा.क्र.५५२२८४ दिनांक ३०/१०/२०१२ अन्वये रक्कम रु.५,०००/- भरलेली अनामत रक्कम परत मिळणेस विनंती अर्ज केला आहे.

तरी अर्जदार श्री.सागर सुधाकर दुस्सल यांनी सा.पा.क्र.५५२२८४ दि.३०/१०/२०१२ अन्वये रक्कम रु.५०००/- भरलेली अनामत रक्कम परत करणेस अकौंट विभागास आदेश होणेस रिपोर्ट मान्यतेस्तव सादर.

यावर लेखापरिक्षक श्री.अनारसे यांचा अभिप्राय की, महाराष्ट्र नगरपरिषद लेखासंहिता १९७१ चे नियम १९० (४) नुसार (मा.महासभेची) मान्यता घेवूनच कार्यवाही करण्यांत यावी.

यावर उपायुक्त (कर) श्री.चव्हाण यांची सहमतीदर्शक स्वाक्षरी असे.

यावर मा.आयुक्त श्री.मंगळे यांची सहमतीदर्शक स्वाक्षरी असे.

यावर मा.महापौर अहमदनगर महानगरपालिका यांचा अभिप्राय की, मा.महासभेपुढे ठेवा.

**चर्चा :-** नाही.

**मा.महापौर :-** विषयपत्रिकेवरील विषयास सोडुन चर्चा होत असल्याने विषय मंजूर करण्यांत येत आहेत.

---*---

**ठराव :-**

ऑफीस रिपोर्ट मंजूर. श्री.सागर सुधाकर दुस्सल यांचा दिनांक ०८/११/२०१६ चा अर्जान्वये फटाका स्टॉलची भरलेली अनामत रक्कम रु.५०००/- परत करणेस ही सभा मान्यता देत आहे. खर्च मंजूर.

नियमानुसार प्रशासनाने पुढील योग्य ती कार्यवाही करावी.

सभागृह नेते मा.श्री.उमेश खंडेराव कवडे, मा.सौ.सुनिता भगवान फुलसौंदर, मा.श्री.बाळासाहेब मारुतीराव बोराटे, मा.सौ.सुनिता दत्तात्रय मुदगल, मा.श्री.शेख आरिफ रफियोद्दीन, मा.सौ.सारिका हनुमंत भुतकर यांनी आज रोजीच्या सभेत पत्र दिल्यानुसार अहमदनगर महानगरपालिकेचे अधिकृत फोटोग्राफर यांनी दिनांक १८/०१/२०१५ ते २८/०२/२०१७ या कालावधीत महानगरपालिकेच्या विविध कार्यक्रमांच्या काढलेल्या फोटोंचे बील रक्कम रु.४,९८,९६०/- (अक्षरी रक्कम रुपये चार लाख अठ्ठयान्नव हजार नउशे साठ मात्र) कार्यालयीन बाबींची पुर्तता करुन अदा करणेस आणि महानगरपालिकेच्या १२ व्या वर्धापन दिनानिमित्त दिनांक ३० जुन २०१५ रोजी महानगरपालिकेच्या विविध कार्यालयांमध्ये रांगोळी रेखाटनाचे श्री.अमोल बागुल, रांगोळी कलाकार यांना देय असलेले बील रक्कम रु. ८,५००/- (अक्षरी रक्कम रुपये आठ हजार पाचशे मात्र) कार्यालयीन बाबींची पुर्तता करुन अदा करणेस ही सभा मान्यता देत आहे. खर्च मंजूर.

सूचक - मा.श्री.उमेश खंडेराव कवडे,

अनुमोदक - मा.श्री.बाळासाहेब मारुती बोराटे,

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही/-

महापौर,

अहमदनगर महानगरपालिका.

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**

**प्रस्ताव क्रमांक :- २१** **दिनांक : १४/०९/२०१७.**

---

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील कुष्ठपिडीत, अपंग रुग्ण व मनोरुग्ण (वेडे) यांना अर्थसहाय्य देणे बाबत...

संदर्भ :- १) जा.क्र.आरोग्य विभाग १३१६ दिनांक २०/०३/२०१७, २) वैद्यकीय अधिकारी, नागापुर आरोग्य केंद्र यांचे दिनांक १३/०६/२०१७ चे पत्र. ३) कै.बा.दे.दवाखाना जा.क्र. २९५ दि.२२/०६/२०१७.

---*---

**प्रस्तावाचा मजकुर :-**

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदीनुसार अहमदनगर महानगरपालिका कार्यक्षेत्रात किमान १ वर्षापसुन वास्तव्यास असन-या वेडे,कुष्ठरोगी यांचा निर्वहाच व औषधोपचाराचा खर्च कलम ६५ नुसार महानगर्पालिकेने करणेबाबत तरतुद करण्यात आलेली तथापि सदरचा खर्चा बाबत महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ६५ अन्वये तरतुदीनुसार निर्वाहासाठी प्रत्येक व्यक्तीसाठी राज्य शासन सर्वसाधारण किंवा विशेष आदेशाद्वारे वेळोवेळी विहीत रहील अशा दराने महानगरपालिका पैसे देईल. परंतु कोणत्याही वेडायास किंवा कुष्ठरोग्यास उपरोक्त अशा कोणत्याही उपचारगहात, रुग्णालयात किंवा घरात दाखल करुन घेण्याच्या निकटपुर्वी तो शहरात निदान एक वर्ष राहत नसेल तर, त्यांच्या पोषणासाठी किंवा औषधोपचारासाठी महानगरपालिका या कलमान्वये जबाबदार असणार नाही.आणखी असे की, राज्य शासनाने विहीत केलेले दर हे ज्या वेडयांच्या निर्वाहासाठी व औषधोपचारासाठी महानगरपालिका या कलमान्वये पात्र असेल त्यांच्या पैकी प्रत्येकी व्यक्तीच्या निर्वाहाकरिता व औषधापचारासाठी आलेल्या एकुण खर्चाच्या निम्म्याहुन अधिक असता कामा नयेत.

तसेच, भारतीय वेडयांबाबतच्या अधिनियम १९९२ कलम ८८ अन्वये न्यायालयाकडे अर्ज करण्यात आला असेल तेव्हा अशी वेडी व्यक्ती अकिंचन नाही व अशा वेडया व्यक्तीचा निर्वाह चालवता येईल अशी तिथी संपली आहे. किंवा तिचा निर्वाह चालवण्यास कायद्याने बांधलेली व निर्वाह चालवण्याची ऐपत असलेली व्यक्ती आहे.हे दाखविण्याची महानगरपालिकेला संधी दिल्यापासुन, अशा वेडया व्यक्तीच्या निर्वाहाचा खर्च, महानगरपालिकेने देण्याविषयी कोणताही आदेश देता कामा नये उपकलम (२) नुसार या कलमान्वये ज्यांच्या निर्वाहासाठी व औषधापचारासाठी महानगरपालिका जबाबदार आहे अशा वेडयांना व कुष्ठरोग्यांना ज्यात दाखल करण्यात आले असेल त्या उपचागहाच्या रुग्णालयाच्या किंवा घराच्या प्रभारी अधिका-याने अशा उपचारगहात, रुग्णालयात किंवा घरात दाखल केलेल्या अशा प्रत्येक वेडयाच्या कुष्ठरोग्याच्या पोषणासाठी व औषधोपचारासाठी केलेल्या खर्चाच्या स्पष्ट हिशेब ठेवला पाहिजे व त्या हिशेबाची एक प्रत महानगरपालिकेस पुरविले पाहिजे.

त्या अनुषंगाने महानगरपालिकेच्या ७ आरोग्य केंद्रनिहाय सर्वेक्षण करुन १२१ लाभार्थ्यांना सदरचा लाभ दयावयाचा आहे.परंतु मा.अर्थसंकल्पीय ठरावान्वये रु.१,०००/- प्रति महिना,प्रति व्यक्ती प्रमाणे लाभार्थ्यांना लाभ देणे बाबत ठरविण्यात आलेले आहे.तथापि कलम ६५ मधील तरतुदी व अर्थसंकल्पीय ठरावानुसार धोरणात्मक निर्णय घेणे प्रस्ताव मा. महासभेपुढे सादर करण्यात येत आहे.

मा.सादर

अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील कुष्ठपिडीत, कुष्ठपिडीत अपंग व मनोरुग्ण यांना अर्थ सहाय्य देणे बाबत मा.महापौर यांचे कार्यालयात मा.महापौर यांनी अर्थ सहाय्य देणे बाबत मा.शासनाचे मार्गदर्शन घेणे बाबत सुचित केलेले आहे.सबब आदेशार्थ सादर,

मा.वैद्यकीय आरोग्य अधिकारी

'अ' संदर्भात नवि-२५, नगर विकास विभाग, मंत्रालय,मुंबई यांचे सोबत मा.महापौर व मी स्वत; दुरध्वनीवर केलेल्या चर्चेनुसार कलम ६५ अन्वये कार्यवाही करावयाची झाल्यस अर्थसंकल्पीय ठरावास मा.शासनाकडुन मान्यता आवश्यक असल्याने त्याप्रमाणे मा.प्रधान सचिव,नवि-२ यांचेक्डे प्रस्ताव मान्यतेकरिता पाठविणे उचित वाटते.तथापि आदेशार्थ सादर,

फेरसादर,

अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील कुष्ठपिडीत, कुष्ठपिडीत अपंग व मनोरुग्ण यांना अर्थ सहाय्य देणे बाबत.इकडील जा.क्र.५२२ दिनांक ३१-०७-२०१७ नुसार मा.महासभेपुढे मान्यतेसाठी नगरसचिव कार्यालयाकडे सादर करण्यात आला होता.दिनांक ३१-०७-२०१७ रोजी मा.महापौर यांचे दालनात मा.महापौर व मा.वैद्यकीय आरोग्य अधिकारी यांनी मा.कक्ष अधिकारी, नगर विकास विभाग नवि-२५ मंत्रालय मुंबई यांचे सोबत दुरध्वनी द्वारे केलेल्या चर्चेनुसर कलम ६५ अन्वये कार्यवाही करावयाची झाल्यस अर्थ संकल्पीय ठरावास मा.शासनाची मान्यता आवश्यक असल्याने त्याप्रमाणे मा.प्रधान सचिव नवि-२ यांचे कडेस मान्यते करीता प्रस्ताव ठेवण्यात आला होता.

दरम्यानच्या काळात दिनांक१६-०८-२१०७ रोजी मा.आयुक्त यांचे दालनात मा.आयुक्त,मा.अतिरिक्त आयुक्त,मा.वैद्यकीय आरोग्य आधिकारी ,सौ मनिषाताई बारस्कर – काळे व कुष्ठरुग्ण प्रतिनिधी यांचे समुवेत झालेल्य चर्चेनुसार यापुर्वी सन २०१६-१७ चे अंदाज पत्रकामध्ये आर्थिक तरतुद करण्यात आलेली आहे. तथापि सदर तरतुदीस स्वतंत्र्यरीत्या विषयास मा.महासभेची मान्यता घेऊन मान्यतेचा ठराव अंतिम मंजुरीसाठी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ६५ अनुसार मा.शासनाचे पाठविणे आवश्यक आहे.

त्याअनुषंगाने प्रस्ताव मा.महासभेकडे पाठविणेस मान्यता मिळणेस आदेशार्थ सविनय सादर,

वैद्यकीय आरोग्य अधिकारी श्री. बोरगे यांचा अभिप्राय की, प्रस्तावानुसार पुनश्च मा.महासभेपुढे ठेवणेकरिता मंजुरीस्तव सादर,

यावर उपायुक्त कर श्री.चव्हाण याची सहमतीदर्शक स्वाक्षरी असे.

यावर मा.अति.आयुक्त श्री.वालगुडे साहेब यांचा अभिप्राय की, उपरोक्त फेरसादर अहवालाप्रमाणे मा.महासभेमध्ये मान्यतेस्तव सादर,

यावर मा.आयुक्त श्री.मंगळे साहेब यांची सहमतीदर्शक स्वाक्षरी असे.

**चर्चा :-** नाही.

**मा.महापौर :-** विषयपत्रिकेवरील विषयास सोडुन चर्चा होत असल्याने विषय मंजूर करण्यांत येत आहेत.

---*---

**ठराव :-**

ऑफीस रिपोर्ट मंजूर. अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील कुष्ठपिडीत, अपंग रुग्ण व मनोरुग्ण (वेडे) यांना प्रति व्यक्ती रक्कम रुपये १,०००/- (रक्कम रुपये एक हजार मात्र) अर्थसहाय्य देणेस ही सभा मान्यता देत आहे. तसेच सदरचा प्रस्ताव मंजूरीकरीता मा.शासनाकडे पाठविणे बाबत प्रशासनाने कार्यवाही करावी. तसेच मा.शासनाकडुन अनुदान मिळणेकामी प्रशासनाने मागणी करावी. खर्च मंजूर.

नियमानुसार प्रशासनाने पुढील योग्य ती कार्यवाही करावी.

सूचक - मा.श्री.उमेश खंडेराव कवडे,

अनुमोदक - मा.श्री.बाळासाहेब मारुती बोराटे,

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही/-
महापौर,
अहमदनगर महानगरपालिका.

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**

**प्रस्ताव क्रमांक :- २२** **दिनांक : १४/०९/२०१७.**

---

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर शहरातील सशुल्क वाहनतळाचे शुल्क (फी) निश्चित करणे बाबत...

---*---

**प्रस्तावाचा मजकुर :-**

अहमदनगर शहराची वाहतुक समस्या दिवसेंदिवस जटील होत आहे. वाहनांची वाढलेली संख्या आणि अरुंद रस्ते हे जरी वाहतुक समस्येचे मुळ कारण असले तरीही पुरेशी वाहनतळाची सुविधा उपलब्ध नसल्याने रस्त्यावर वाहने विस्कळीत ( Hafezard ) स्वरुपात उभी केल्याने वाहतुक समस्येत भर पडत आहे. या संबंधी चर्चा करणेसाठी आणि पुढील धोरण ठरविणेसाठी मा.आयुक्त यांनी दिनांक २४-०७-२०१७ रोजी बैठक आयोजित केली होती. य बैठकीस पोलीस विभागाचे वरिष्ठ अधिकारी तसेच वाहतुक विभागाचे अधिकारी देखील उपस्थित होते या बैठकीत वाहतुकीच्या इतर प्रश्नंबरोबर वाहनतळाच्या उपलब्धते विषयी मुद्दा उपस्थित झाला. त्याअनुषंगाने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ या कायद्यातील कलम २४३ अ बाबत विचार विनिमय करणेत आला. या तरतुदी खालील प्रमाणे आहेत.

१) मा.आयुक्त यांना पोलीस विभागातील वरिष्ठ अधिका-यांशी चर्चा करुन वाहनतळाच्या जागा राखुन ठेवता येतील.
२) महानगरपालिकेच्या संमतीने मा.आयुक्त यांना अशा वाहनतळावर वाहने उभी करुन ठेवणेसाठी शुल्क आकारता येईल.

उपरोक्त नमुद महाराष्ट्र महानगरपलिका अधिनियम १९४९ य कायद्यातील कलम २४३ अ/१ अन्वये आवश्यक ती कार्यवाही करुन म्हणजेच प्रस्तावित वाहनतळाची यादी व नकाशे इत्यादी कागदपत्रे मा. जिल्हा पोलीस अधिक्षक, अहमदनगर यांना या विभागाचे पत्र क्र....... दिनांक .......... अन्वये सादर केलेले आहेत. पोलीस विभागाकडुन या प्रस्तावाबाबतची मंजुरी अपेक्षित (Awaited ) आहे.

मध्यंतरीच्या काळात पुढील कालापव्यव टाळणेसाठी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ या कायद्यातील कलम २४३ अ/२ प्रमाणे मा.महासभेकडुन विषयाकिंत सशुल्क वाहनतळाचे शुल्क मंजुर करुन घेणे आवश्यक आहे. त्यानुसार सदर प्रस्ताव मंजुरीसाठी मा.महासभेस सादर करणे आवश्यक आहे.

१) सशुल्क वाहनतळाच्या यादीमध्ये दुचाकी,चारचाकी (हलके वाहने), प्रवासी वाहने (हलकी), जड वाहने (ट्रक) इत्यादी वाहनांच्या वाहनतळाचा समावेश आहे. त्यामुळे या सर्व प्रकारच्या वाहनांचे वाहनतळ शुल्क निश्चित करणे आवश्यक आहे.
२) सन २०११ मध्ये दुचाकी करिता रु.५/- तर चारचाकी वाहनाकरिता रु.१५/- इतका दर निश्चित करणेत आला होता.तथापि या दरात इतर वाहनांचा समावेश नव्हता तसेच किती काळा करिता हा दर आहे.याचा उल्लेख नव्हता.
३) मध्यंतरीच्या काळात काही वाहनतळाचे प्रस्ताव मा.स्थायी समिती यांचेकडुन शुल्क निश्चितीसाठी प्राप्त झाले होते. त्यावेळेस या विभागाने खालील प्रमाणे दर निश्चित करुन दिलेले आहेत.

| अ. क्र. | पार्किंगचे तास | दुचाकी वाहन धारकाकडुन वसुल करावयाचे शुल्क | चारचाकी वाहन धारकाकडुन वसुल करावयाचे शुल्क | शेरा |
|---|---|---|---|---|
| १ | ० ते २ तास | रु.५/- | रु.२०/- | |
| २ | २ ते ५ तास | रु.८/- | रु.२५/- | |
| ३ | ५ ते ७ तास | रु.१०/- | रु.३०/- | |
| ४ | ७ ते १० तास | रु.१५/- | रु.४०/- | |
| ५ | १० तासा पेक्षा जास्त | रु.२५/- | रु.५०/- | |

४) स्थानिक चौकशी, प्रत्येक वाहनांची आवश्यक ते क्षेत्र इत्यादी मुद्दे विचारात घेवुन सर्व प्रकारच्या वाहनांसाठी खालील प्रमाणे शुल्क ठरविणे योग्य होईल. असे मत आहे.

अ) दुचाकी वाहने रुपये १०/- प्रती दोन तास

ब) चारचाकी वाहने हलकी वाहने (खाजगी) रुपये २५/- प्रती दोन तास

क) चारचाकी वाहने हलकी वाहने (प्रवासी) रुपये ४०/- प्रती दोन तास

ड) चारचाकी वाहने (हलकी वाहने)रुपये ५०/- प्रती दोन तास

वरील दर हे किमान दर असुन पुढील प्रत्येक चार तासांसाठी हेच दर आकारणे योग्य होईल.

उपरोक्त नमुद वाहनतळाच्या यादी मध्ये काही खाजगी जागांचाही समावेश आहे.या जमिन मालकांशी संपर्क करण्यात येत आहे. ते देखील या घोषीत खाजगी मालकीच्या जागांवर अधिकत वाहनतळे चालवु शकतील मात्र त्यांना उपरोक्त दराप्रमाणे शुल्क घ्यावे लागेल.अर्थातच असे शुल्क ते स्वत; घेतील त्यापैकी कोणताही हिस्सा महानगरपालिकेस देण्याची आवश्यकता नाही.

वरील प्रमाणे प्रस्ताव मंजुरीस्तव मा.महासभेत सादर करणे योग्य होईल.व मा.आयुक्त श्री.मंगळे साहेब यांची सहमतीदर्शक स्वाक्षरी असे.

---*---

**चर्चा :-** नाही.

**मा.महापौर :-** विषयपत्रिकेवरील विषयास सोडुन चर्चा होत असल्याने विषय मंजूर करण्यांत येत आहेत.

---*---

**ठराव :-**

ऑफीस रिपोर्ट मंजूर. अहमदनगर शहरातील सशुल्क वाहनतळाचे शुल्क (फी) निश्चित करण्यास ही सभा मान्यता देत आहे. प्रशासनाने पुढील योग्य ती कार्यवाही करावी.

तसेच मा.श्री.सचिन तुकाराम जाधव यांनी दिलेल्या पत्रानुसार मा.स्थायी समिती सभेत श्री.घनश्याम सखाराम घोलप, नांगरेगल्ली, अहमदनगर यांना कोतवाली पोलीस स्टेशनच्या मागील बाजुकडील माणिक चौकातील मोकळया जागेत पे ॲण्ड पार्क करीता जागा भाडे तत्वावर देण्याबाबत ठराव पारीत झालेला आहे.

प्रशासनाने वाहनतळाबाबतची यादी तयार केलेली आहे. सदर यादीत कोतवाली पोलीस स्टेशनच्या मागील बाजूकडील माणिकचौकातील मोकळया जागेच्या नावाचा समावेश करणेत यावा. श्री.घनश्याम सखाराम घोलप, नांगरेगल्ली, अहमदनगर यांना सदरची जागा पे ॲण्ड पार्क तत्वावर भाडे कराराने देण्यास ही सभा मान्यता देत आहे. प्रशासनाने याबाबत कार्यालयीन सोपस्कार पार पाडुन अटी/शर्ती बाबत नियमानुसार कार्यवाही करावी.

नियमानुसार प्रशासनाने पुढील उचित कार्यवाही करावी.

सूचक - मा.श्री.उमेश खंडेराव कवडे,

अनुमोदक - मा.श्री.बाळासाहेब मारुती बोराटे,

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही/-
महापौर,
अहमदनगर महानगरपालिका.

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**

**प्रस्ताव क्रमांक :- २३** **दिनांक : १४/०९/२०१७.**

---

**प्रस्तावाचा विषय :-** १४ व्या वित्त आयोगामधुन प्राप्त होणा-या अनुदानाची घनकचरा व्यवस्थापन अंतर्गत आर्थिक नियोजन करणे बाबत

**---*---**

**प्रस्तावाचा मजकुर :-**

उपरोक्त विषयाबाबत सादर करण्यात येते की, अहमदनगर महानगरपालिकेस १४ व्या वित्त आयोगा अंतर्गत घनकचरा व्यवस्थापन व शौचालयासाठी दिनांक ०१/०६/२०१७ अखेर खालील प्रमाणे अनुदान प्राप्त आहे.

| अ.क्रं. | वर्ष | प्राप्त अनुदान |
|---|---|---|
| १ | सन २०१५-२०१६ | रु.१०,०७,८८,७७८/- |
| २ | सन २०१६-२०१७ | रु.६,७८,१३,४२५/- |
| ३ | सन २०१६-२०१७ | रु.६,६४,०३,६००/- |
| | | **रु.२३,५०,०५,८०३/-** |

वरील प्रमाणे प्राप्त झालेल्या अनुदानापैकी खालील प्रमाणे प्रशासकीय मान्यता घेण्यात आली आहे.

| अ.क्र. | प्रशासकीय मान्यता | रक्कम रुपये |
|---|---|---|
| १ | मा.महासभा ठराव क्रमांक ३९ दिनांक १६/०३/२०१६ | रुपये ११.५७ कोटी |
| २ | मा.महासभा ठराव क्रमांक ३७ दिनांक २२/१२/२०१६ | रुपये ७.३३ कोटी |
| ३ | मा.महासभा ठराव क्रमांक ४१ दिनांक २७/०३/२०१७ | रुपये १.२५ कोटी |
| | **एकुण** | **रुपये २०.१५ कोटी** |

त्यानुसार एकुण प्राप्त झालेले अनुदान रुपये २३,५०,०५,८०३/- पैकी रुपये २०,१५,००,०००/- रक्कमेस प्रशासकीय मान्यता घेण्यात आली असुन रक्कम रुपये ३,३५,०५,८०३/- इतकी रक्कम शिल्लक आहे. त्यानुसार उर्वरीत रक्कम रुपये ३,३५,०५,८०३/- बाबत कचरा संकलन व वाहतुक तसेच यंत्राव्दारे कचरा गोळा करणे बाबतचे नियोजन आरोग्याधिकारी यांचे मार्फत होणे उचित वाटते. तथापि उर्वरीत रक्कमेचे पुढील नियोजन घनकचरा व्यवस्थापन विभागामार्फत होणेस्तव प्रस्ताव सविनय सादर.

यावर उपायुक्त (कर) श्री.बेहेरे यांचा अभिप्राय, उप आरोग्याधिकारी यांनी नमूद रु.३.३५ कोटीचे नियोजन सादर करावे.

यावर प्रकल्प अभियंता यांचेकडुन फेरसादर रिपोर्ट की, प्रस्तावात नमूद केल्याप्रमाणे १४ व्या वित्त आयोगातील प्राप्त अनुदानापैकी केवळ ३.३५,०५,८०३/- एवढी रक्कम घनकचरा व्यवस्थापनासाठी शिल्लक दिसुन येते.

कचरा संकलन व वाहतुक प्रक्रीया खाजगी तत्वावर करणेसाठी वार्षिक अंदाजे ५.५० कोटी रक्कम अपेक्षीत आहे.

तरी वरील १४ व्या वित्त आयोगातुन शिल्लक रक्कम ३,३५,०५,८०३/- व महानगरपालिका अर्थ संकल्पातील तरतुद व मंजूर घनकचरा संकलन व वाहतूक या लेखाशिर्षाखालील मंजूर रक्कम या दोन्ही रक्कमेमधुन संपुर्ण शहरातील कचरा संकलन व वाहतुक खाजगी तत्वावर राबविणे योग्य वाटते.

तथापि वरील उर्वरीत १४ वा वित्त आयोग रक्कमेस कचरा संकलनासाठी खर्च करणेस अंतिम मंजूरी मा.सर्वसाधारण सभेची आवश्यक आहे.

तरी वरील प्रमाणे प्रस्तावित कार्यवाहीस मंजूरीस्तव मा.महासभेपुढे सादर करणेकरीता आदेशार्थ सादर.

यावर लेखापरीक्षक श्री.खरात यांचा अभिप्राय की, प्रस्तावित अ प्रमाणे कार्यवाहीस हरकत नाही.

यावर उपायुक्त (कर) श्री.बेहेरे यांचा अभिप्राय की, प्रस्तावित नुसार सद्यस्थितीतील १४ व्या वित्त आयोगा अंतर्गत मंजूर शिफारशीनुसार प्राप्त रक्कमेपैकी घनकचरा व्यवस्थापन या अंतर्गत सन २०१७-२०१८ करीता व्यवहार्य योग्य रक्कम रु. ३,३५,०५,८०३/- ही संपुर्ण रक्कम घनकचरा संकलन व वाहतुक याकरीता वापरणेस हरकत नाही. प्रभागासाठी मे.महासभेचा ठराव आवश्यक आहे. करीता प्रस्ताव मे.महासभेपुढे सादर करणेस हरकत नाही. मे.आदेशार्थ सादर.

यावर उपायुक्त (सा) श्री.चारठाणकर यांची सहमतीदर्शक स्वाक्षरी असे.

यावर मा.आयुक्त श्री.गावडे साहेब यांचा अभिप्राय की, १४ व्या वित्त आयोगाचा प्राप्त निधी मा.महासभेची मान्यता झालेला निधी, शिल्लक निधी याबाबत मुख्यलेखाअधिकारी यांनी खातरजमा करुन सादर करावी.

यावर मुख्यलेखाअधिकारी यांचा अभिप्राय की, चौदावा वित्त आयोग निधी मधुन प्राप्त निधी, शिल्लक निधी, खर्च झालेला निधी याचा तपशील पुढील प्रमाणे --

१) सन २०१५-२०१६ साठी एकुण २०,२४,९७,७७१/- प्राप्त झाली

२) सन २०१६-२०१७ साठी एकुण २७,३४,४०,४५०/- प्राप्त झाली

३) सन २०१७-२०१८ साठी अद्याप प्राप्त नाही.

झालेला एकुण खर्च -- २८,४५,४६,६२७/-

मिळालेले व्याज -- १,०९,९१,१२०/-

आजअखेर मनपाकडे व्याजासहीत शिल्लक रक्कम २०,२३,६९,२८९/-

विभागाने प्रस्तावित केलेप्रमाणे कार्यवाही होणेस हरकत नाही.

यावर मा.आयुक्त श्री.गावडे साहेब यांचा अभिप्राय की, एकूण प्राप्त निधी मा.महासभेने मान्यता दिलेला निधी व ज्या किंवा जितक्या निधीस अद्याप मा.महासभेची मान्यता नाही. कृपया ती तपासून सादर करावी.

यावर मुख्यस्वच्छता निरीक्षक यांचेकडुन फेरसादर रिपोर्ट की, उपरोक्त विषयानुसार फेरसादर करण्यांत येते की, मा.आयुक्त यांच्या दिनांक ०६/०७/२०१७ रोजीच्या आदेशानुसार घनकचरा व्यवस्थापन विभागाकरीता प्रस्तुत नस्ती मधील टी-१ नुसार एकुण रक्कम रु.२३,५०,०५,८०३/- इतकी महानगरपालिकेस एकुण प्राप्त रक्कम ठेवण्यात आले आहे. त्यापैकी एकुण रक्कम रु.२०.१५ कोटी रक्कमेची मा.महासभेची मंजुरी घेवुन कामे मनपा प्रकल्प विभाग व घनकचरा व्यवस्थापन विभागामार्फत प्रस्तावित करण्यात आले असुन घनकचरा व्यवस्थापन विभागाकडील उर्वरीत रक्कम रु. ३,३५,०५,८०३/- निधीचे महासभेची मंजुरी घेण्यांत आलेली नाही.

तसेच स्वच्छ महाराष्ट्र अभियानार्तंगत अर्थ विभाग जा.क्र.२४०/२०१७ अन्वये एकुण रक्कम रु.३,८७,६४,०००/- चा निधी प्राप्त झाले आहे. व त्यानुसार सदर रक्कमेचा भरणा व्दिनोंद लेखा पध्दतीमध्ये नोंद घेवुन अर्थ विभागात जमा करण्यांत आले आहे.

सबब १४ व्या वित्त आयोगाच्या घनकचरा व्यवस्थापन विभागाकरीता प्राप्त एकुण रक्कम रु.२३,५०,०५,८०३/- पैकी उर्वरीत रक्कम रु.३,३५,०५,८०३/- ची महासभेची मंजुरी घेण्यास व स्वच्छ महाराष्ट्र अभियानांतर्गत प्राप्त रक्कम रु.३,८७,६४,०००/- ची घनकचरा व्यवस्थापन विभागास कचरा संकलन व वाहतुक करणेकामी घनकचरा व्यवस्थापन अंतर्गत आर्थिक नियोजन करणेकामी मा.महासभेची मंजुरी घेणेस्तव मंजुरीस व आदेशार्थ सविनय सादर.

यावर घनकचरा व्यवस्थापन विभाग प्रमुख यांचा अभिप्राय की, सद्यस्थितीमध्ये १४ व्या वित्त आयोगामार्फत प्राप्त घनकचरा व्यवस्थापनाकरीता शिल्लक रक्कम रु.३,३५,०५,८०३/- तसेच स्वच्छ महाराष्ट्र अभियानाव्दारे प्राप्त रक्कम रु.३,८७,६४,०००/- अशी एकुण ७,२२,६९,८०३/- (सात कोटी चाळीस लक्ष एकोणसत्तर हजार आठशे तीन) शिल्लक आहे.

स्वच्छ महाराष्ट्र अभियानांतर्गत प्राप्त निधी रक्कम रु.३,८७,६४,०००/- चा भरणा दिनांक ०३/०७/२०१७ रोजी अर्थ विभागाकडे रितसर करण्यांत आलेला आहे.

वरिल सर्व रक्कमेपैकी संपूर्ण शहर हद्दीत घनकचरा संकलन वाहतूक करीता सहा कोटीची तरतुद करुन त्यास महासभेची मान्यता घेणे व निविदा प्रसिध्द करणेस मंजूरीस्तव सादर.

तसेच उर्वरीत रु.१,८७,६४,०००/- व भविष्यात प्राप्त होणा-या निधीव्दारे खालील प्रमाणे तरतूद करणे उचीत वाटते.--

१) वैयक्तीक शौचालय/ सार्व.शौचालय
२) Decentralized Composting plants ३/४ ठिकाणी
३) Animal waste procersing plant
४) घरोघर ओला व सुका कचरा विलणीकरणासाठी जनजागृती व व्यवस्था
५) वरिल प्रमाणे संपूर्ण शहराचे खाजगी व्यवस्था मार्फत निविदा अंतीम होईपर्यंत सध्या कार्यरत वाहन चालक/ डंपर्स / मजूर सप्लायर्स यांची देयक अदा करणे

याप्रमाणे तपशिलवार नियोजन मा.महासभेपुढे सादर करणेस मंजूरीस्तव सादर.

यावर फेरसादर की,

दिनांक २१/०७/२०१७ रोजी समक्ष झालेल्या चर्चेनूसार मुद्देनिहाय खर्चाचा तपशील खालील प्रमाणे सादर,

| | | |
|---|---|---|
| १) | मा.हरीत लवादाच्या सूचनेप्रमाणे तीन ठिकाणी विकेंद्रीत कंपोस्ट प्लॅन्ट प्रत्येकी २ टन क्षमतेचे बसविणे | रक्कम रु.१ कोटी |
| २) | मृत जनावरे, कत्तलखाना यातील वेस्ट प्रक्रीया केंद्र (Biometnanization) उभारणे | रक्कम रु. १ कोटी |
| ३) | ओला व सुका कचरा विलगीकरण बाबत जनजागृती करीता | रक्कम रु.१० लक्ष |
| ४) | खाजगी तत्वावर शहरातील कचरा संकलन व वाहतूक करणेकरीता (माहे ऑगष्ट १७ ते मार्च १८) | रक्कम रु.४ कोटी ६२ लक्ष एकोणसत्तर हजार आठशे तीन |
| ५) | सद्यस्थितीत कार्यरत ठेकेदाराचे थकीत बिल अदा करणे | रक्कम रु.५० लक्ष |
| | **एकुण** | **७,२२,६९,८०३/-** |

सद्यस्थितीमध्ये १४ व्या वित्त आयोगातील प्राप्त निधीपैकी एकूण ३,३५,०५,८०३/- एवढा निधी शिल्लक आहे. तसेच स्वच्छ महाराष्ट्र अभियानांतर्गत प्राप्त ३,८७,६४,०००/- असा एकूण ७,२२,६९,८०३/- निधीचे वरील प्रमाणे प्रयोजन करणे कामी मंजूरीसाठी मा.महासभेपुढे सादर करणेस मंजूरीस्तव सादर.

यावर मा.अति.आयुक्त श्री.वालगुडे साहेब यांचा अभिप्राय की, सोबतच्या फेरसादर अहवालानूसार मा.महासभेकडे मान्यतेस्तव सादर करणेस हरकत नाही.

यावर मा.आयुक्त श्री.गावडे साहेब यांचा अभिप्राय की, कृपया स्वच्छता अभियानांतर्गत आलेल्या निधीचे आदेश शोधून तो कुठल्या कामासाठी वापरता येईल हे शोधावे. व्याज उपरोक्त आकडयात धरले असल्यास त्याचा स्वतंत्र प्रस्ताव परवानगी साठी शासनास पाठवावा. -- मनपा निधीतून काढलेल्या निविदेपोटी १४ वा वित्त आयोगातील निधी वापरता येणार नाही. -- कंपोस्ट Biometrantation, विलणीकरण इत्यादी प्रस्तावित बाबीसाठी सूचविलेला निधी कशाच्या आधारे सूचविला ते स्पष्ट करावे. तसेच DPR बाबत सुध्दा स्पष्टता करावी.

यावर फेरसादर की,

१) १४ व्या वित्त आयोगांतर्गत प्राप्त एकूण निधी पैकी ५०% निधी हा घनकचरा व्यवस्थापन विभागासाठी उपयोगात आणणे बंधनकारक आहे. त्या बाबतचा शासन अध्यादेश क्रमांक टी.एफ.सी.८०१५/प्र.क्र./१०६ नवि-क्र-४ मंत्रालय मुंबई ४०० ०३२ दि. ०३/०८/२०१५ सोबत जोडलेला आहे.

२) सद्यस्थितीमध्ये १४ व्या वित्त आयोगाच्या प्राप्त निधीपैकी (i) रक्कम रु.३,३५,०५,८०३/- व दिनांक ०९/०८/२०१७ च्या शासन निर्णय क्र. एफएफसी १९१७/प्र.क्र.१२९ नवि-४, मंत्रालय-३२ अन्वये प्राप्त एकूण निधी १५,२८,२९,७४१/- (पंधरा कोटी अठ्ठावीस लक्ष, एकोणतीस हजार सातशे एक्केचाळीस फक्त) पैकी ५०% म्हणजेच (ii) ७,६४,१४,८०७/- सात कोटी चौसष्ट लक्ष चौदा हजार आठशे सात फक्त शिल्लक आहेत.

३) वरिल i व ii यांची एकत्रीत रक्कम रुपये १०,९९,२०,८०७/- दहा कोटी नव्व्यान्नव लक्ष वीस हजार सहाशे त्र्याहत्तर फक्त शिल्लक आहेत.

४) सदर रक्कमेमध्ये व्याज गृहीत धरलेले नाही.

५) DPR तयार करणेबाबतची कार्यवाही चालू आहे.

६) तरी पुढील प्रमाणे नियोजन करुन अंतीम मंजूरीसाठी मा.महासभेकडे पाठविणे उचीत राहील.

| अ.क्र. | प्रकल्प | अंदाजे खर्च |
|---|---|---|
| १) | मा.हरीत लवादाचे सूचने प्रमाणे तीन ठिकाणी कंपोस्ट प्रकल्प उभारणे | १ कोटी |
| २) | Bio methanization plant उभारणे | १ कोटी |
| ३) | जनजागृती करणे | १० लक्ष |
| ४) | खाजगी तत्वावर कचरा संकलन वाहतूक करणे | ६.५ कोटी |
| ५) | स्विपींग मशीन (Sweeping) व्दारे प्रमुख रस्त्यांचे झाडण खाजगी तत्वावर करणे | १.५ कोटी |
| ६) | Bio methanization plant opesation & maintanance | ५० लक्ष |
| ७) | कंपोस्ट प्लॅन्ट (decentalized) o & m | ५० लक्ष |
| ८) | कचरा डेपो वरील कचरा व्यवस्थीत हटविणे करीता तसेच दरवर्षी ओटे सफाई करीता आवश्यक दोन पोकलॅन्ड Ex-२०० क्षमतेचे खरेदी करणे | ८० लक्ष |
| | **एकुण** | **११ कोटी ९० लक्ष** |

तरी याप्रमाणे नियोजन केल्यास शहरातील सर्व प्रकारच्या कच-याचे व्यवस्थापन योग्य रितीने करणे सूलभ होईल.

तथापि माहितीस व मा.सर्वसाधारण सभेसमोर प्रशासकीय मंजूरीस सविनय सादर.

यावर मुख्यलेखाधिकारी श्री.झिरपे यांची सहमतीदर्शक स्वाक्षरी असे.

यावर उपायुक्त श्री.चव्हाण यांचा अभिप्राय की, नवीन Ramp बांधणे आवश्यक आहे त्यासाठी तरतूद करणे उचित होईल.

यावर मा.अति.आयुक्त श्री.वालगुडे साहेब यांचा अभिप्राय की, फेरसादर अहवाला मधील अनु.क्र.१ ते ८ व नवीन Ramp बांधणेची तरतुदीसह प्रस्ताव मा.महासभेकडे मान्यतेस्तव सादर करणेस हरकत नाही.

यावर मा.आयुक्त श्री.मंगळे साहेब यांची सहमतीदर्शक स्वाक्षरी असे.

---*---

**ठराव :-**

ऑफीस रिपोर्ट मंजूर. १४ व्या वित्त आयोगामधुन प्राप्त होणा-या अनुदानाची घनकचरा व्यवस्थापन अंतर्गत आर्थिक नियोजन करणेस ही सभा मान्यता देत आहे. घनकचरा सेवाशुल्क वसुली विभागामार्फत पुर्ण क्षमतेने होत नाही. त्यामुळे ही वसुली घनकचरा व्यवस्थापन विभागामार्फत किंवा खाजगी तत्वावर पार पाडावी यास ही सभा मान्यता देत आहे. प्रशासनाने याबाबत नियमानुसार पुढील योग्य ती कार्यवाही करावी.

तसेच मा.श्री.बाळासाहेब बोराटे, विरोधी पक्ष नेता व इतर नगरसेवक यांनी दिलेल्या पत्रानुसार मृत जनावरे, कत्तलखान्यातील वेस्ट मटेरियलवर प्रक्रीया केंद्र महानगरपालिका उभारणार आहे. शहरातील कत्तलखान्याची समस्या मोठया प्रमाणात असुन महानगरपालिका वेस्ट प्रक्रीया केंद्र (Bio methanization plant) उभारणार आहे त्याकेंद्राशेजारी किंवा महानगरपालिकेने जागा उपलब्ध करुन स्लॉटर हाउस उभारणे बाबत कार्यवाही करावी. सदर स्लॉटर हाउस उभारणे कामी मा.शासनाकडे प्रस्ताव पाठवुन निधीची मागणी करणेबाबत पुढील उचित कार्यवाही प्रशासनाने करावी. यास ही सभा मान्यता देत आहे.

नियमानुसार प्रशासनाने पुढील उचित कार्यवाही करावी.

सूचक - मा.श्री.उमेश खंडेराव कवडे,

अनुमोदक - मा.श्री.बाळासाहेब मारुती बोराटे,

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही/-
महापौर,
अहमदनगर महानगरपालिका.

प्रति,
पोलीस निरीक्षक,
तोफखाना पोलिस स्टेशन,
अहमदनगर.

विषय : गुरुवार दिनांक १४/०९/२०१७ रोजी दुपारी १.०० वा होणा-या अहमदनगर महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेसाठी पोलीस बंदोबस्त मिळणे बाबत...

महोदय,

उपरोक्त विषयानुसार कळविण्यांत येते की, गुरुवार दिनांक १४/०९/२०१७ रोजी दुपारी १.०० वाजता अहमदनगर महानगरपालिकेची मा.सर्वसाधारण सभा **नविन प्रशासकीय इमारत, अहमदनगर महानगरपालिकेचे राजमाता जिजाऊ सभागृह, अहमदनगर** येथे होणार आहे.

तरी सदर दिवशी कायदा व सुव्यवस्थेच्या दृष्टीकोनातुन अहमदनगर महानगरपालिका सभागृहास पुरेसा पोलीस बंदोबस्त मिळणे बाबत विनंती आहे.

सहाय्यक आयुक्त,
अहमदनगर महानगरपालिका.

प्रत : मा.महापौर साहेब, अहमदनगर महानगरपालिका, यांचेकडेस माहितीस सादर.

प्रत : मा.आयुक्त साहेब, अहमदनगर महानगरपालिका, यांचेकडेस माहितीस सादर.

प्रत : मा.पोलीस अधिक्षक, पोलिस अधिक्षक कार्यालय, अहमदनगर, यांचेकडेस माहितीस सादर.

अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.
जा.क्र.नगरसचिव/AMC.-
दिनांक : /०९/२०१७.